म. ग्रं. सं. ठाणे
विषय ···· भू: प्रवास
क्र. ५५१२

# काश्मीर

प्रा. ना. ल. वैद्य



EFBK-0024744

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 2 JAN 1986 | 11 JUN 1986 |
| [illegible] JAN 1986 | 6 JUL 1986 |
| 9 MAR 1986 | 22 FEB 1987 |
| 3 APR 1986 | 9 MAR 1988 |
| 5 MAY 1986 | 14 AUG 1988 |
| [illegible] JUN 1986 | 28 AUG 1988 |
| | 2[illegible] JAN 1994 |

(क्र. मा. पहा)

५०००-३-८४

संदर्भ ग्रंथ
६६९
२७०४४
१२।१२।८५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६९
ग्रं. क्र. २७०४४
१२।१२।८५
संद. शाखा (स्थल प्रत)

# काश्मीर

प्रा. ना. ल. वैद्य

REFBK-0024744

हरिक प्रकाशन

नागपूर

★

प्रकाशिका

सौ. सीमंतिनी सहस्रबुद्धे,
हीरक प्रकाशन,
कला निवास, हनुमान पथ,
धरमपेठ, नागपूर—४४० ०१०

★

पुष्प क्रमांक : १३

★

प्रथमावृत्ती
१५ ऑगस्ट, १९८५
(गुरुपुष्यामृत योग)

★

मुद्रक :
श्री शंकरराव लाखे
मातोश्री प्रिंटींग प्रेस
मुकुंदराज पथ, महाल, नागपूर

★

©
लेखकाच्या स्वाधीन

मूल्य ३५ रुपये

## अर्पण पत्रिका

वैष्णवदेवी व क्षीरभवानी या
हिमालयातील जागृत देवताच्या
दर्शनाने काश्मीरवर पुस्तक
लिहायला प्रेरणा मिळाली त्या
देवींना अत्यंत शतशत प्रणाम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६०
दा. क्र.
ग्रं. क्र. २३०५४
१२।१२।५९

# काश्मीर–जम्मू

## प्रास्ताविक

काश्मीरला जावेसे प्रत्येकाला वाटते व ते अगदी साहजिक आहे. पृथ्वीवरील स्वर्ग म्हणजे काश्मीर असे वर्णन जहाँगीर बादशहाने केले होते. औरंगजेबच्या काळात फ्रेंच मिशनरी पण व्यवसायाने डॉक्टर मॉसिय बर्नियर हा भारतात आला होता. त्याने जवळ जवळ दहा वर्षे भारतात वास्तव्य केले आणि "ट्रॅव्हल्स इन द मोगल एम्पायर" हा एक उत्कृष्ट प्रवासवर्णनात्मक ग्रंथ (पण त्यात सर्व सामाजिक, राजकीय घडामोडी आल्या आहेत) लिहिला १६५६ ते १६६५ या कालखंडात त्याचे वास्तव्य होते. त्याने एक सम्पूर्ण प्रकरण पृ. ३८९ ते ४२८, 'द पॅरडाईज ऑफ् द इन्डिज"[1] या नावाने काश्मीरवर लिहिले आहे अर्थात् त्याच्या काळात व आताच्या काळात सव्वा तीनशे वर्षे गेली आहेत, व पुष्कळसा फरकही पडला आहे, पण पुष्कळशा मौलिक गोष्टी अजूनही कायम आहेत

काश्मीरला जाण्याचे आकर्षण लोकांना इतके का असावे ? केवळ भारतीयच नव्हे तर परदेशातील लोकही काश्मीरला येतात. मात्र, इथे एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे की, खुजराहो आणि काशीला जितके परदेशी लोक, प्रवासी तुम्हाला आढळतील तितके काश्मीरला आढळणार नाहीत. मात्र भारतातून लोंढेच्या लोंढे काश्मीरला येत असतात, व

---

१ बर्नियर्स ट्रॅव्हल्स इन द मोगल एम्पायर. आवृत्ती १९१४. पृ. ३८९ ते ४२७ बारीक टाईपात

यायला पाहिजेत. युरोप–अमेरिकेच्या लोकांना काश्मीरचे इतके महत्त्व वाटत नाही, कारण त्यांच्या देशात काश्मीर सारखे सृष्टिसौंदर्य भरपूर आहे. स्वित्झर्लंड देश तर अप्रतिम सृष्टिसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे स्वित्झर्लंड देशात कोणत्याही ऋतूत ना सौंदर्य आहेच. उन्हाळ्यात वनश्री नटलेली असते. अनेक महिने सूर्याचे दर्शन झालेले नसते ते यावेळी भरपूर होते, व उन्हाने देश न्हाऊन निघतो थंडीच्या दिवसात स्वित्झर्लंड बर्फाने आच्छादलेला असतो, तेव्हाही सौंदर्य आगळेंच असते. त्या ऋतूत बर्फावरील स्केटिंग, स्कीईंग इ. अनेक खेळांचे सामने स्वित्झर्लंडमध्ये असतात. तेव्हा, सृष्टिसौंदर्य किंवा हिवाळयातले खेळ पाहण्यासाठी वा भाग घेण्यासाठी पाश्चात्याना काश्मीरला यायची आवश्यकता नसते– आपणा भारतीयाचे तसे नाही. "काशीस जावे, नित्य वदावे" अशी एका काळी म्हण होती, कारण त्या काळात काशीला जाणें दिव्यच समजले जाई. आता प्रवासाच्या सोयी भरपूर उपलब्ध झाल्याने काशीला जाणे फार सोपे झाले आहे. व काशीविषयी तेवढे आकर्षण राहिले नाही. कदाचित् आम्हा भारतीयाच्या नवीन पिढीतील युवकावर काशीचे धर्मिक महत्त्व परिणाम करीत नसावे– काश्मीरचे मात्र आकर्षण अजून आहे. आणि त्या आकर्षणाला दाद देईल असेच काश्मीर आहे.

काश्मीरला जाण्यासाठी आता विपुल साधने उपलब्ध आहेत मुबईहून पश्चिम रेल्वेची काश्मीर मेल जाते. पुण्याहून झेलम जाते. मद्रासहून जम्मू एक्स्प्रेस जाते. ही 'जनता' एक्स्प्रेस आहे पुण्याहून रेल्वेने (झेलमने) जम्मूपर्यन्त २१८० किलोमीटर्स अतर आहे व ३८ तासांचा प्रवास आहे. पुणे– झेलम रेल्वे दौंड, मनमाड, भुसावळ, इटारसी, भोपाल, झाशी, आग्रा दिल्ली या मार्गे जाते. पश्चिम रेल्वे मुबईहून व्हाया रतलाम जाते– सेकण्ड क्लास चे भाडे सध्या (१९८५ साली) ११७ रुपये आहे.

जम्मूच्या पुढे सध्या रेल्वे नाहीं. जम्मूपासून उधमपूरपर्यन्त रेल्वे न्यायचा सरकारचा सकल्प आहे व काही वर्षात तो पुरा होईल असेच वाटते. उधमपूर हे जम्मू–श्रीनगर मार्गावर आहे, आणि पर्वतानी आच्छादलेले आहे. वस्तुत जम्मू सोडल्यानतर आपण हिमालयाच्या कुशीत जातोच.

उधमपूर हे अत्यन्त महत्त्वाचे लष्करी ठाणे आहे. ज्याप्रमाणे पठाणकोट व अमृतसर आहे. पुणे झेलम गाडीने अमृतसर स्टेशन लागत नाही. काश्मीर मेल,जी दिल्लीहून सुटते व मुंबईहून पश्चिम रेल्वेचे कनेक्शन आहे ती गाडी व्हाया अमृतसर जाते उधमपूरला लष्कराचा फार मोठा तळ आहे फार मोठे मिलिटरी हॉस्पिटल आहे, आणि मिलिटरी ऑफिसंची सारखी आवक-जावक सुरू असल्याने, फार मोठा लष्कराचा ऑफिसर्स ट्रॅन्झिट कॅम्प आहे- व या ट्रॅन्झिट कॅम्पमधले कॅन्टीन खूप मोठे आहे, व खाद्यपेयापासून व्ही आय. पी तळ बजपर्यन्त विविध वस्तु माफक दरात तिथे मिळतात. अर्थात फक्त मिलिटरी लोकासाठीत हे कॅन्टीन आहे.

पुणे-झेलम गाडी जम्मू-तवीला (जम्मू-तवी म्हणण्याचे कारण तवी नदीच्या काठी असणारे जम्मू शहर )सकाळी ११.२० ला पोचते तिथे उतरल्यानतर काशीला ज्याप्रमाणे पण्डे असतात, त्याप्रमाणे इथेही दलाल असतात नवख्या प्रवाशाने गोधळून जायचे कारण नाही. स्टेशनातून बाहेर पडल्यावर, अनेक बसेस श्रीनगरला जाण्यासाठी उभ्या असतात. त्यात लक्झरी बसेसही असतात लक्झरी बसने प्रवास करणे बरे-'लक्झरी' म्हणजे खूप आरामाची बस नव्हे आपल्या देशात काही शब्दाचे अर्थ हातचे राखून घ्यावे लागतात या बसेसमुळे प्रवास थोडा लवकर होतो व बसायला अधिक मऊ गाद्या असतात व सीटस बऱ्या असतात. अगदी अवघड वसल्यागत होत नाही.

[illegible] किती वाजता निघते यावर ती श्रीनगरला केव्हा पोचते हे अवलबून असते. जम्मू ते श्रीनगर हा प्रवास साधारणपणे दोनशे मैलांचा आहे, व दहा ते बारा तास लागतात. रस्त्यात उधमपूर, पत्नीटोप, बटोटे रामबन, काझाकुन्ड, अवन्तीपूर व फम्पोरे या ठिकाणी बसेस थांबतात. सगळ्याच बसेस सगळ्याच ठिकाणी थांबतात असे नव्हे. पण, पत्नीटोप, बटोटे, रामबन, अवतीपूर, काझीकुन्ड इथे निश्चितच थांबतात. रामबन हे एक अत्यन्त रमणीय स्थान चिनाब नदीच्या काठी आहे. चिनाब नदी पुष्कळ वेळ आपली सोबत करते. पावसाळयातले दृश्य खरोखर मनोहर असते. पावसाळयात लाकडांचे प्रचण्ड ओंडके नदीच्या प्रावाहात सोडतात

व ते ओंडके वाहात वाहात जातात व काठाला लागले, की उचलून घेतात बिनपैशात लाकडांची वाहतूक होते.

बनिहाल पास उर्फ बनिहाले बोगदा हे राजकीयदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. हा बोगदा २ किलोमीटर लांब आहे. काश्मीरला जोडणारे जे दोन महत्त्वाचे दुवे आहेत त्यातील बनिहाल पास फार महत्त्वाचा आहे तो शत्रूच्या कबजात गेला तर खुष्कीचा मार्ग बंद.

बनिहाल पासच्या अलिकडे संध्याकाळ झाल्यास बसेस कोणत्या तरी ठिकाणी रात्रीच्या थांबतात, कारण बनिहाल पासचा रस्ता अवघड आहे. हिवाळ्यात अथवा पाऊस असला तर निश्चितच रात्रीला बनिहाल पास बंद असतो.

तसे पाहिले तर जम्मू सोडल्यापासूनच सृष्टिशोभा दिसू लागते पण रामबनपासून एक आगळे दृश्य अनुभवाला येते ते म्हणजे भव्यता ही भव्यता भारतात इतर ठिकाणच्या, म्हणजे हिमालय भागातील प्रवास सोडल्यास, अनुभवाला येत नाही

रात्री ज्या ठिकाणी बस मुक्कामाला असते तिथे निरनिराळी हॉटेल्स किंवा सरकारी डाक बंगले असतात. तिथे राहण्याची सोय होते. ती अर्थात "इमर्जन्सी" म्हणूनच समजली पाहिजे.

बनिहाल सोडल्यानंतर साधारण सपाट प्रदेश सुरू होतो. आणि काझीकुण्डनंतर श्रीनगरपर्यन्त सपाटच रस्ता आहे, काझीकुण्डनंतर अवंतीपूरला बस थांबते, तिथून श्रीनगर केवळ १९ कि. मी. आहे अवंतीपूर हे प्राचीन शहर आहे, किंवा होते वैष्णव पंथाचा राजा अवंतीवर्मन याने नवव्या शतकाच्या उत्तरार्धात हे शहर बनविले होते. अजूनही दोन मंदिराचे अवशेष शिल्लक आहेत व ते पाहण्यासाठी प्रवासी उतरतात पैकी विष्णू मंदिर हिंदु शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून पाहण्यासारखे आहे तिथून एक कि. मी. लांब शिव मंदिर आहे. या मंदिरास अवंतीश्वर असे दुसरेही नाव आहे. या विष्णू मंदिरास अवंतीस्वामी असेही म्हणतात या दोन्ही मंदिराचे भग्न अवशेष पाहताना मन उदास होते. या मंदिरातले

स्तंभ अजूनही दिमाखात उभे आहेत व शिल्पकलेचा अप्रतीम नमुना पेश करतात. या स्तम्भावरील कोरलेल्या आकृती पाहण्यासारख्या आहेत

अवतीपूरनंतर बस बहुतेक सरळ श्रीनगरलाच थांबेल. रस्त्याने दुतर्फा उच उच झाडे लागतात. ती खूण म्हणजे आपण श्रीनगरच्या परिसरात शिरत आहोत श्रीनगर येण्यापूर्वी व अवतीपूर सोडल्यानतर पाम्पोरे नावाचे गाव लागते. इथे बस थांबत नाही कारण इथे पाहण्यासारखे काही नाही व श्रीनगर केवळ दहा मैलावर. परतु पाम्पोरे हे एक प्रसिद्ध ठिकाण आहे. कारण इथे केशराची शेतेच शेते दिसतीत जगात इटली, स्पेन व काश्मीर इथेच फक्त केशर उत्पन्न होते. पैकी स्पेनचे सर्वोत्कृष्ट आहे असे म्हणतात. मी स्पेनचे केशर घेतले आहे व पाम्पोरे काश्मीरचेही. कदाचित मला लडनच्या भारतीय दुकानदाराकडे (साऊथहॉलमधील, अस्स्ल स्पेनचे केशर मिळाले नसेल; परंतु, डब्बीवर मात्र स्पेनचा शिक्का होता हे लिहिण्याचे कारण असे की,मला काश्मीरचे केशर अधिक आवडले कदाचित माझ्या एअरफोर्समधल्या मुलाने ओळखीच्या व्यक्तीकडून आणले असावे–पण, तत्पूर्वीही मी बाजारातून केशर घेतले होते, अमीरकदलमध्ये असणाऱ्या दुकानदाराकडून, व ते पण चागले निघाले होते थोडया पाकळयात दूध किंवा श्रीखड रगते व चव येते.

पाम्पोरे हे आता छोटेसे गाव असले (मात्र आधुनिक कारखाने निघू लागले आहेत)तरी पूर्वी ते मोठे शहर होते व राजा अजातपीड (८१३–८५० )च्या वेळी ते पद्मने वसविले.

श्रीनगरला तुमची प्रवासी बस केव्हा पोचेल ते सागता येत नाही. जम्मूहून लवकर सकाळी निघाली असल्यास सध्याकाळी आठपर्यंत पोचते उशीरा निघाली असल्यास व बनिहाल पास मध्ये थांबली असल्यास सकाळी आठच्या सुमारास पोचते.

पुष्कळसे प्रवासी जम्मूहून टॅक्सीने पण येतात एक टॅक्सी श्रीनगरला. जाण्याचे पाचशे रुपये भाडे आकारते चारजण टॅक्सीत सहज बसतात ज्याचेजवळ अधिक पैसा आहे किंवा जे सरकारी पैसे खर्च करू शकतात, जम्मूहूनच नव्हे तर मुंबई, दिल्लीहून विमानाने येतात. ज्यांनी

विमानाने कधी प्रवास केला नसेल, किंवा ज्याना रेल्वेच्या प्रवासाचा शीण सहन होत नाही, ज्यांचेजवळ इतकी फुरसद नाही, (शिवाय ज्याचे जवळ पैसे आहेत )अशा व्यक्ती विमानानेही श्रीनगरला येतात विमानात प्रवास करताना पाहण्यासारखे काहीच नसते, मी गेली चाळीस वर्षे विमानातून प्रवास करीत असल्याने आणि तोही परदेशात, मला रेल्वेचा प्रवास अधिक आवडतो–वातानुकूल दुसऱ्या वर्गाच्या डब्यातून प्रवास केल्यास थकवाही येत नाही

दिल्ली ते जम्मू हा रेल्वे प्रवास पठाणकोटपर्यंत रात्रीचा असतो पठाणकोटला गाडी सकाळी सातचे सुमारास पोचते. तिथे तुम्हाला चहा व नाश्ता चागला मिळतो, आणि 'ट्रिब्यून' हे इंग्रजी दैनिक. पठाण-कोटनंतर मोठे असे स्टेशन नाहीच चार तासात जम्मूच येते.

जम्मू –जम्मूहून काश्मीरला जायची लगेच घाई नसली तर जम्मूला उतरून, वैष्णव देवीचे दर्शन जरूर घेऊन यावे मात्र, जम्मूला उतरण्याची सोय, "सीझन" च्या दिवसात होणे फार अवघड आहे. यासाठी, जम्मूला मुक्काम न करता बस स्टॅण्डवर जाऊन "कटरा" ('कठडा' मराठीत) गावाचे तिकिट काढावे. जम्मूपासून ३०–३५ मैलांवर 'कटरा' गाव आहे. ते हिमालयाच्या पायथ्यापाशीच आहे. जम्मू ते कटरा हा रस्ता हिमालयाचे डोंगरातून जातो. कटरागावाहून वैष्णवदेवी स्थानाला जायची चढण सुरू होते. ही चढण १२ कि. मी. आहे. कटऱ्याला तुम्ही सध्याकाळी पोचलात व तुम्हाला प्रवासाचा शीण आला असल्यास, तिथल्या "सराय" मध्ये रात्र-भर जरूर मुक्काम करा ह्या धर्मशाळा दानशूर लोकानी व संस्थांनी बांध लेल्या आहेत. यात सर्व व्यवस्था होऊ शकते. अंथरापांघरायला मिळते. मोझेक फ्लोअरिंगच्या अत्याधुनिक,चोवीस तास पाणी उपलब्ध असलेल्या या धर्मशाळा आहेत,व या फुकट आहेत तुमची इच्छा असल्यास दान देऊ शकता. कटरा हे 'त्रिकूट' पर्वताच्या पायथ्याशी असलेले टुमदार गाव आहे. ज्यांना पैसे खर्च करायची इच्छा व ऐपत आहे त्यांची सरकारी डाक बंगल्यातून राहण्याची सोय होते त्यासाठी अगोदर रिझर्व्हेशन करणे जरुर आहे

यात्रेकरी बहुधा सध्याकाळी पर्वत चढायला सुरवात करतात १२. कि. मी चढण किती तासात चढायची हे प्रत्येकाच्या शारीरिक क्षमतेवर

आणि मनोबलावर अवलंबून आहे. संध्याकाळी ५ चे सुमारास चढायला सुरुवात करून ५–६ कि मी. नतर आदिकुमारी हे देवीचे स्थान लागते. इथे पुष्कळसे यात्रेकरी रात्रीचा मुक्काम करतात. इथेही मोफत धर्मशाळा, अथरापांघरण्याची सोय असणाऱ्या आहेत वीज पण आहे. होटेल्स आहेत. यात्रेकऱ्यात जख्ख म्हातारे म्हाताऱ्यापासून पाचसहा वर्षांच्या मुलांपर्यंत पायी चालणारे असतात. ज्याना पायी चालण्याची शक्ती, हिंमत नसते, ते घोड्याने खेचर करतात. किंवा डोली करतात पण असे यात्रेकरी विरळाच आढळतात ही महत्वाची गोष्ट आहे. श्रद्धा व भक्ती याच्या बळावर माणसाला एक असामान्य धैर्य व शक्ति प्राप्त होते यात सशय नाही.

पुष्कळसे यात्रेकरी पहाटे पाचला चढायला सुरुवात करतात; आणि सामान्यपणे आदिकुमारीला तासभर विश्रांती घेऊन पुन्हा चढायला प्रारभ करतात. वीस मिनिटांना एक कि मी या गतीने चढण चार साडेचार तासाची व विश्रांती एक तासाची, असे एकदर ५–५॥ तास वैष्णवदेवीला पोचायला लागतात. मी साठीच्या घरात असतांना गेलो होतो. बरोबर माझा तरुण मुलगा, त्याची पत्नी व मुलाचे तरणेबांड मित्र होते. आम्ही पहाटे पाचला चढायला सुरूवात केली होती व मी ११॥ वाजता वैष्णव-देवी स्थानापर्यंत येऊन पोचलो, म्हणजे मला साडेसहा तास लागले. माझ्यासाठी व सुनेसाठी इतरजणही पुढे जाऊन थांबत.

वैष्णवदेवीला पोचल्यानतर फार प्रसन्न वाटते अदमासे सहा हजार फूट उचीवर हे स्थान आहे आजूबाजूला हिमालयाच्या रागाच रांगा. वैष्णवदेवी हे अत्यंत जागृत स्थान असून देशाच्या सरहद्दीचे रक्षण ही देवीच करते असा दृढविश्वास केवळ यात्रेकरूचाच नव्हे तर लष्करातील सैनिकांचाही आहे पाकिस्तानची लढाई झाली त्यावेळी एक देदीप्यमान देवता हातात पचारती घेतलेली सैनिकांना दिसली असे मला त्यांनी सांगितले. हा सपूर्ण श्रद्धेचा प्रश्न आहे (विश्वास ठेवण्यासाठी), आणि प्रत्येक धर्मात अशी श्रद्धास्थाने असल्याने कुणी कुणाची टीका करू नये किंवा अडाणी, सांप्रदायिक, जुनाट व बुरसटलेल्या विचारसरणीचे म्हणू नये.

वैष्णवदेवी स्थानावर अनेक सुसज्ज सराय आहेत– हॉटेल आहेत. वीज आहे. मुबलक पाणी आहे.

पुष्कळ यात्रेकरी वैष्णवदेवीवर मुक्काम करतात एक गोष्ट लक्षात ठेवणे जरुर आहे व ती मघाशीच लिहायला हवी होती. चढण सुरू करण्यापूर्वी, पायथ्याशी दुकाने असतात. तिथून कॅन्व्हासचे बूट व एक काठी भाड्याने घ्यावी. तरुणांसाठी काठीचा उपयोग नाही पण बूट मात्र अवश्य आहेत. बायकांना सुद्धा–अन्यथा हाल पाहवणार नाहीत.

हा १२ कि. मी. चा प्रवास त्रासदायक वाटत नाही हे विशेष होय. एकतर तुम्ही एकटे नसता, तुमच्याबरोबर सदृश हजारो सहयात्री असतात आणि दर्शन करून परत फिरणारे विरुद्ध दिशेने येणारे यात्रेकरी असतात– कुणी दिसला म्हणजे " जय माता की " असे अभिवादन प्रत्येक जण करतो. आपण जर उलट " जयमाता की " म्हटले नाही तर दुसरे यात्रेकरी आपल्याला थांबवून सांगतील, "भैय्या, बोलो जय माता की–"

वैष्णवदेवीच्या शिखरावर पोचल्यावर, थोडी विश्रांती घेतल्यानतर, पर्वताच्या एका कड्यातून शुभ्र आणि अर्थातच थंड पाण्याचा प्रवाह पडत असतो. त्याखाली स्नान करणे जरुर आहे स्त्रियासाठी निराळी जागा आहे. पाण्याच्या धारेखाली स्नान केल्याने एकदम ताजेतवाने झाल्यासारखे वाटते. स्नान केल्यावर, वैष्णवदेवीची मूर्ती ज्या गुहेत आहे तिकडे जायचे. ती गुहा थोडीशी उंचावर आहे दर्शन एकदम होत नाही. रांगेत उभे राहावे लागते. गुहेच्या प्रवेश द्वारासमोर मोकळी जागा आहे तिथे रांगेत लोक बसतात आणि भजने म्हणतात. बंदोबस्तासाठी पोलीस ऑफिसर्स असतात गुहेचे प्रवेशद्वार (द्वार नव्हेच प्रवेशमार्ग) अगदी चिंचोळे आहे आणि शभर फूट आत चालावे लागते. हा शभर फूटाचा मार्ग गडद अंधारात असतो आणि मोठ्या कपारीला धरून चालावे लागते– पायाखालून " चरणगंगा " हा लहानसा जलप्रवाह वाहात असतो. त्यातून मार्ग आक्रमण करायचा क्वचित् एखादा ट्यूब लाईट मंद प्रकाश टाकतो. पूर्वी जाणाऱ्या येणाऱ्यासाठी एकच मार्ग होता, त्यामुळे बिकट परिस्थिती व्हायची. यात्रेकरूत तान्ही मुले कडेवर असलेल्या बायकाही असतात.

त्या बहुधा नवस फेडण्यासाठी येत असाव्यात. आता परत जाणाऱ्यांसाठी दुसरा मार्ग केला आहे-

या वैष्णव देवी संबंधी आणि तत्पूर्वी असणाऱ्या आदिकुमारी विषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत-पण त्या विश्वासार्ह वाटत नाही भैरव नावाचा राक्षस आदिकुमारीशी जबरदस्तीने विवाह करू पाहात होता. भैरवाने वैष्णवदेवीच्या गुहे पर्यंत आदिकुमारीचा पाठलाग केला. त्या 'गुहेपाशी' आदिकुमारी व भैरवाचे तुंबळ युध्द होऊन भैरवास तिने ठार मारले व गुहेत निवास करू लागली. गुहेच्या प्रवेश द्वारापाशी जी प्रचण्ड शिळा आहे ती त्या राक्षसाची आहे असे सांगतात. आपल्या दैवताचे बाबतीत हीच अडचण आहे त्यांचे भोवती दंतकथां चे जाळे विणण्यात येते व मूळ सत्य कायमचे झाकोळले जाते. दंतकथांना सत्य म्हणून स्वीकारा करणे अवघडच जाते ते काही असो, वैष्णवदेवीच्या दर्शनार्थ, बर्फाची अतिवृष्टी असलेले महिने सोडल्यास, लाखो भाविक दरवर्षी जात असतात. काही जण तर पंढरीच्या वारी प्रमाणे दर वर्षी जात असतात इंदिरागांधी वैष्णवदेवीच्या दर्शनार्थ येत असत. काश्मीरचे माजी मुख्य (नव्हे, पंत) प्रधान डॉ. फरुख अब्दुल्ला सुद्धा पंतप्रधान बनल्यानंतर वैष्णव देवीच्या दर्शनासाठी जाऊन आले होते

जम्मूला आल्यानंतर वैष्णव देवीचे दर्शनास जाणे हे प्रवाशाच्या श्रद्धेवर अवलंबून आहे मात्र लष्करीदृष्टया हे स्थान किती महत्वाचे आहे ते तिथे गेल्यानंतरच लक्षात येते.

खुद्द जम्मू शहरात पाहण्यासारखी काही स्थाने आहेत. प्रवाशाजवळ वेळ किती आहे त्यावर ते अवलंबून आहे.

जम्मू शहर जम्बूलोचन नावाच्या राजाने तीन हजार वर्षापूर्वी शिवालिक टेकडीवर वसविले. टेकडीच्या पायथ्याशी तवी नावाची खूप रुंद नदी वाहते. पूर्वी राजधानीचे नाव "बहु" होते. कालान्तराने जम्मू नाव प्रचलित झाले जम्मू टेकड्यांवर असल्याने पुष्कळच स्वच्छ आहे. इथल्या बजारपेठा आकर्षक आहेत. जम्मूत आल्यानंतर आपण एका निराळ्या प्रांतात आलो असे एकदम वाटायला लागते. तिथल्या लोकांची

शरीरयष्टि, पोशाख, भाषा (डोग्रा जमात ) व्यवहार, चालीरिती, निराळ्या वाटतात.

जम्मू शहर हे काशीप्रमाणे मंदिराचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. यातले सुप्रसिद्ध मंदिर म्हणजे शहराच्या मध्यभागी वसलेले रघुनाथ मंदिर होय. त्या मंदिराजवळच "रघुनाथ संस्कृत ग्रंथालय" आहे त्यात अत्यंत दुर्मिळ अशी हजारो संस्कृत भाषेतील हस्तलिखिते धूळ खात पडली आहेत यातील ज्ञानभांडार खुले अवश्य झाले पाहिजे पण, धर्मनिरपेक्ष भारतात कोणत्या धर्माची विशेष पायमल्ली होत असेल तर ती वैदिक हिंदुधर्माची, आणि संस्कृत भाषेला तिच्या दुर्दैवाने धर्माशी व ब्राह्मण वर्गाशी निगडित करण्यात आल्यामुळे संस्कृत भाषेचे अध्ययन करणे हे जुनाट व प्रतिगामी समजले जाते.

जम्मू शहरात आणखी पाहण्याजोगे म्हणजे पूर्वी डोग्रा राजे (करण-सिंग हे डोग्रा आहेत) राज्य करीत त्यांचे राजवाडे, यात जुने सचिवालय आहे या राजवाड्यात जुने शिल्पकाम अप्रतिम आहे शिवाय, फुले, वेली, पक्षी याची चित्रे छतावरील नक्षीकाम अनुपम सौंदर्याचा अनुभव देतात.

शहराच्या विरुद्ध बाजूला म्हणजे तवी नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यालगत "बहुकिल्ला" आहे. हा कोणी बांधला ते अज्ञातच आहे इतका तो प्राचीन आहे. यात कालीमातेचे मंदिर आहे. तेही अत्यन्त प्राचीन आहे. दर मंगळवारी व रविवारी शेकडो लोक देवीची पूजा करण्यासाठी जातात.

बहूकिल्ल्यापासून जवळच दुसऱ्या एका टेकडीच्या शिखरावर एक भग्न पावलेली वास्तू आहे. झांशीच्या किल्ल्याप्रमाणे या वास्तूचा इतिहासही झाशीच्या राणीलक्ष्मीसारखाच आहे, या टेकडीवरूनच १४०० वर्षापूर्वी डोग्रा राणी महामायाने शत्रूंशी टक्कर दिली होती आणि लढता लढता धारातीर्थी पतन झाली.

जम्मूमधील आणखी एक प्रेक्षणीय स्थान म्हणजे शभर वर्ष जुना असा अमरमहाल राजवाडा. हा राजवाडा जम्मू शहरातील एका टेकडी-

वर असून सर्वात उच आहे. डॉ. करणसिंगचे पितामह राजा अमरसिंगने हा राजवाडा बांधला व त्यासाठी फ्रेंच आर्किटेक्टरला बोलावले होते. या राजवाड्यात हल्ली उत्तमोत्तम पहाडी पेंटिंग्ज् आहेत व विशाल ग्रंथालय आहे

जम्मू शहराच्या आसपास अनेक ऐतिहासिक, पौराणिक व धार्मिक स्थळे आहेत. जम्मूपासून २६ कि. मी अंतरावर बावा जितोची समाधि आहे. तिथल्या जहागिरदाराच्या पाशवी वर्तनाविरुद्ध याने लढा दिला होता व स्वतःची कुमारी मुलगी आणि आपलेही वलिदान त्यात केले. या ठिकाणी कार्तिक पौणिमेला मोठी यात्रा भरते इथून जवळच सुप्रसिद्ध अखनूर आहे चिनाब नदी याच स्थानाहून मैदानात प्रवेश करते. इथले शिव मंदिर पाहण्यासारखे आहे

जम्मूच्या उत्तरेला १०२ कि. मी. वर "रामनगर" आहे. वेळ असल्यास व रुची असल्यास या ठिकाणास अवश्य भेट द्यावी. कारण भारतात अत्यन्त बहुधा पाहण्यात न येणारी पहाडी स्टाईलची म्यूरल पेन्टिंग्ज् रामनगर मधील रंगमहालात पहायला मिळतात यातील रंगाचे मिश्रण, त्यातील क्वचित उन्मत्तपणा, बव्हशी भव्यता, त्याचप्रमाणे निसर्ग शोभा काही प्रेमकहाण्याची चित्रे, त्यात राधा-कृष्ण आलेच ही सर्व चित्रे तीन महालात आहेत व ती पाहताना मनुष्य बाह्य जग विसरतो इतकी ती आकर्षक व चित्तवेधक आहेत

शुद्ध महादेव हे आणखी एक सुप्रसिद्ध भेट देण्यासारखे ठिकाण आहे याचे महत्त्व म्हणजे जम्मू-काश्मीर राज्यातील एकमेव लोहस्तम्भ इथे आहे ज्यावर प्राचीन लिपीत कोरलेला लेख आहे. यातील पुष्कळशी अक्षरे कालमानाच्या ऋतुसहाराला ( हवा, ऊन, पाऊस, बर्फ )बळी पडली आहेत. भविक लोक या स्तम्भाची महादेवाचा त्रिशूल म्हणून पूजा करतात. महादेवासबंधी अनेक कथा इथे प्रचलित आहेत. हे ठिकाण 'देवक' नदीच्या काठी आहे आणि पुराणात या नदीला गंगेपेक्षाही अधिक पवित्र मानली आहे. इथली शिवपार्वतीची मूर्ती काळ्या संगमरवरी पाषाणाची आहे व अत्यन्त चकाकणारी,

तेजस्वी आहे. जंगलपहाडातून उडी घेत मैदानात धावू लागणाऱ्या देवक नदीच्या काठावरील हे स्थान फार रम्य आहे. इथली नीरव शांतता व प्रसन्न वातावरण यात मानव डुंबला जातो व इथून जावेसे वाटत नाही.

जम्मूहून श्रीनगर रस्त्यावर 'पत्नी टोप' (पत्नी –तप? ) याचा उच्चार 'पाटनी टोप' असाही काही जण करतात, आहे. तिथे बस थाबते 'पत्नी –तप' हे साडेसहा हजार फूट उचीवर असून ज– का. शासनाने ते टुरिस्ट केंद्र म्हणून विकसित केले आहे. या केंन्द्रात सनासर,कुड, बटोटे, शुद्ध महादेव या स्थानांचाही समावेश केला आहे. पाटनी टोप हे एक अतिशय रमणीय ठिकाण आहे वनश्रीने नटलेले, शान्त वर्दळ नाही, सृष्टिसौंदर्य चहुकडे विखुरलेले. काही सौंदर्य – स्थळ (ब्यूटी स्पॉटस् )भान हरपणारी आहेत–ज्याना गिरोहर्यणाची वा "हायकिंग" ची आवड आहे त्यानी तर पाटनी टोपला अवश्य मुक्काम ठोकावा. पाटनी टोपपासून कुड व बटोटे हे राष्ट्रीय महामार्गावरच अनुक्रमे ८ व १२ कि. मी आहेत. ही ठिकाणे सुद्धा टुरिस्ट आकर्षणे आहेत शासकीय "कॉटेजेस" "हटस्" खेरिज खाजगी हटस् आणि कॉटेजेस सुद्धा प्रवाशासाठी आहेत व त्यात सर्व सोयी आहेत.

राजौरी आणि किश्तवार ही दोन शहरे राष्ट्रीय महामार्गावर नाहीत. राजौरी चे मूळचे नाव राजपुरी. राजौरीची ख्याती, तिथून जवळच असलेल्या उष्ण पाण्याच्या झऱ्यासाठी. या झऱ्यातील पाण्याने रोज स्नान केल्याने काही दिवसातच त्वचा रोग नष्ट होतात. यासाठी अनेक त्वचा रोगपीडित लोक इथे येतात.

किश्तवारची प्रसिद्धी श्रीनगरजवळीच पाम्पोरेप्रमाणे केशरासाठी आहे. तसेच 'सफायर' इथे आढळतो. किश्तवारचे केशर अधिक रंगदार आहे, आणि पाम्पोरेचे केशर अधिक सुगंधी आहे. हा त्यातील मुख्य फरक पाम्पोरेप्रमाणेच किश्तवारलाही केशराची लागवड विशिष्ट मर्यादित क्षेत्रातच होते, अन्यत्र होत नाही. हा सुद्धा सृष्टीचा चमत्कारच म्हणायचा

'सफायर' किश्तवारपासून ११५ कि. मी. वर पद्दर नावाचे अगदी हिमालयाच्या कुशीत असणारे स्थान आहे, पद्दर १४००० फूट उंचीवर आहे. तेव्हां तिथे जाण्याचे धाडस धाडशी तरुणांनीच करावे किश्तवार-पासून पद्दर पर्यंन्तचा बस रस्ता पक्का झालेला नाही. 'सफायर' गेल्या शतकात प्रथम आढळले. त्यानतर गेल्या काही वर्षात खाणी खणल्या जाऊन ते "रत्न" विपुल प्रमाणात हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# काश्मीर

## प्रास्ताविक

काश्मीरला बस केव्हाही पोचली तरी तिथे ( म्हणजे बस टर्मिनस जिथे आहे) काश्मीर शासनाचे टूरिस्ट ऑफिस उघडेच असते. ते २४ तास उघडे असते, व तिथे तुम्हाला हवी ती माहिती वा मार्गदर्शन मिळू शकेल. तुम्ही अगोदर एखाद्या हॉटेलात रिझर्व्हेशन केले असल्यास, टुरिस्ट सेन्टरवरून त्या हॉटेलात फोन करू शकता. एखाद्या मित्राकडे किंवा नातेवाईकाकडे उतरायचे असल्यास व तुमची बस रात्री ९, ९॥ पर्यंत पोचली असल्यास (किंवा सकाळी) आणि तुमच्याजवळ पूर्ण पत्ता असल्यास टॅक्सी किंवा आटोरिक्शाने तुम्ही तिथे जाऊ शकता. मात्र, तुम्ही येणार हे त्या मित्रास अथवा नातेवाईकास माहीत असणं अत्यंत आवश्यक आहे. मित्र किंवा नातेवाईक फार मोठा ऑफिसर असले तरच त्यांच्याकडे दूरभाष असेल. तसेच, त्या मित्राने वा नातलगाने टूरिस्ट सेंटरवर तुम्हाला घ्यायला यावे अशी अपेक्षा बाळगणे हे तुमच्या त्याच्या संबंधावर अवलंबून आहे. भारतीयांची तिथे वस्ती म्हणजे सैन्यात- (हवाईदल आणि आर्मी) शासनात नोकरी करणारे माझ्या माहितीप्रमाणे फक्त एकच श्री. सदानंद भावे हे आय. ए. एस. ऑफिसर असून नागपूरचे राहाणारे आहेत. यांचे स्थानांतर जम्मू, काश्मीर, लडाख, इ. ठिकाणी होऊ शकते. तुम्हाला मित्र वा नातेवाईकाकडे उतरायचे असल्यास काही गोष्टी ध्यानात घेतलेल्या बऱ्या- तो मित्र, नातेवाईक लष्करात कोणत्या हुद्यावर आहे ! अर्थात संकष्ट

लेफ्टनंटपासून कमिशन्ड अधिकाऱ्यांची सुरवात होते. सेकन्ड लेफ्टनंट, लेफ्टनंट, कॅप्टन, मेजर ले.कर्नल, ब्रिगेडियर, इ. इ. इंडियन एअर फोर्स-मध्ये पायलट ऑफिसरपासून सुरवात होते. तत्पूर्वी सगळे एयरमेन असतात. पायलट ऑफिसर, फ्लाईंग लेफ्टनंट, स्क्वॉड्रन लीडर, विंग कमाण्डर, ग्रुप कप्टन, एअर कमांडर, एअर व्हाईस मार्शल, एअर मार्शल इ. इ. एयरमेन लोकात ज्युनियर वॉरंट ऑफिसर ते मास्टर वॉरंट ऑफिसरच्या लोकांजवळ रहायला जागा बऱ्या असतात व तुम्ही गेलात तर फारशी अडचण पडणार नाही. अधिकाऱ्यात फ्लाईंग ऑफिसरपर्यंतचे अधिकारी बहुधा तरुण, अविवाहित असतात व ते मेसमध्ये राहतात. फ्लाइट लेफ्टनटच्या वरच्या अधिकाऱ्याना चांगल्या जागा राहायला असतात. स्क्वॉड्रन लीडर ते ग्रुप कॅप्टनपर्यंन्त तीन बेडरुम्स, तीन टॉयलेट, बाथरुम्स अशी ऐसपैस जागा असते. तेव्हा त्यांच्याकडे उतरायची अडचण पडायला नको. आर्मीतही कॅप्टनपासून पुढे चांगल्या जागा मिळतात. नॉन कमि-शन्डमध्ये सुभेदार–मेजरलाही जागा चांगली असते– अडचण होऊ नये. अर्थात् तुम्ही ज्याचकडे जाल तो तुमचा अत्यंत जवळचा नातेवाईक किंवा घनिष्ट मित्र असला तर जागेचा प्रश्न निर्माणच होत नाही. काही वेळस मित्रत्व असते पण मित्राच्या बायकोला आपले जाणे पसंत आहे किंवा नाही ते ओळखून जावे. तसेच, मित्र असला तरी त्याच्याकडे आपण त्याला गैरसोय होईल असे कधीच वागू नये. उदा. जेवायचे किंवा नाही हे सांगणे आवश्यक आहे, बाहेर पडल्यावर परत केव्हा येणार हे सांगण जरूर आहे ज्या ठिकाणी जायचे असेल, त्या ठिकाणाचे नाव सांगणे जरूर आहे. कारण, तुम्हाला काही अपघात वगैरे झाल्यास आणि यायला तुम्हाला उशीर झाल्यास त्याना चौकशी करायला बरे.

श्रीनगरला हॉटेल्स पुष्कळ आहेत व त्यात भरपूर सोयी असतात. तुमचा खिसा किती गरम आहे यावर हॉटेलची निवड करावी. मी परि-शिष्टामध्ये काही प्रमुख हॉटेल्सची नावे, उपलब्ध असणाऱ्या सोयी, ही माहिती दिली आहे. १९८२ पासून पुण्याच्या एका महाराष्ट्रीय युवकाने श्रीनगरला गेस्ट हाऊस सुरू केले आहे. त्या गेस्ट हाऊसचे नाव "पूना–

सेलम–गेस्ट हाऊस–" सचालक बिनय दातार. श्रीनगरचा पत्ता– ५१, राजबाग–कुर्सु एटेक्स्नशन (ऑपोझिट दास स्कूल), श्रीनगर (जे–के.) १९०००८ बसेस थाबतात तिथून फार लाब नाही. टेलिफोन त्यावेळी नव्हता. आता बहुधा आला असेल– दातारांचे ऑफिस पुणे आणि दिल्ली इथे पण आहे. पुण्याचा पत्ता– ७६/ ६ शांती–शीला सोसायटी, फिल्म इन्स्टिटयूट जवळ, पुणे ४११००४ फोन .– ५०६५२. दिल्ली ऑफिसचा पत्ता– पूना गेस्ट हाऊस, १२ A/१५, सरस्वती मार्ग, डब्ल्यू–ई–ए–करोलबाग, न्यू दिल्ली ११०००५. फोन–५६६७८०

मुबई–पुणे, नागपूर, इ. मोठचा शहरातून प्रवासी कंपन्या खूप निघाल्या आहेत. त्या दरवर्षी भारतातील प्रवास आखतात त्यापैकी कोणती कंपनी चांगली, याची चौकशी करून त्या कंपनीमार्फत गेल्यास तुम्हाला कसलीही अडचण होऊ नये. माझा धाकटा भाऊ पत्नीसह राजा ट्रॅव्हल्सने काश्मीरला गेला होता. त्याने मला सागितले की, पैसे थोडे अधिक पडतात, पण प्रवास आरामात होतो. सेवानिवृत्त वा साठीला पोचलेल्या माणसांना तर या कपन्या फार चागल्या असे माझ्या भावाने मला सागितले.

अर्थात्, कपनी लघुत्तमसाधारणविभाज्य काढून, कोणती ठिकाणे दाखवायची हे अगोदरच ठरवीत असते व तो कार्यक्रम तुम्हाला अगोदर कळविला जातो याखेरीज अन्य ठिकाणाना भेट द्यायची असल्यास, काही कंपन्या १, २ दिवस यात्रेकरूसाठी मोकळे सोडतात त्या दिवशी तुम्ही खरेदी पण करू शकता कपनीची काही दुकाने पण श्रीनगरला ठरलेली असतात; व शक्य असल्यास कपन्या आपला गाईड तुमच्या॰ बरोबर पाठवितात ही दुकाने सहसा गिऱ्हाईकांना (म्हणजे कपनीच्या) फसवत नसावीत असे वाटते.

पुष्कळ वेळा, काश्मीरला जायचे आपले अचानक ठरते त्यावेळी ट्रॅव्हल कपनीला लिहून उपयोग नसतो. अशावेळी काय करावे असा प्रश्न पडतो. तशी काळजी करण्याचे कारण नाही. श्रीनगरला पोचल्यावर टुरिस्ट सेंटर तुम्हाला मदत करील, कुठे उतरायचे (पैशाप्रमाणे) ते सांगेल. नतर,

शासनातर्फे 'ए' क्लास डीलक्स बसेस, टॅक्सीज, सकाळपासूनच टुरिस्ट सेंटरच्या आवारात उभ्या असतात. त्या तुम्हाला निरनिराळ्या ठिकाणी घेऊन जातात. खाजगी बसेस सुद्धा असतात या बसेस सकाळी आठ साडे आठला निघतात आणि संध्याकाळी सहाला परत येतात

विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक सूचना द्यावीशी वाटते. ती म्हणजे, परतीचे पण रिझर्व्हेशन करून ठेवावे. कारण श्रीनगराला व जम्मूला उन्हाळ्यात (एप्रिल, मे, जून) प्रवाशाची इतकी गर्दी असते की "ब्लॅक" ने तिकिटे विकली जातात. भारतातल्या विमान कंपनीचा इंडियन एयर लाईन्स्चा माझा अनुभव काही चांगला नाही; (आणि एयर इंडियाचाही माझा अनुभव चांगला नाही सरदार खुशवंतसिंगने मात्र एयर इंडियाची फार तारीफ केली आहे) म्हणून, रिझर्व्हेशनचा खुंटा पक्का हलवून बळकट करावा रेल्वेचे रिझर्व्हेशन परतीचे तुम्हाला करा- यला वेळ मिळाला नसल्यास, जम्मू स्टेशनावर गाडी थांबताच रिझर्व्हेशन करावे. गडबडीत विसरलात तर, श्रीनगरला 'लाल चौक' म्हणून शहराच्या मध्यभागी घड्याळ असलेला टॉवर चौक आहे. त्याचे जवळच रेल्वेचे रिझर्व्हेशन सेंटर आहे, तिथे करावे.

पुष्कळशा शाळांतून विद्यार्थ्यांच्या सामूहिक ट्रिप्स काश्मीरला जात असतात, किंवा काही साहसी तरुण मोटर-सायकलवर काश्मीरची ट्रिप करतात. शाळांतल्या मुलामुलींची ट्रिप असल्यास, त्या ट्रिपचा चालक शिक्षक जो असतो त्याच्यावर काही जवाबदारी अनिवार्यपणे येऊन पडते. पहिली गोष्ट, कोणत्या ऋतूत ट्रिप न्यायची, त्याप्रमाणे कपड्यांची व्यवस्था केलेली बरी. मार्च-एप्रिल नंतरच, विशेषत मे-जून महिन्यात अथवा दिवाळीच्या सुटीत शाळांच्या ट्रिप्स जातात. ऑक्टोबरचा महिना ट्रिपला चांगला. कारण थोडी थंडी पडायला सुरुवात होते. मी तिथे अस- ताना ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यातच ऐन दसऱ्याच्या दिवशी बर्फ पडायला सुरुवात झाली होती तेव्हा, ऑक्टोबरमध्ये ट्रिप न्यायची असल्यास गरम कपडे, पांघरूणे, मफलर इ. अवश्य हवेत. सृष्टिसौंदर्य

या महिन्यात सुद्धा असते व फळेही (सफरचंद ) मिळतात. मे–जून महिन्यात अधिकतर ट्रिप्स येतात. त्यावेळी काश्मीरचे सौंदर्य विशेष दिसते. कारण असंख्य फुले डवरलेली असतात. काश्मीरी गुलाब ही चीज तिथे पहायला मिळते. शिवाय, अनेक रंगीबेरंगी फुले फुललेली असतात. एखादी अनुपम सौंदर्यवती भर ज्वानीत जशी दिसेल तसे हे सौंदर्य "रायट ऑफ् कलर्स "

ट्रिपच्या संचालकाने फर्स्ट एड बॉक्स बरोबर बाळगणे आवश्यक आहे. आयोडीन, डेटॉल, ॲस्पिरीन, कफ–खोकल्याच्या गोळया, कापूस, इ. इ. एखाद्या शाळेत उतरण्याची सोय होऊ शकणार नाही. कारण,शाळा त्यावेळी सुरू असतात या शाळांना हिवाळयात सुटी असते. तेव्हा, उतरण्याची सोय पक्की करावी. श्रीनगरला यूथ होस्टेल आहे.△ तिथे उतरण्याची सोय होऊ शकेल किंवा नाही याची चौकशी करावी. कॉलेज तरुणानी पण याचा फायदा घ्यावा. अन्यथा हॉटेलमध्ये राहण्याची सोय होऊ शकेल श्रीनगरला लाल चौकात सनातन धर्म धर्मशाळा ही तीन–चार मजली उंच इमारत आहे. १९८२ सालापर्यन्त त्याचे व्यवस्थापक श्री. बकाया होते. (त्यानंतर मी काश्मीरला गेलो नाही. तेव्हा मला माहीत नाही )मी श्री. बकायांना भेटून आलो आहे धर्मशाळेत मोकळे हॉल्स राहण्यासाठी आहेत. वीज आहे खाली पाणी आहे. या धर्मशाळेत उतरायला वस्तुत हरकत नाही, पण व्यवस्थापक लोक मला उत्साही वाटले नाहीत. मी त्याना म्हणालो की, भारतात तुमच्या धर्मशाळेची तुम्ही योग्य ती प्रसिद्धी करा. उतरणाऱ्या माणसांकडून संस्थेसाठी दान घेत जा. लोक खुशीने देतील. पण, या सूचनांचा काही उपयोग झाला असे मला वाटत नाही. माझ्या लेखांवरून काही जणांनी या धर्मशाळेच्या व्यवस्थापकाशी पत्रव्यवहार केला असता, उत्तर देण्याची आवश्यकताही व्यवस्थापकाला वाटली नाही. पण धर्मशाळा आहे व तिथे मोठमोठे हॉल्स आहेत. हे मी स्वत. पाहिले आहे.

---

△ पत्ता .– डायरेक्टर, यूथ वेल्फेअर सर्व्हिसेस ॲन्ड स्पोर्टस्; जे ॲन्ड के. गव्ह. टागोर हॉलजवळ, श्रीनगर. (जे के. )

साहसी तरुणांचा जो ग्रुप मोटर-सायकलवरून (मोटरने अथवा रेल्वेने) काश्मीरला यतो. त्यांनी हॉटेलमध्ये उतरायला हरकत नाही. पण ज्यांना 'लाईफ् एन्जॉय' करायचे आहे त्यांनी तलावावरील हाऊस बोटीत मुक्काम करावा तसेच 'हनीमून' ला आलेल्या किंवा अन्य प्रेमी युगुलांनी, पतिपत्नींनी छोटयाशा हाऊस बोटमध्ये उतरावे. पैसे थोडे जास्त पडतील पण तरगत्या पाण्यावरील घरात राहणें एक आगळेच सुख आहे. हल्ली मोटारीचा सुळसुळाट झाल्याने मुंबई-हर्णे, दापोली हा प्रवास बोटीने करण्यापेक्षा मोटरनेच लोक अधिक करतात. तसेच, परदेशात जायचे असले तर विमानानेच जातात. बोटीने कोणीही जात नाही. एकतर मुंबई ते लंडन हा बोटीचा प्रवास १८ दिवसांचा आहे. (बोट लंडन शहराला लागत नाही न्यूकॅसल, लिव्हरपूल, साऊथॅम्पटन, न्यू हार्वे, इ. बंदराना लागते, तिथून आगगाडीने लंडनला यावे लागते.) इतका वेळ हल्ली आहे कुणा जवळ? दुसरी गोष्ट सुएझ कालवा पॅसेन्जर वाहतुकीला बंद आहे, आणि दक्षिण आफ्रिकेच्या केप ऑफ गुडहोपला वळसा घालून पॅसेन्जर बोटींना जावे लागेल. ते अशक्य आहे तिसरी गोष्ट, हल्ली विमान प्रवास पूर्वी सारखा महाग नाही १९५५ पर्यन्त अनेक वर्षे मी विमान व बोटीने प्रवास केलेला आहे. बोटीचे भाडे लंडन ते मुंबई विमानापेक्षा स्वस्त होते एवंच, अनेक कारणांमुळे हल्ली बोटीचा प्रवास बंद झाला आहे व त्यात काय सुख असते याच्या अनुभवाला लोक पारखे होत आहेत. माझा स्वतःच अनुभव असा आहे, की बोटीचा प्रवास मोटर किंवा विमानापेक्षा फार सुखदायी असतो मी तर मुंबईहून अलिबागला सुद्धा बोटीनेच पुष्कळ वेळा गेलेलो आहे. हे सारे विस्ताराने लिहायचे कारण, तलावावर तरंगणाऱ्या हाऊस-बोटीतून राहण्याचे सुख जरूर अनुभवा. मात्र त्यासाठी पैसे खर्च करण्याची ऐपत व इच्छा हवी. या बोटी तलावात फेऱ्या मारीत नाहीत. तलावातून हिंडायला 'शिकारा' नावाच्या होडया असतात. त्या डल लेक आणि नवीन लेकमधून हिंडवतात -यासंबधी अधिक विवरण व माहिती पुढे दिली आहे.

## काश्मीर

"त्रिभुवनात कैलास हे सर्वोत्तम स्थान आहे. हिमालय हा कैलासाचा सर्वोत्कृष्ट भाग आहे आणि हिमालयात काश्मीर सर्वात उत्तम स्थान आहे" या शब्दात "राजतरंगिणी' लिहिणाऱ्या कल्हणाने काश्मीरचे वर्णन केले आहे. मोगलांपैकी जहांगीर बादशहाला तर काश्मीरने वेड लावले होते. अशा या भूवरील स्वर्गात काही दिवस विहार करण्याची इच्छा प्रत्येकाला व्हावी हे साहजिक आहे व काश्मीर ती इच्छा पूर्ण करायला समर्थ आहे.

### काश्मीरची पौराणिक दंतकथा

काश्मीरचे सृष्टिसौंदर्य, अनंत मनोहारी रंगसंगतीची उधळमाप, पाचूची कुरणे, स्फटिकवत शुभ्र जलौघ, उंच झाडे, उत्तुंग पर्वत आणि सौंदर्यात न्हाऊन निघालेल्या काश्मीरी रमणी –प्रत्येक प्रवाशाने, चिनी, जर्मन, मुसलमान, ब्रिटिश, पार्शियन, ग्रीक, काश्मीरची मुक्त कंठाने स्तुती केली आहे.

काश्मीरचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हजारो वर्षापासून चीन, तिबेट मधून व्यापारी काश्मीरात येत व भारतात जात.

भूगर्भशास्त्रज्ञांच्या मते, भारत व आफ्रिका पूर्वी एक होते. कोट्यावधी वर्षापूर्वी पूर्व ते पश्चिम भूभाग दुभंगला आणि 'तेथीस' सागर निर्माण होऊन दोन भूखंड अलग झाले, उत्तरेकडे अंगारा व दक्षिणेकडे गोण्डवन या दोन्ही भूखंडातील नद्या तेथीस सागरात मिळत. गोंडवन भूगात प्रचण्ड ज्वालामुखीचे उत्पात होऊन भूखंडाचे आणखी तुकडे झाले. एक मोठा तुकडा नर्मदा, तापी हल्ली जिथून वाहतात, तो. सुमारे पाच कोटी वर्षापूर्वी तेथीस सागरातून हिमालय शिखरे वर आली, आणि भारत देशही जलाशयातून वर आला. उत्तरेकडील पर्वत–शिखरांचे तीन भाग पडतात. १) पश्चिम २) मध्य ३) पूर्व. या सर्वात दिमाखात उभी राहणारी मध्य पर्वतराजी होय. ही मध्य पर्वतराजी उत्तरेकडील पर्वतांच्या कोटाचा मध्यबिंदू होय. ही पर्वत रांग बलुचिस्तानातील अफगाणपासून ब्रह्मदेशातील आराकानपर्यंत पसरलेली आहे. काश्मीरमधील नंगा पर्वत व

ब्रह्मपुत्रावरील तिबेटमधील नमचा बर्वा यातील पर्वतशिखरे म्हणजे हिमालय होय. मध्य हिमालयाच्या दक्षिणेस १३,१२३ ते १६,४०४ फूट उचोपर्यंतची पीर पांजाल पर्वतराग आहे (श्रीनगरहून पीरपाजाल स्पष्ट दिसतो.) पीरपाजाल आणि हिमालय यात काश्मीरचे नंदनवन खुलले आहे. अगदी प्रारंभी काश्मीर खोरे अंडाकृती आकाराचे होते–८१ मैल लांब आणि १८ मैल रुंद.

त्या विशाल जलाशयातून काश्मीरचा भूभाग हळूहळू प्रकट होऊ लागला, त्याचे नाव 'सतिसार' असे होते सती पार्वती, हिमालयाची कन्या, तिच्यावरून हे नाव पडले. हिमालयातून वाहणाऱ्या बर्फौघाने सतीसार भरलेले असे कश्यप ऋषीने या रम्य स्थानावर आपला आश्रम बांधायचा ठरविले व त्यासाठी भूभाग निर्माण व्हावा म्हणून आपला पिता ब्रह्म ह्याची आराधना करायला सुरुवात केली कश्यपाचे तप पाहून शिव प्रसन्न झाला व कश्यपाची इच्छा पूर्ण होईल असा आशीर्वाद दिला ब्रह्मा, विष्णु व शंकर या तिघांनी एकत्र येऊन विचार विनिमय केला ज्या शिखरावर ही त्रिमूर्ती बसली होती त्या शिखरांना या दैवताची नावे आहेत आणि त्या सुंदर जलाशयाला कौनसार नाग (कदम–सारस, पायथ्याशी असणारे सरोवर) उर्फ विष्णुपाद नाव पडले.

कश्यपाचा मानसपुत्र नीलनाग, त्याने आपल्या पित्याला सांगितले की, जलाद्भव नावाचा दैत्य जलाशयात राहत असून आसपासचा प्रदेश छिन्न-विच्छिन्न करीत आहे. तेव्हा विष्णुने त्या दैत्याचे पारिपत्य केले आणि ती भूमी कश्यपाला राहायला निर्विघ्न केली. कश्यपाने आश्रम बांधला तेव्हा त्या भूभागाचे नाव कश्यपमार, कालांतराने 'काश्मीर' असे झाले नील-नागाने मग तिथे माणसाची वस्ती सुरू केली–असे म्हणतात की, नीलनागचे वास्तव्य अजूनही त्या क्षेत्रात 'बनिहाल पास' च्या पायथ्याशी 'बेर' उर्फ 'बेरीनाग' जिल्ह्यात आहे.

काश्मीरची भूमी इतकी सुपीक, समृद्ध असण्याचे कारण म्हणजे त्या त्या जलाशयातील हिमालयातून आणलेली द्रव्ये

वितस्ता नदी पीठिका आणि उगम – श्रीनगरमधून जी नदी वाहते व जिच्यावर शहरात नऊ पूल आहेत, तिला झेलम म्हणतात, पण तिचे मूळ नाव वितस्ता कश्यप ऋषीने काश्मीरचे वसन केल्यानंतर, त्याने शंकराला प्रार्थना केली की, त्याच्या जटात जी गंगा आहे, तिला काश्मीर-मधून वाहू द्यावे शंकराने तत्काल आपला त्रिशूल जमिनीत खुपसला, त्याबरोबर जमिनीतून जलधारा उडाल्या तीच वितस्ता नदी होय. ज्या ठिकाणी शंकराने त्रिशूल खूपसला होता ते नीलनाग (वेरीनाग )जवळ आहे. वितस्ता नदीचा 'जन्म दिवस' भाद्रपद शुक्ल त्रयोदशीस पडतो. त्या दिवशी नदीची मोठ्या भाविकतेने पूजा केली जाते व तिला खीर अर्पण करतात

काश्मीरचा प्राचीन आणि अर्वाचीन त्रोटक इतिहास

कल्हणने आपली 'राजतरंगिणी' इ स. च्या बाराव्या शतकात लिहिली. 'राजतरंगिणी' च्या नावावरून स्पष्ट होते की त्यात राजांचा इतिहास दिला आहे आपल्या ग्रंथासाठी कल्हणाने मंदिरे, देवळे, धार्मिक इमारती यावरील कोरलेले लेख वाचले, ताम्रपटावरील लेख वाचले, निरनिराळ्या नाण्यावरील लेख वाचले व जनतेत प्रचलित असलेल्या कथांचाही संग्रह केला. या सर्वांचा उपयोग त्याने आपल्या ग्रंथासाठी केला कैकेक शतकापासून सुरुवात करून कल्हण त्याचा प्रारंभ काली संवत (ख्रि पू, ३०७६ ) च्या चैत्र शुद्धपासून गणतो, आणि त्याच्या संवतातील ६५३ संवत्सरात पहिला गोनंद राजा होऊन गेला असा उल्लेख करतो हा काळ पांडव राजा युधिष्ठिराच्या राज्यारोहणाचा असावा. गोनंद हा फार पराक्रमी होता व जरासंधाचा मित्र होता. कृष्ण–जरासंध युद्धात जरासंधाच्या बाजूने गोनंद लढला होता व त्यात पतन पावला होता. कृष्णाने गोनंदच्या विधवा राणीस–यशावतीस-सिंहासनावर बसविले. तिच्यानंतर दुसरा गोनंद गादीवर बसला त्याच्या-नंतर राज्यावर ५२ राजे बसले. या ५२ राजांचा राज्यकाळ २२६८ वर्षे होता. त्याच्यानंतर गोनंद तिसरा. इथून पुढे २२३० वर्षांचा म्हणजे

इ. स  ११४९-५० पर्यन्तचा इतिहास आहे या वर्षी कल्हणाचा मृत्यु झाला अशोकाच्या साम्राज्यात काश्मीरचाही अन्तर्भाव होता आणि श्रीनगर, पुराणाधिष्ठान अशोकाने बसविले असे म्हणतात. अशोकानंतर त्याच्या मुलाने जालुकाने नरनाग इथं मंदिरे बांधली हुस्क, यश्क, कनिष्क यानी काश्मीरवर राज्य केले. त्याच्या स्मृतीचे अवशेष अजूनही त्यांच्या नावाच्या गावावरून शिल्लक आहेत. हुस्कपूर (हल्लीचे उषार), यश्कपूर (झाकुरा), कनिष्कपूर (कनिसपूर) ही सर्व गावे बारामुल्ला जिल्ह्यात आहेत

अशोकाच्या मौर्य वंशानंतर (खि्र पू. तिसरे शतक) आणि कनिष्काच्या कुशाण वंशानंतर (इ. स दुसरे शतक) श्वेत हूणाच्या टोळधाडी मध्य आशियात आल्या. त्यांचा पुढारी "तोरामन" त्याला काश्मीरी जनतेने "त्रिकोटीहन नाव दिले होते (म्हणजे तीन कोटीचा पारिपत्य करणारा). त्याच्या मुलाने, मिहिरकुलाने इ. स ५१५ त भारतावर स्वारी केली व तो काश्मीरपर्यंन्त आला होता. हूण लोकाचे परिपत्य चद्रगुप्ताचा नातू स्कन्दगुप्ताने केले (सहावे शतक). त्यानतर अनेक राजे होऊन गेले काहींनी उभारलेली स्मारके अजून टिकून आहेत.

गोपादित्य राजाने गोपादरी टेकडीवर (जिला शंकराचार्यांची टेकडी असे हल्ली नाव आहे) ज्येष्ठेश्वराचे मंदिर बांधले प्रवरसेन दुसरा, याच्यानंतर मातृगुप्त हा राजा गादीवर आला मातृगुप्त हा फार सज्जन, धार्मिक प्रवृत्तीचा राजा होता त्याला "साधु" च म्हणायचे. मातृगुप्ताने अशोकाच्या राजधानीचे पुनरुज्जीवन केले आणि चांगले शहर (सहाव्या शतकात) वसविले तेच हल्लीचे श्रीनगर होय 'राजतरंगिणी' चा भाषांतर कर्ता स्टेनने म्हटले आहे की, भारतात काश्मीर हा असा एकच प्रान्त आहे की ज्याचा अखण्ड इतिहास लिहायला लेखी साहित्य उपलब्ध आहे. काश्मीरचा इतिहासहा उज्ज्वल आहे व वैभवशाली परंपरा आहे इ. स. पूर्वी १००० वर्षापासून इ. स. १००० पर्यन्त काश्मीरने प्रतिभासपन्न विद्वान पंडिताची साखळीच निर्माण केली होती या विद्वानाची ख्याती जगभर पसरलेली होती.

## मंदिरे बांधणारा राजा ललितादित्य

दुर्लभवर्धन राजाने इ स ६२७ मध्ये कारकोट राजवंश सुरू केला. दुर्लभवर्धनाने इ स. ६४९ पर्यन्त राज्य केले. इ. स ६४९ मध्ये ललितादित्य मुक्तपोड सिंहासनावर बसला. राजा ललितादित्य हा फार पराक्रमी राजा होता, त्याने काश्मिरच्या उत्तरेकडील व आग्नेय-ईशान्ये• कडील मुलुख काबीज केला, आणि आपल्या विजयाचे स्मारक म्हणून मार्तंण्ड हे सुप्रसिद्ध मदिर बाधले. हे मदिर फार भव्य होते व याचे अवशेष अजूनही त्या भव्यतेची साक्ष पटवितात त्यानंतर त्याने परिहासपूर शहर बसविले. हे शहर श्रीनगरच्या वायव्येस २१ कि. मि वर आहे या शहराचेही अवशेष पहायला मिळतात. स्वत: राजा ललितादित्य हा विष्णु-भक्त होता, तरी पण त्याने आपल्या बौद्ध व शिवभक्त प्रजेसाठी विहार आणि शिव मदिरे बाधली.

ललितादित्यानतर त्याचा मुलगा जयपीड गादीवर आला व त्याने इ स. ७३६ पर्यन्त राज्य केले. आपल्या पित्याप्रमाणे जयपीडानेही आपल्या राज्याचा विस्तार वाढविला व बंगालपर्यन्त सरहद्द नेली जयपीडनतर अनेक दुर्बल राजे होऊन गेले, ते अजातपीडपर्यन्त अजातपीडने ८१३–८५० इ. स. राज्य केले व त्याने पद्म नावाच्या आर्किटेक्टकडून पाम्पोरे नगर बसविले. अजातपीडची स्मृती त्याने बांधलेल्या सुदर मदिरां वरून शिल्लक आहे अवनीपूरची मदिरे त्यानेच बाधविली. जयपीडनतर त्याचा मुलगा शकरवर्धन गादीवर (८३३–९०२ इ. स.) आला. त्याने शंकरपुरा(पट्टन) इथे सुदर मदिर बांधले.

शंकरवर्मननतर हा राजवंश नष्ट होऊ पहात होता, पण दिद्दा राणीने राज्य सावरले रीजन्ट म्हणून ९५८–९८० इ स. पर्यंत तिने राज्य कारभार पाहिला आणि९८० ते१००३ इ स. पर्यन्त राणी म्हणून,हिचा पति क्षेमगुप्त हा एक दुर्बल राजा होता आणि त्याचा मृत्यु ९५८ मध्ये होई-पर्यन्त राज्याचा कारभार तीच पहात होती श्रीनगरमधल्या झेलम-वरील सहाव्या पुलाजवळील उपनगरास तिनेच नाव दिलेले आहे. दिद्दा ही

लोहारा राज्याच्या सिंहराज राजाची राजकन्या होती. या लोहारातील लोहकोट किल्ल्याला गझनीच्या महमूदने वेढा घातला. दीद्दाच्या मृत्यू-नंतर तिचा पुतण्या संग्रामराजा गादीवर आला तेव्हा त्यावेळी गझनीच्या महमूदने ही स्वारी केली होती. नेपोलीयनला ज्याप्रमाणे मास्कोतील बर्फाने हटविले त्याप्रमाणे महमूदला काश्मीरच्या बर्फाने गोठून टाकले व तो परत फिरला, संग्रामराजाच्या मृत्यूनंतर १०४९ इ स. पर्यन्त सरदार लोकांचे प्राबल्य राहिले त्यातील प्रमुख म्हणजे दमारस. त्याच्या मृत्यूनंतर पुढली तीनशे वर्षे काश्मीरमध्ये बंडाळी, पुंडाई, खून अशा दुरवस्थेत गेली. १३२४ इ. स. पर्यन्त नादान राजे कसेबसे राज्य सांभाळीत होते इस्लामचा यावेळी केवळ उदयच झाला नव्हता तर सुफीवादाचे आकर्षणही हिंदु धर्माच्या भक्तीपंथाशी जुळता असल्याचे, जनतेला वाटत होते. १३२४ च्या सुमारास लडाखच्या ग्यालवो रिनचिन राजाने आपली हद्द काश्मीरपर्यन्त भिडविली. त्याने इस्लाम धर्माचा स्वीकार केला व सदर उद्-दिन नांव धारण केले. पण तो लवकरच म्हणजे १३२७ त मरण पावला.

शहामीर या महत्त्वाकांक्षी सरदाराने सदरउद्दीनच्या विधवा राणीशी (कोटा राणी )लग्न केले राज्याची गादी बळकावण्याचे त्याचे स्वप्न पुरे होताच, राणीचा, म्हणजे स्वत:च्या बायकोचाच, त्याने खून केला. (१३३८ इ स.). त्याने शमसुद्दीन नाव धारण केले आणि काश्मीरमध्ये आपली सलतनत सुरू केली त्याने १३४१ पर्यन्त राज्य केले. त्याच्या नंतरचे आलेले राजे बव्हंशी प्रजेचे हित पाहणारे निघतात, पण १३९१ मध्ये शिकन्दर भुरिशकानच्या काळात परिस्थिती बदलली. शिकन्दर भुरिशकान प्रथम सुस्वभावी व प्रजाहितदक्ष होता,पण त्याच्या मुख्यमंत्र्याच्या प्रभावामुळे त्याच्या स्वभावात बदल झाला. त्याचा मुख्यमंत्री सुहाबट्ट हा पूर्वी हलक्या जातीतील हिंदु होता. तो विलक्षण महत्त्वाकांक्षी व पाताळयंत्री होता त्याने इस्लाम धर्म स्वीकारला आणि तो हिंदु असताना ज्या संपूर्ण हिंदूनी त्याला कमी लेखले होते, त्या सर्वांवर त्याने सूड उगविला त्याच्या कारवायाना व दुष्ट मसलतींना बळी पडून शिकन्दरहि

क्रूर बनला आणि हजारो निष्पाप हिंदुना त्याने ठार केले. त्याच्या जुलमी कारभारापासून रक्षण करण्यासाठी हजारो हिंदू भारतात आले

सुदैवाने शिकदरचा मुलगा झैन–इल्– अबिदिन (१४२१-१४७२) बापाच्या उलट स्वभावाचा निघाला. आजही त्याची तारीफ काश्मीरमध्ये ऐकायला मिळते जनता प्रेमाने त्याला "बादशहा" या नावाने संबोधते. त्याच्या नावाचा एक मोहल्लाही आहे. त्याला संस्कृत भाषेचे प्रेम होते व हिंदूच्या तीर्थांनाही तो भेटी देई. दुर्दैवाने बादशहाच्या मृत्यूनंतर त्याच्या नंतर आलेले सुलतान जुलमी निघाले आणि अराजकता पसरली. १५८६ मध्ये अकबराने काश्मीर पादाक्रान्त करीपर्यंन्त ही परिस्थिती सुरू होती. अकबराने श्रीनगरच्या हरिपर्वताभोवती तीन मैलांची भिंत बांधली आणि सुंदर बगीचे निर्माण केले जगप्रसिद्ध काश्मीर बगीच्याबरोबर, अकबराने काश्मीरला शालीचा उद्योग सुरू केला होता. आज काश्मीरी शाली जगप्रसिद्ध आहेत

मोगलांनी लडाखवरही स्वारी केली होती, पण तेथील राजाने दिल्ली दरबारचे मांडलिकत्व पत्करून ती आपत्ति टाळली

नादीरशहाच्या स्वारीपर्यंन्त काश्मीर मोगलांच्या ताब्यात होते. नादीरशहाने काश्मीर अफगाणिस्तानला जोडला. पंजाबमध्ये शीखांनी आपली सत्ता प्रस्थापित केली व रणजितसिंगने १८१९ मध्ये अफगाणच्या दोस्त महमदखानवर स्वारी करून काश्मीर आपल्या वर्चस्वाखाली आणले. जम्मूवर यावेळी डोग्रा राजा गुलाबसिंगचे राज्य होते.

रणजितसिंग १८३९ त मृत्यू पावला व त्यानंतर सहा वर्षे अंदाधुंदीत गेली. १८४५ त सर हेन्री लॉरेन्सला ब्रिटिशांनी काश्मीरचा प्रशासक नेमले. जम्मूचा राजा गुलाबसिंगने पूर्वी रणजितसिंगाचे मांडलिकत्व मान्य केले होते, पण रणजितसिंगच्या मृत्यूनंतर पंजाबमधील अस्थिरता पाहताच, मोठ्या धूर्ततेने ब्रिटिशांशी सख्य केले. १८४६ मध्ये ब्रिटिशांनी काश्मीरला पंजाबपासून तोडून, गुलाबसिंगला ७५०,००० पौंडाना काश्मीर विकले. पंजाब पूर्णपणे आपल्या ताब्यात आणण्यासाठी ब्रिटिशांना आणखी

दोनदा लढाया कराव्या लागल्या, पण डोग्रा राजाचे स्वामित्व जम्मू — काश्मीर–लडाखवर अबाधित राहिले, ते १९४७ पर्यन्त.

१९४७ नतर

१९४७ च्या १५ ऑगस्टला भारत स्वतन्त्र झाला, आणि फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली, (या पाकिस्तानच्या हिश्शातून पुढे स्वतत्र बगला देशची निर्मिती झाली (१९७१ डिसेंबरमध्ये). पाकिस्तानची निर्मिती हे भारताची कायमची डोकेदुखी आहे भारत सोडताना व त्याचे तुकडे करताना, ब्रिटिशानी भारतातील देशी सस्थानिकांना पाकिस्तानला मिळायचे की भारताला याचे स्वातत्र्य सस्थानिकाना ठेवले होते. त्याला अनुसरून काश्मीर सस्थान भारतात विलीन झाले–कारण १९४८ मध्ये पाकिस्तानने काश्मीरवर स्वारी केली होती व भारताची ऐनवेळी कुमक मिळाल्यामुळेच काश्मीर पाकिस्तानपासून अर्धे बाचले. बाकीचा अर्धा भाग सयुक्त राष्ट्राच्या आदेशाप्रमाणे पाकिस्तानकडेच राहिला वस्तुत: काश्मीरच्या राजाने काश्मीर सस्थान विलीन केल्यानतर, पाकिस्तानी सैन्याला सपूर्णपणे काश्मीरमधून हाकलून देऊन भारताची सार्वभौम सत्ता सपूर्ण काश्मीरवर प्रस्थापित करणे हा भारताचा अधिकारच होता, पण माऊण्टबॅटनच्या डावपेचाला बळी पडून प. नेहरूंनी युद्ध थांबविले व काश्मीरचा प्रश्न माऊण्टबॅटनच्याच सांगण्यावरून युनोत गेला. त्या योगे पाकिस्तान व भारत याचे सबध कायमचेच शत्रुत्वाचे राहिले. पाकिस्तानव्याप्त काश्मीर व भारतातील काश्मीर याच्यात 'युद्धतहकुबी रेषा' आहे

१९६२ मध्ये चीनने भारतावर स्वारी केली व भारताचा बराचसा उत्तरेकडील भाग व्याप्त केला आहे तो भाग लडाख जवळील होता.

काश्मीर सपूर्णपणे भारताचा भाग आहे का? काश्मीरी लोक स्वत ला भारतीय, इडियन समजात का? काश्मीरची घटना स्वतत्र आहे त्याच्या मुख्यप्रधानाला चीफ मिनिस्टर म्हणत नाहीत, प्राईम मिनिस्टर म्हणतात. भारताच्या घटनेत ३७० वे कलम आहे. त्यायोगे काश्मीरला

आपले "स्वातंत्र्य" अबाधित राखता आले आहे हे कलम "तात्पुरते" आहे, पण ते आता 'कायम' झाले आहे. त्याप्रमाणे शेडयूल्ड कास्ट व ट्राईब याना काही वर्षांपुरत्या दिलेल्या सवलती आता कायमच्याच झाल्या आहेत. ३७० व्या कलमाप्रमाणे कोणताही भारतीय काश्मीर-जम्मू-लडाख मध्ये मालमत्ता खरेदी करू शकत नाही, जमिनी, घरे विकत घेऊ शकत नाही, त्या सरकारात नोकरी करू शकत नाही—अर्थात् काश्मीरचे लोक हे भारतात हवा तो धुमाकूळ घालू शकतात. नोकऱ्या, मालमत्ता, आदि. त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काश्मीरी लोकांना भारतात अधिक नोकऱ्या आहेत व त्यानी प्रॉपर्टी पण केली आहे पं. नेहरु ते राजीव गांधी भारताचे प्राईम मिनिस्टर्स राहिले ते काश्मीरी. त्यामुळे काश्मीरी लोकांचे वर्चस्व खूपच आहे राजीव गांधीचे वडिल फिरोज गांधी हे पारशी होते, तेव्हा राजीव गांधी वस्तुत पारशी म्हणायला हवेत. कुणास कळे ते स्वत:ला काय समजतात! त्यांच्या निकटवर्तीयात अरुण नेहरु व फोतेदार हे काश्मीरीच आहेत असो ३७० कलमाबद्दल व एकदर काश्मीर—भारत संबंधावर पुष्कळ अधिक उहापोह करण्यात आला आहेच. मात्र एकदोन गोष्टी लक्षात ठेवणे जरूर आहे. काश्मीरवर भारत सरकारने आतापर्यन्त अब्जावधी रुपये ओतले आहेत काही वर्षे तर काश्मीरी लोकांना "सब्सी-डाईज्ड" अन्नधान्य, साखर, मिळत असे दुसरी गोष्ट, सबंध काश्मीरची सरहद पाकिस्तान व चीनशी जोडलेली असल्याने, भारताचे लाखो सैनिक सीमेवर आहेत. श्रीनगरमध्ये भारताचे मोठे सैन्य आहे. हे नसते तर काय झाले असते याचा विचारच कशाला?

काश्मीरी लोक, चालीरीती, इ. ची त्रोटक माहिती—

"दर्शन" या भागात काश्मीरसंबंधी पुष्कळच वाचायला मिळेल. तूर्त इथे थोडेसे परिचयात्मक लिहित आहे

'काश्मीर' या नावाने ओळखला जाणारे राज्य काश्मीर, जम्मू व लडाख हे तीन भाग मिळून बनले आहे काश्मीरमध्ये श. ९० मुसलमान आहेत ते शिया आहेत. जम्मूमध्ये डोग्रा जमात आहे व जम्मूत हिंदूचे प्राबल्य आहे लडाखमध्ये बहुसंख्य बौद्ध आहेत

### लडाख

लडाखची राजधानी 'लेह्' 'लेह्.' हे खूप उंचावर आहे व इथेही भारतीय सैन्य आहे. लडाखमध्ये 'लेह्' खेरीज पाहण्यासारखे काही नाही. 'लेह्' ला सुद्धा जुने मठ, काही इमारती यापलिकडे पाहण्यासारखे विशेष नाही. भारतीय टुरिस्ट 'लेह्' ला फारसे जात नाहीत एकतर जायचा मार्ग नेहमीच हिमाच्छादित. वर्षातून १० महिने तरी बर्फ असते. ऑक्सिजन वापरावा लागतो. पाश्चात्य लोक मात्र जातात. ते का हे त्यांना विचारल्यावर त्यांच्या उत्तराने भारतीयांचे समाधान होत नाही.

लेहला जायचा एकच मार्ग. मोटरने श्रीनगरहून जावे लागते. विमान वाहतूक नाही. लष्करी विमाने अर्थातच जातात. श्रीनगरपासून लेह जवळ जवळ २०० मैल आहे आणि ह्या प्रवासास दोन दिवस लागतात. यावरूनच प्रवास किती खडतर आहे याची कल्पना येईल. मध्ये कारगीलला मुक्काम करावा लागतो, म्हणजे करणे श्रेयस्कर. कारगीलला टुरिस्ट केबिन्स आणि रेस्ट हाऊसेस आहेत, पण खाण्यापिण्याचे हालच होतात कारण, इथे चांगली रेस्तॉरां नाहीत दूध, चहा मिळणे सुद्धा दुरापास्त असते. यासाठी टुरिस्ट लोकांना महत्त्वाचा सूचना अशी की, निदान दोन दिवसांची खाण्यापिण्याची तरतूद स्वत.जवळ असलेली बरी. कडक थंडीला तोंड देतील असे कपडे असणे आवश्यक आहे हे सांगणे न लगे

लेहला जाणारा मोटारीचा रस्ताही धोक्याचा आहे. मार्गात झोजीला पास (११००० फूट उंच ) आणि फाटुला (१४००० फूट उंच ) पास लागतात. पुष्कळ वेळा इथे वसंत ऋतूतही बर्फ पडते आणि कित्येक दिवस [illegible] इथे अडकून पडतात. लेहला टुरिस्ट बंगले आहेत पण कोणरी हॉटेलमध्ये व्यवस्था त्यापेक्षा बरी असते.

मागे लिहिल्याप्रमाणे लेह्ला पाहण्यासारखे विशेष नाही. लोक संख्या ५ ते ६००० असावी लोक बौद्ध आहेत व इथले लोक तिबेटी लोकां-सारखे दिसतात. त्यांचा पोशाखही तिबेटी लोकांसारखाच असतो इथे दारिद्र्य भरपूर आढळते, पण जीवन अगदी स्वस्थपणे वाहते.

लेहपासून १२ मैलांवर स्तितोक गुम्पा हे लहानशा टेकडीवर ठिकाण आहे. इथे लामाचे फार मोठे मंदिर आहे व ते पाहण्यासारखे आहे या मंदिरात १०० "भिक्षु" राहतात. प्रत्येक भिक्षु स्वतंत्र राहतो. प्रत्येकाच्या दर्जाप्रमाणे भिक्षूना खोल्या १ पासून ७ पर्यन्त असतात. भिक्षु स्वतःचे जेवण स्वतःच बनवितात.

पुढच्या प्रकरणात श्रीनगरची माहिती देऊन, तिथे पाहण्यासारखे काय काय आहे याचेही वर्णन करण्यात येईल–

# श्रीनगर

'पूर्वेकडील व्हेनिस' असे ज्या शहराचे वर्णन केले जाते, स्वित्झर्लंन्ड-मधील कोणत्याही शहरापेक्षा अधिक सुंदर अशी ज्याची ख्याती आहे अशा ऱ्या दोन हजार वर्षांचा इतिहास असलेल्या शहराचे शब्दात वर्णन केल्याने त्याचे सौंदर्य खरोखरच लक्षात येणार नाही. गेली कित्येक वर्षे श्रीनगर आपल्या सृष्टिसौंदर्याने जगातील प्रवाशांचे आकर्षण बनले आहे. अनेक वर्षे ते विद्वत्तेचे माहेरघर समजले जाई. काश्मीरच्या पंडितांपुढे भारतातील अन्य शास्त्री नतमस्तक होत सम्राट अशोकाने ख्रि. पू. पहिल्या शतकात हे शहर वसविले. तेव्हापासून या शहराने आपले महत्त्व कायम ठेवले आहे.

**प्रास्तविक**— हल्लीचे श्रीनगर प्रवरसेन दुसरा (७९ ते १३९ इ. स. राजाने बसविले, व "प्रवरपूर" असे त्याचे नाव होते. जुन्या राजधानीचे नाव "श्रीनगरी" होते. प्रवरसेन राज्यावर आल्यावर स्वत साठी त्याने नवीन राजधानी वसविण्याचे ठरविले. हे स्थान कोणते असावे याच्या शोधात असता, एका रात्री एका ओढयाच्या प्रवाहापाशी एका राक्षसने आपले वाकडे पाय पाण्यात सोडून पुढे जाण्याचा मार्गच त्याने रोखून ठेवला. राजाला त्या राक्षसाची मुळीच भीती वाटली नाही. त्याने तलवारीच्या एका घावात राक्षसाचे पाय तोडले आणि शांतपणे पलिकडे गेला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे राजाच्या या कृत्यामुळे राक्षसाला आनंदच झाला व शहर वसविण्यासाठी मदत करण्याचे त्याने आश्वासन दिले. राक्षसाने

आपले वचन पाळले. दुसरे दिवशी राजाला सारिका पर्वत (हरि पर्वत) च्या पायथ्याशी सीमा रेषा काढलेल्या आढळल्या. राजाने आपले प्रवरपूर शहर तिथेच वसविले. कल्हणाने आपल्या 'राजतरंगिणी' त प्रवरपूरचा उल्लेख केला आहे

प्रवरसेन राजाने शिव प्रवरीश्वर मंदिर बांधले. त्याचे अवशेष अजूनही आढळतात. क्षेमेन्द्र आणि बिल्हणच्या ग्रंथातही याचा उल्लेख आढळतो. चिनी प्रवासी ह्यूएन्त्संग ने ६३१ इ. स. च्या सुमारास या शहराला भेट दिल्याचा उल्लेख आहे व हल्लीच्या श्रीनगर स्थानी ते शहर होते, वितस्ताच्या (झेलम) उजव्या किनारी होते आणि उत्तर-दक्षिणेकडे अडीच मैल व पूर्व-पश्चिम सव्वा मैल पसरलेले आहे असे वर्णन आहे.

राजा अनंतने (१०२८-१०६३ स) याने प्रथमच आपले वास्तव्य नदीच्या डाव्या बाजूस नेले. तेव्हापासून श्रीनगर याला शहराचा दर्जा प्राप्त झाला.

श्रीनगर हे झेलमच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसलेले आहे व झेलमवर एकदर नऊ पूल आहेत.

श्रीनगर हे आशियात संस्कृत विद्येचे माहेरघर समजले जाई. भाषा शारदा लिपीत लिहिली जाई आज शारदा तिची दुर्दैवाने केवळ ग्रंथ. भाषाच राहिली आहे, कारण, 'शारदा ही हिंदूची लिपी आहे आणि जम्मू - काश्मीरची भाषा उर्दू आहे, अरेबिक लिपीतली वस्तुत: उर्दू ही भाषा काश्मीर लोकांवर लादली गली आहे. व्यवहारात काश्मीरी लोक आपसात उर्दू बोलत नाहीत हिंदू व मुसलमान काश्मीरी उर्फ कशूर भाषा बोलतात. ही संस्कृतोद्भव नसली तरी संस्कृतचा परिणाम तिच्यावर बराच झालेला आहे. एक ते दहापर्यंतच्या आकड्यांना ते आक्, ज़्, त्र्, चोअर, पाच, ष, सत, अडट, नाऊ, दा असे म्हणतात. कशूर भाषा दार्डिक, भाषासमूहातून आली असावी व पैशाचीपासून तिचे मूळ असावे असे

विद्वानाचे मत आहे. प्रख्यात भाषाशास्त्रज्ञ ग्रियर्सनच्या मते. पैशाची ही आर्यभाषा समूहातली असली तरी ती इराणियन किंवा इन्डो–आर्यन म्हणता येत नाही.

काश्मीरमध्ये कोणत्या धर्मांचे लोक राहतात याचा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. मुसलमानात सुद्धा "जाती" आहेत काश्मीरच्या दऱ्या-खोऱ्यात "गुजर" राहतात. यांचा धंदा धनगराचा आहे. हे काश्मीरी भाषा बोलत नाही. यांची भाषा पंजाबीशी जुळती आहे व पोशाख पठाणी लोकासारखा असतो. काश्मीरी मुसलमानात शेख, भट, दार, मीर, कुरेश खान या जाती श्रेष्ठ मानतात व यांच्यात लग्ने होतात "वातल" जात म्हणजे चांभाराची "शहा" ही खालची जात समजतात. त्यांचा धंदा तुणतुणे वाजवण्याचा

'शिया' व "सुन्नी" त लग्ने होत नाहीत. मात्र एक गोष्ट सर्व मुसलमानात समान आहे (आणि जगातल्या सर्व मुसलमानाना ती गोष्ट लागू आहे) व ती म्हणजे ते कट्टर इस्लामी आहेत इस्लाम विरुद्ध कोणीही 'ब्र' काढू शकत नाही चर्चा करू शकत नाही महमद पैगंबर बद्दलही चर्चा करू शकत नाही. काश्मीरमध्ये माझे वास्तव्य पुष्कळ वर्षे होते. माझे असे मत आहे की, भारतीय लष्कर हे बिगर मुसलमानाना मोठे आधारस्थान आहे याविषयी अधिक चर्चा मी पुढे केली असल्याने या ठिकाणी अधिक लिहित नाही.

## श्रीनगरमधील सौंदर्य स्थळे

या प्रकरणाच्या प्रारंभी श्रीनगरला पूर्वेकडील व्हेनिस" असे म्हणतात असे लिहिले आहे काहीजणांना श्रीनगरची तुलना स्विट्झर्लंडशी करावीशी वाटते श्रीनगर व इटलीतील व्हेनिसमध्ये तसा पुष्कळ फरक आहे. व्हेनिसमध्ये शहरातून कालवे गेले आहेत. त्यातून "गोंडोला" या छोट्याशा होडीतून फेरफटका मारता येतो. श्रीनगरला डल लेक व नगीन लेक अशी दोन मोठी सरोवरे आहेत त्यातून शिकाऱ्यातून फेरफटका करता येतो. व्हेनिसचे कालवे अरुंद आहेत. डल लेक, नगीन लेक हे मोठे तलाव आहेत व त्यात विस्तीर्णता आहे दुसरी गोष्ट, श्रीनगरमध्ये मार्चच्या

शेवटल्या आठवड्यापासून ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत फुलांची लयलूट असते. विशेषत: मे, जून, जुलै, ऑगस्ट या चार महिन्यात तर फुलांचेच राज्य श्रीनगरवर असते व्हेनिसमध्ये हे सौंदर्य नाही. स्वित्झर्लंड-मध्येही हे सौंदर्य नाही. आणखी एक फरक म्हणजे आसपासच्या पर्वतराजींनी आणलेले– सौंदर्य श्रीनगर नव्हे, तर एकदर काश्मीरच पर्वताच्या कुशीत आहे आणि काश्मीरमध्ये ज्याप्रमाणे टुरिस्टसाठी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत, तशी स्वित्झर्लंडमध्ये नाहीत श्रीनगरच्या बाजारपेठेंची तुलना अन्य बाजारपेठेशी करता येणार नाही इतकी ती अपूर्व आहे आणि या सर्वांना शोभणारे काश्मीरी लोक, काश्मीरी पुरुषांचा पोशाख, त्यांचे हावभाव, त्यांची विनम्रता (पुष्कळ वेळा प्रामाणिक, पण काही वेळेस खोटी) त्यांचा मिास्कलपणा, कुठलेही साहाय्य करण्याची त्यांची तयारी, आणि सर्वांत विलोभनीय म्हणजे तिथल्या स्त्रियांचे सौंदर्य. मी "लाल' राष्ट्रे" वगळता सगळा युरोप पाहिला आहे (इंग्लंड, स्कॉटलॅन्ड, आयर्लंड यात आले ), अरब देश, ईजिप्त पाहिला आहे काश्मीरी स्त्रियांसारखे सौंदर्य मला कुठेच आढळले नाही त्याचा उल्लेख माझ्याकडून अनेक ठिकाणी होणार आहे पण त्याला ते सौंदर्यच कारणीभूत आहे. त्यात कृत्रिमता नाही, दिखाऊपणा, बेगडीपणा नाही रंगरंगोटी नाही. निसर्गाच्या सान्निध्यात चोवीस तास राहणारी, वाढणारी, खुलणारी ही सौंदर्य-सम्राज्ञी आपल्या दिमाखात असते त्यात विलक्षण निर्व्याजता आहे. आपण सुंदर आहोत याची जाणीवही नाही या सौंदर्यात नाटकीपणा नाही. नटणे, मुरडणे नाही. गुलाबाची उपमाच या तरुणीला शोभून दिसते–सुंदर असणे हाच गुलाबाचा स्वभावधर्म.

त्याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, स्त्रिया गरीब गोगल गायी नाहीत त्या भांडण्यात पटाईत असतात. ते भांडणेही अगदी स्वाभाविक वाटते.

### डल लेक, फ्लोटींग गार्डन्स आणि नगीन लेक

श्रीनगरचे पहिले सौंदर्य स्थान म्हणजे तेथील डल व नगीन तलावा.

तून शिकाऱ्यातून सहल करणे. शिकारा प्रथम "चार चिनारच्या" तलावातील छोटयाशा बेटापाशी थांबेल इथे चिनार वृक्षाची चार झाडे आहेत. इथे अर्धापाऊण तास शिकारा थांबतो. काश्मीरी पोशाखात स्त्री–पुरुषांना फोटो काढून घ्यायचे असतील तर तुमची हौस पुरविणारे फोटोग्राफर तिथे विपुल आहेत. चार चिनारानंतर शिकारा हळू हळू पुढे सरकतो शंकराचार्य टेकडी, हरिपर्वत, निरनिराळे बगीचे किनाऱ्यापासून थोडे लांब आहेत. यातून शिकारा पुढे जातो तो "तरंगणाऱ्या बगीचात" (फ्लोटिंग गार्डन्स) शिरतो. हे दृश्य भान हरपणारे आहे. जलाशयात लहान लहान बगीचे व त्यावर लहान लहान झोपडया आहेत. या बगीचात भाज्या उगवतात या फ्लोटिंग गार्डन्समधून जाणारा पाण्याचा प्रवाह अगदी अरुंद आहे व यातून मंदगतीने जाणाऱ्या शिकाऱ्यात बसणे हे स्वर्गसुख आहे. विशेषतः चांदणे पडलेले असावे, थंडी थोडी पडलेली असते अशावेळी वाटते असंच पडून राहावं, अशीच ही छोटी नाव जात असावी, असेच अनंतात जावे. या फ्लोटिंग गार्डन्सनंतर शिकारा नगीन लेकमध्ये शिरतो नगीन लेकमध्ये सिनेमा कंपन्या शूटींगसाठी पुष्कळ वेळा येत असतात. पाश्चात्य लोकांना मर्दानी खेळाचे वेडच असते. नगीन तलावात स्टीमलाँचेसना धरून पाण्यावरून वेगाने जाणारे पाश्चात्य स्त्री–पुरुषच आपण हिंदी नुसते बघे! डल तलावावर व नगीन तलावावर खास करून "जल कुटीरे" ( हाऊस बोट्स ) हजारो आहेत यात शौकीन लोक काही दिवस राहातात ब्रिटिशांनी ज्यावेळी राजा गुलाबसिंगला साडेसात लाख पौंडाला विकले, तेव्हा विकत घेताना राजा गुलाबसिंगने अक्कलहुषारीने व दूरदर्शीपणे एक अट घातली होती की, काश्मीरच्या भूमीवर कोणीही ब्रिटिश जमीन विकत घेऊ शकणार नाही वा मालमत्ता करू शकणार नाही (काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग झाल्यानंतर तीच अट अन्य भारतीयांना लागू असावी हे मोठे लांछन आणि अपमानास्पद आहे! )अर्थात मर्जी असले तितके दिवस ब्रिटिश काश्मीरमध्ये राहू शकत होते! काश्मीरच्या हवेचे, सृष्टीसौंदर्याचे ब्रिटिशांना तर मोठे वेड! बहुतेक गोरे अधिकारी आपली सुटी घालवायला काश्मीरात येत. |(त्याच्यामुळेच गोल्फची

मैदाने निर्माण झाली. ) महाराजाने त्यांना धूर्तपणे सांगावे, "मी जरी काश्मीरचा राजा असलो तरी माझ्यावर हुकमत तुमचीच आहे. तुम्ही जमिनीवर राहिलात तर माझे कायदे तुम्हाला लागू होतील आणि मी अतिशय धार्मिक आहे, माझ्या धर्माप्रमाणे मालकाना नोकरासारखे वागविणे पाप आहे."

ब्रिटिशही धूर्त त्यांना अगोदरच मासळीप्रमाणे पाण्याचे वेड काश्मीरच्या भूमीवर त्यांनी घरे न बांधता किंवा जमिनीवरील महालात न राहता डल लेक आणि नगीन वर आलिशान बोटी बांधायला सुरवात केली. या बोटी म्हणजे सुखविलासाची सर्व साधने त्यात असत सुंदर फर्निचर, नृत्यशाळा, मद्यशाळा, मुदपाकगृह, फ्लशलॅट्रिन्स, बाथटब्ज, झोपण्याच्या प्रशस्त खोल्या एक पूर्ण सजविलेला पाण्यावर तरगणारा लाकडाचा बनवलेला प्रासाद. पहिली हाऊसबोट मि एम टी. केन्हार्डने डिझाईन केलेली, "व्हॉईसरॉय" १८८८ मध्ये बनली व डल लेकमध्ये ती तरगू लागली त्यानतर ही कल्पना इतकी काही आकर्षक ठरली की भराभर पाण्यावरील विलास–गृहे बनू लागली आणि शब्दशः काही हाऊसबोटींवर राजवाडयाइतक्याच सुखसोयी आहेत सुख आणि सोयी, हे लक्षात ठेवा ! त्याचे दरही भरमसाट एका विलासी हाऊसबोटीचे रोजचे सहासात हजार, दहा हजार सुद्धा घेतात. सिनेमा नटांना हे परवडतेच युनोतर्फे जे "निरीक्षक" श्रीनगरमध्ये आहेत, त्याना सर्व सोयीयुक्त घरे पुरवणे हे शासनाचे कर्तव्य आहे एका स्वीडीश निरीक्षकाने हाऊसबोटीत राहणेच पसद केले

काही हाउसबोटींना व्हरान्डा पण असतो. दोनतीन बेडरुम्स, स्वतंत्र स्नानगृहे ( प्रत्येक बेडरुमला एक) व टॉयलेट, नोकरांसाठी लगतच्या बोटीवर राहण्यासाठी. स्वयपाकासाठी खोल्या. हाउसबोटी विजेच्या रोषणाईने सुसज्ज असतात. पुष्कळशा हाऊसबोटी स्थिर असतात. पुष्कळशा पाण्यात आसपास सचारही करतात. अशावेळेस बोटीचे हळुवार तरंगणे फार सुखावह वाटते हा पैशाचा खेळ असल्याने प्रत्येकाच्या

खिशाला परवडणारा हा विलास नव्हे. शौकीनांची आवड लक्षात ठेवून हजारो हाऊसबोटी सेवेसाठी तयार असतात. डायरेक्टर ऑफ् टुरिझमने स्पेशल, फर्स्ट आणि एकॉनॉमी अशा त्याच्या तीन श्रेणी केल्या आहेत. स्पेशल हाऊसबोट म्हणजे कोणत्याही पंचतारांकित हॉटेलसारख्या सर्व सुखसोयी त्यात असतात श्रीनगरचे पुष्कळसे हौशी रहिवाशी चारपाच दिवस मजेने हाऊस बोटीत जाऊन राहतात

**झेलम नदीतून फेरफटका** –ज्याना हाऊसबोटीत राहणे शक्य नाही, त्यानी शिकाऱ्यातून डल लेक व नगीन लेकमधून फेरफटका मारलाच पाहिजे. शिवाय ह्या शिकाऱ्यातून झेलम नदीतून शहरातून फेरी मारावी. श्रीनगर शहरातून झेलम वाहत असते, तेव्हा व्हेनिसच्या गोंडोलातून व्हेनिस शहर पाहाता येते तसे, श्रीनगरही शिकाऱ्यातून पाहता येते श्रीनगर शहर दाखविण्यासाठी सरकारच्या टुरिस्ट बसेसही असतातच, पण नदीवरून सावकाश चालणाऱ्या छोट्याशा होडीतून श्रीनगर पाहण्यात एक मौज आहे काही भारतीय चित्रपटातून नायक नयिकाच्या अमल्या सहलींची दृश्ये दाखविण्यात आली आहेत डल लेक व नगीन लेकवरील दृश्ये तर बहुतेक प्रत्येक हिंदी चित्रपटातून असतात नदीवरील ही छोटी होडी आपल्या सहलीला डल गेट पासून सुरुवात करते. मार्गात ऑल सेन्टस् चर्च, श्रीनगर क्लब (हा "बड्या" लोकांचा क्लब आहे पाश्चात्य संगीत व पाश्चात्य नृत्य इथे असते), गव्हर्मेन्ट आर्टस् एम्पोरियम, म्यूझियम असे टप्पे घेत होडी अमीर कदल (पहिला पूल) पाशी पोचते. इथेच जुना राजवाडा व सुवर्णमंदिर आहे. महाराजा प्रतापसिंग याच मंदिरात प्रार्थनेला येत त्यापुढे हब्बा कदल हा शहरातील खूप गर्दीचा भाग. जुन्या इमारती (काही शंभर वर्षांहून अधिक, या बहुतेक लाकडी असतात) व आधुनिक नव्या इमारती यांची जुगलबंदी इथे पहायला मिळते इथेच पुष्कळशा शाळाही आहेत याच भागात रेव्हरण्ड कॅनन हिन्डेल बिस्कोने सुरू केलेली शाळा आहे या शाळेने शतक पूर्ण केले आहे व आज हिचा (अर्थात्‌च इंग्लिश माध्यम) विस्तारही खूप आहे.

याच भागात काश्मीरचे सर्वात मोठे रघुनाथ मंदिर आहे होडी आता हळुहळू फतेह कादलला पोचत आहे फतेह कदल भाग म्हणजे "क्यूरीओज" मिळण्याचा बाजार लाकडी कोरीव कामे, पेपरमॅशे, कशीदाची कामे, कलाकुसरीची कामे, जरीचे काम, फिलीग्री, चांदीवरील नक्षीकाम, मूल्यवान खडे, इ. इ चे भांडार या बाजारात आहे. तिसऱ्या पुलाच्या उजव्या बाजूस शाहा–इ हमदान मशीद आहे व जवळच काली–मा चा झरा आहे.

**शहा–इ–हमदान** –शहा–इ-हमदान या मशीदीचा इतिहास मनोरंजक आहे तैमूरलगच्या जुलमाला कटाळून पर्शियातील हमदानमधील सैय्यद अली हम्मादानी १३७२ त काश्मीरला आला. त्याला एक ब्राह्मण साधु जपमाळ ओढीत असलेला दिसला सैय्यदने त्या साधूला विचारले, "हे काय करीत आहेस ?" साधु म्हणाला, "देवाची प्रार्थना करीत आहे." सैय्यदने विचारले, "तू साधुपुरुष आहेस काय ?" ब्राह्मण म्हणाला, "असेनही." सैय्यदने विचारले, "मला सांग शहा इ-हमदान कुठे सापडेल?" साधूने काही वेळ डोळे मिटून ध्यान केले, डोळे उघडून तो म्हणाला, "आपणा दोघांपैकी कोणी तरी एक" सैय्यदच्या मनावर साधूच्या बोलण्याचा व त्याच्या आध्यात्मिकतेचा फार परिणाम झाला. साधूच्या सांगण्यावरून इस्लामची सच्ची तत्त्वे सागत तो काश्मीर हिंडला सैय्यद हम्मादानीच्या स्मारकार्थ १३९५ त एक मशीद अमीर–इ–कबीरने बांधली. या माशिदीचे वैशिष्टय असे की ही बांधत असता एकही खिळा किंवा स्क्रू वापरला नाही १४७९ ही मशीद आगीच्या भक्ष्यस्थानी पडली व पुनश्च बांधली गेली. १७३१ मध्ये पुन्हा आगीने नासाडी केली. अब्दुल बरकत खानने १५३२ पुन्हा पूर्वीपेक्षाही अधिक भव्य व सुंदर बांधली ही मशीद १२५ फूट उंच आहे व बांधकाम फार प्रेक्षणीय आहे

**पाथेर मशीद** –झेलमच्या डाव्या किनाऱ्यावर शहा–इ–हमदानच्या खाली पाथेर मशीद आहे हिचे वैशिष्टय म्हणजे संपूर्णपणे लाईमस्टोनची बनवलेली आहे काश्मीर खोऱ्यातील ही फार भव्य मशीद समजली जाते. १६२० मध्ये नूरजहानने (जहाँगीरची बायको) ही मशीद बांधली. नूर-

जहानने आपल्या विलासासाठी सुदर बगीचे लावले व आत्मिक शांतीसाठी ही मशीद बांधली

होडी आता झैना कदलकडेजात आहे उजव्या बाजूस बादशहा मशोदीचा उध्वस्त भाग आहे. असा समज आहे की, या मशीदीतील विटानी देवीचे व्रण नाहीसे होतात.

इथून पुढे जामा मशीद व कॅथेड्रल मॉस्क आहे कॅथेड्रल मॉस्क शहरातील अत्यत सुदर मशीद म्हणायला हरकत नाही. तीन वेळा ही मशीद आगीच्या भक्ष्यस्थानी पडली होती, पण फिनीक्स पक्षाप्रमाणे, अधिक तेज घेऊन आली. इ स १४०० त सुलतान शिकदरने मशीदीच्या बांधकामास सुरुवात केली १४०२ मध्ये त्याचा मुलगा झैन-उल-अबीदीनने ती पुरी केली समरकदहून प्रख्यात कारागीर बोलावले होते दुर्दैवाने १४७९ च्या आगीत ती भस्म झाली. त्यानतर सुलतान शहा हसनने या कामास प्रारंभ केला, पण तो लवकरच मरण पावला. त्याचा सेनापती इब्राहीम मागरेने १५०३ मधे काम पुरे केले. जहाँगीरच्या काळात पुन्हा मशीद आगीने होरपळून निघाली. काश्मीरचा प्रख्यात आर्किटेक्ट व बखरकार मलिक हैदर चौदुराने ती पुन्हा बांधली. औरगजेबच्या काळात १६७४ मध्ये, पुन्हा आगीने तिला स्वाहा केले पण मशीदीचे नशीबच शिकदर मूळ मशीदीचे आर्किटेक्चर सुलक्षन शिकदर व त्याच्या मुलाने केले होते त्याबरहुकूम औरगजेबने मशीद पुन्हा बांधली व आता वैभवात उभी आहे

जामा मशीदीनतर बोट अलि कादल या पाचव्या पुलापाशी येते. ह्याची पुनर्बांधणी झाली आहे. इथे सुप्रसिद्ध मुसलमान फकीर बुलबुल शहाची मशीद आहे. चौथ्या व पाचव्या पुलांच्या मध्ये झैल उल् अबिदिन राजाची कबर आहे. या राजाची स्तुतीस्तोत्रे अजूनही काश्मीरची जनता गाते झैन उल् अबिदिनची कबर नदीच्या उजव्या किनाऱ्यावर आहे त्या जागी पूर्वी मदिर होते कम्पौंडमध्ये अजूनही काही शिलालेख सापडतात व ते पाली भाषेत कोरलेले आहेत. रे. अँस्टने या शिलालेखांचा

अभ्यास केला होता काश्मीरमधले हे सर्वात जुने शिलालेख समजले जातात

आता बोट नवा कदलपाशी [illegible]
दे. रामजू धर याने बांधलेले सुंदर मंदिर आहे. इथेच कोटा कालवा नदीला येऊन मिळतो. तिसऱ्या पुलाच्या खालीच हा संगम आहे.

या कालव्यातून बोट पुढे सफा कदल म्हणजे सातव्या पुलापाशी येते. इथेच एक अत्यंत जुनी धर्मशाळा आहे पूर्वीच्या काळी व्यापारी लोक इथे विसावत पुलाच्या जरा खाली एक धरण नदीचा प्रवाह, उंचावण्या साठी बांधले आहे इथे मासे इतके आहेत की तुमच्या मांडीवर एखादा खेळता खेळता उडी मारून यायचा, त्याच्या पार्श्वभूमीवर पर्वतराजी शोभा वाढवितात. कालव्याच्या डाव्या बाजूस काश्मीर व्हॅली फुड कन्ट्रोल डिपार्टमेन्टची धान्याची कोठारे आहेत. टन्कीकदलमधून बोट आता पुन्हा नदीत शिरते, आणि पहिल्या पुलापाशी तसुन्त कोल कालव्यातून गेली होती, (या कालव्याचे पाणी चिनार बागला जाते) त्यातून पुन्हा जाते. पुरासाठी बांधलेल्या गेटखालून जाऊन डलगेटपाशी बोट येते व एक [illegible]

शालीमार गार्डन्स ( प्यार का गुलिस्तान )

सर जॉन मार्शलने ( ब्रिटनचा सुप्रसिद्ध वनस्पतीशास्त्रज्ञ) शालीमार गार्डन्स पाहिल्यानंतर उद्गार काढले होते, "आग्र्याच्या ताज-मधील बगीचे किंवा लाहोरचे शहादारा बगीचे, श्रीनगरच्या बगीच्यांपुढे फिके होत. कारण, शालीमार गार्डन्सच्या आवतीभोवती विशाल पर्वत, बर्फाच्छादित शिखरे, उंचच उंच झाडांची जंगले व त्यात शालिमार गार्डन्स! आणि काश्मीरच्या फुलात व वृक्षात जे सौंदर्य आहे ते भारताच्या सपाट मैदानावरील एकाही फुलाला किंवा झाडाला येणार नाही!"

शालीमार! प्रेमशाला! जुन्या काळी राजा प्रवरसेन दुसरा, सुख–स्वामींना भेटायला जायचा तेव्हा इथे राहत असे. हे साधु हरवनपाशी

राहात राजाने बांधलेले विश्रामगृह कालांतराने नष्ट झाले पण त्या जागी सुंदर बगीचे निर्माण झाले काश्मीरचा चौदाव्या शतकातील सुफी संत शेक नूर–उद्–दिन (उर्फ नंद ऋषि) ला श्रीनगरच्या शालिमार गार्डन्स-मध्ये बोलावले असता तो म्हणाला, "मी जर आता या बगीच्यांना भेट दिली तर स्वर्गात जायची मला इच्छा राहाणार नाही"

१६१९ मध्ये जहांगीर बादशहाने या ठिकाणी "फरा बक्श" म्हणजे 'हर्षोल्लास' बगीचा निर्माण केला. आपल्या बेगमेवर (मेहर–उन्–निसा उर्फ नूरजहान) आपल्या प्रीतीचे प्रतीक दर्शविण्यासाठी व तिच्या गुलाबी सहवासात विलास भोगण्यासाठी फरा बक्शची योजना होती. पाण्यासारखा पैसा खर्च केला गेला १७२७ मध्ये, झफरखानने (शहाजहाँ बादशहाच्या कारकीर्दीतील शेवटल्या काळातील सुभेदार उर्फ गव्हर्नर) या बागेचा आणखी विस्तार केला व त्याला फैज बक्श (उर्फ समृद्ध) असे नाव दिले

डल लेकपासून श्रीनगरच्या पूर्वेला चिनार झाडाच्या रांगा असलेल्या रस्त्यावर हे बगीचे आहेत यांची लांबी–रुंदी ५४०×१८३ मीटर्स (१७७०×६०० फूट) आहे. याची रचना म्हणजे एकावर एक असे चार सौध (टेरेसेस्) आहेत. याच्यामधून, चकचकीत पॉलीश केलेला दगडांच्या किनारी असलेला कालवा वाहतो. याचे पाणी हरवनमधून येते अशा तऱ्हेने वाहते पाणी बगीच्यात आणून बगीच्यात कारंजी व कास्केड्स (जलप्रपात) बांधण्याची कला इराण व मध्य आशियातील कारागीरांनी आणली असे म्हणतात हे कारागीर प्रथम अकबराने हिंदुस्थानात आणले. तिकडील समरकंद व फरगणा प्रमाणे किंवा त्याहूनही अधिक काश्मीरचे सौंदर्य पाहून उद्याने निर्माण करण्याची योजना अकबराने सुरू केली व त्याच्या मुलाने–सलीम उर्फ जहांगीरने व जहांगीरच्या बेगमेने त्याची परमोत्कट सीमा गाठली.

या चार सौधातील चौथा म्हणजे विलासी स्थान होते. नूरजहानच्या वेळची याची शान आता राहिली नाही. हा केवळ बादशहा व जनान• खान्यासाठी राखून ठेवलेला होता यातील कारंजातून व जलप्रपातातून

दीपांची रोषणाई झळकत असे अजूनही त्या विलासाच्या खुणा दिसतात. सकाळी सूर्योदयाचे वेळी चिनार वृक्षांच्या गर्द पर्णराजीतून सूर्याची कोवळी किरणे येतात व पाण्याला सोनेरी मुलामा देतात. ते दृश्य फारच विलोभनीय दिसते

**निशात–बाग (विलासोद्यान)**

नूरजहानप्रमाणेच तिचा भाऊ असफखान सुद्धा बगीच्याचा शौकीन होता. डल लेकच्या किनाऱ्यावर आणि जबरवनाच्या पायथ्याशी, डललेकचे सौंदर्य आणि पीर पाजाल पर्वताची भव्यता यांची पार्श्वभूमी साधून असफखानने एक अतिशय रमणीय उद्यान निर्माण केले. सूर्योदयाचे वेळी तलावातील चंदेरी लाटांवर चकाकणाऱ्या बर्फ शिखराची प्रतिबिम्बे दिसतात, तर सध्याकाळी सूर्यास्ताचे वेळी इंद्रधनुष्याचे रंग पाण्यात दिसतात आणि उद्यानांतील हिरवी पाचूची मैदाने, कोमल प्रफुल्लित फुले, कारंजी, जलप्रताप सोनेरी रंगाने न्हाऊन निघतात. हे दृश्य फार विलोभनीय दिसते अनेक भारतीय चित्रपटातून या उद्यानात झालेले चित्रीकरण दिसेल, परंतु, सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळची अप्रतिम शोभा कुणी टिपलेली माझ्या पाहाण्यात नाही. असफखानाने १८००'×११२०' क्षेत्रफळाच्या या उद्यानामधून कालवा नेलेला आहे या कालव्याच्या दोन्ही बाजू, पॉलिश केलेल्या दगडांनी बांधलेल्या आहेत व त्याच्या किनाऱ्याला दोन्ही बाजूस रंगीबेरंगी फुलांचे ताटवे लावले आहेत. कालव्याच्या बाजूस सायप्रस व चिनार वृक्ष आहेत एकंदर सारेच दृश्य फार मनोवेधक दिसते.

१६३३ मध्ये असफखानाने जहांगीरला, म्हणजे आपल्या मेव्हण्याला या बागेत जंगी पार्टी दिली. बगीचा पाहून जहाँगीर इतका खूष झाला की असफखानास त्याने इशारे केले. ते इशारे ध्यानी येताच असफखाँ विलक्षण बेचैन झाला, पण आपल्याला काही समजलेच नाही असे त्याने भासविले. जहांगीरला मोठा क्रोध आला व त्याने या बगीच्यास पाण्याचा पुरवठा करण्याचा मनाई हुकूम जारी केला एकामागून एक तारी थुई

थुई नाचणारी कारजी कोरडी, पडली आणि फुलाचे ताटवे मरगळून पडले. त्या बागेची निगराणी करणाऱ्या माळ्याला ते पाहवेना. त्याचे तर या बागेवर फारच प्रेम होते. त्याने गुपचूपपणे पाण्याच्या प्रवाहाचे दरवाजे उघडले. ते कळताच जहांगीर विलक्षण क्रोधाविष्ट झाला व माळ्याला जिवंत गाडण्याचा तो हुकूम देणार होता, पण, अशी कथा आहे, की अनारकलीने रदबदली केल्यामुळे माळयाचे प्राण वाचले. येवढेच नव्हे तर आपल्या शालिमारला जिथून पाण्याचा पुरवठा केला जायचा तिथून याही बागेला पाणी देण्याची व्यवस्था केली.

**नसीम बाग** – अकबराने १५८६ त काश्मीर काबीज केले. १५८८ त त्याने नसीम बाग निर्माण केली या बागेत त्याने १२०० चिनार वृक्षांची लागवड केली म्हणजे, या बागेतील अनेक वृक्षाचे आयुष्य चारशे वर्षांचे आहे। नसीम बाग निशात बागच्या समोर आहे, व डल लेकच्या दुसऱ्या बाजूस आहे; हा बगीचा सर्वात जुना समजला जातो. या बगीच्याची पार्श्वभूमी १३,००० फूट उंच असलेल्या हिमशिखराची आहे, उजव्या बाजूस हरिपर्वत आहे. बगीच्याच्या उजव्या बाजूस गोड पाण्याचे झरे आहेत सूर्योदयाचे वेळी पक्ष्याचे कूजन, सूर्यकिरणांची शोभा, चिनार वृक्षाचे आदबशीर झुलणे–फार भान हरपणारे आहे, म्हणूनच या उद्यानास 'प्रभातीची झुळूक' म्हणतात या बागेत चिनार वृक्षाची नर्सरीपण आहे

**चश्माशाही (शाही निर्झर)**

श्रीनगरला बगीच्याचे सौंदर्य अनुपम आहे व त्यात भर घालणारे चश्माशाही. भारतीय चित्रपटातून याचे देखावे पुष्कळदा घेतले गेले आहेत. शहाजहानच्या हुकमावरून त्याचा सुभेदार अलिमर्दानखानने १६४२ त चश्माशाही बांधला. चश्माशाही एक छोटासा कुंज व त्यात ३६०×१२६ फुटांचा उड्या मारणारा निर्झर यातील पाणी अत्यंत मधुर आहे पूर्वीपेक्षा या बगीच्यात पुष्कळसे टेरेसेस बांधले गेले आहेत या झऱ्यातले

पाणी कारंजातून पुढे वाहत जाते व खालच्या टेरेसवर कृत्रिम १६ फूट जलप्रपात काळ्याशुभ्र दगडाचा बनविला आहे तिथे उडया घेते.

असे म्हणतात की, खुद्द महादेव चष्माशाहीची रचना पाहून फार प्रसन्न झाले व त्यांनी अलिमर्दानखानला रात्री स्वप्नात दर्शन दिले. सकाळी उठल्यावर अलिमर्दानखानने एक स्तोत्र रचले त्याची सुरुवातीची ओळ आहे– "ज्याला मी काल रात्री स्वप्नात पाहिले तोच खरा परमेश्वर शम्भू महादेव" वसंत ऋतूत चष्माशाही गार्डनमध्ये उभे राहिले म्हणजे फारच मनोहर दृश्य दिसते हिमशिखरावरील बर्फ चिलळत असते व ते चकाकत असते, समोर डल लेक, आजूबाजूस हिरवीगार पाचूसारखी दिसणारी कुरण, हरिपर्वताचा उतार आणि चष्माशाही टेकडी, लाल आणि पांढऱ्या फुलांनी बहरलेली व आत निर्झराचे गाणे

इथल्या सौंदर्याचा व शांततेचा मनमुराद आस्वाद प्रवाशांना घेता यावा म्हणून ज का शासनाने जवळच 'टुरिस्ट हट्स्' बांधल्या आहेत. या हट्स्मधून प्रत्येकी दोन, तीन शय्यागृहे आहेत (स्नानगृहे जोडलेली), सुसज्ज स्वयंपाकघर, गरम व थंड पाण्याचे (चोवीस तास) नळ आणि आधुनिक फर्निचरने सुसज्ज–ज्यांच्या खिशाला परवडते अशांनी या पर्णकुटीत काही दिवस अवश्य राहावे रिझर्व्हेशन अगोदर करावे लागते. कारण, नट नटया आणि "नोव्होरिच्" या हट्स्मधून राहायला येतात. या "नूतन कुबेरा" जवळ पैसा खूप असतो व चष्माशाही हट्स्मध्ये राहाणे "प्रेस्टिजस्" असते म्हणून ते राहातात. ते कसे राहातात व ते गेल्यानंतर त्या हट्स्ची काय दुर्दशा होते ते पाहिल्यावर दु ख होते. खर म्हणजे ज्याला सौंदर्यदृष्टि आहे, सृष्टिसौंदर्याची तहान आहे, निसर्गाची आवड आहे, पर्वत, नद्या, कालवे, ओढे, फुले याचे ज्याला आकर्षण आहे त्यानेच काश्मीरला यावे काश्मीर काही इटलीतला कॅसिनो नव्हे किंवा पॅरिसप्रमाणे शृंगारिक चेष्टा देणारे नव्हे म्हणूनच हे नूतन कुबेर श्रीनगरला ओबेरॉय हॉटेलमध्ये उतरणे अधिक पसंत करतात. काश्मीरची ट्रिप करून आलो हे सांगण्यासाठी काश्मीरला जायच

चष्मा–इ–साहिबी – डल लेकच्या दक्षिण बाजूस, चिनारांच्या राईत, मलबेरी व चेरी झाडांच्या गर्द सावलीत एक स्थान सतीण रुपा भवानीचे आहे. तिथे अत्यंत शुभ्र पाण्याचा झरा आहे रुपा भवानीची कहाणी थोडी विलक्षण आहे तिचा जन्म १६२५ त झाला होता सासरी तिचे सासू सासरे तिला फार छळायचे, मारहाण करायचे, नवरा आपल्या आई–वडिलांच्या जुलुमास साथच देत असे. ती महान शिवभक्त होती व हरिपर्वतावरील मंदिरात जाऊन ती पूजा करायची एक दिवस, रात्री तिला दृष्टान्त झाला. तिने घरदार सोडले व या झऱ्याजवळ आली. तिला हे स्थान फार आवडले. अत्यंत शांत, पवित्र १७२१ मध्ये वयाच्या ९६ व्या वर्षी मृत्यू होईपर्यन्त ती इथेच राहिली शहा सादिक कलन्दरने तिच्या- तील सात्विक, आध्यात्मिक व दैवी भाव जाणला होता व तो तिचा भक्त झाला. रुपा भवानीच्या निर्वाणानंतर या जागेस चष्मा–इ साहिबी नाव पडले. तिचे सासरचे घर सफा कदलजवळ होते. तिथे दरवर्षी मोठी यात्रा भरते भाविक लोक चष्मा–इ–साहिबीला दर्शनासाठी जात असतात वसंत ऋतूत व उन्हाळ्यात फुलांचा नुसता पाऊस इथे पडलेला असतो. अत्यंत पवित्र, तपश्चर्या करायला योग्य असे हे स्थान आहे.

जिठयेर–झिष्टादेवीचे कुंड – 'झिष्टा' हा 'ज्येष्ठा' शब्दाचा अपभ्रंश आहे; व त्यापासून 'जिठयेर' हा आणखी अपभ्रंश झाला. 'ज्येष्ठा' हे नगाधिराज हिमालयाची कन्या 'पार्वती' चे नाव या ठिकाणी दैत्यापासून शंकराने पार्वतीला सोडविले व तिच्याशी विवाह केला. सम्राट अशोकाच्या जालुक पुत्राने इथे एक मोठे स्मारक बांधले जुन्या श्रीनगरी राजधानी- जवळ या स्मारकाच्या ठिकाणी महादेवाचे मंदिर आहे; स्वच्छ पाण्याचा झरा आहे. दर गुरुवारी श्रीनगरमधल्या हिंदू स्त्रिया इथे दर्शनाला व पूजा करायला येतात 'ज्येठयेर' ची मनोभावे भक्ती केली तर सगळी संकटे दूर होतात असा स्त्रियांचा अनुभव आहे. पुष्कळ स्त्रिया नवस फेडण्या- करिता इथे येत असतात. विशेषत ज्येष्ठ महिन्यातल्या गुरुवारी तर फारच गर्दी असते. दुरून हे मंदिर एकदम दिसत नाही कारण भव्य चिनार वृक्षांनी, निरनिराळ्या फळझाडांनी ही जागा जणु जनसमुदाया

यासून अलिप्त ठेवली आहे याच झऱ्याजवळ राजा अवंतीवर्मनचा (८५५–८८३) मृत्यू झाला होता. हे स्थान दारा शिकोवने बांधलेल्या परिमहालाजवळच आहे. परिमहाल चश्मा–इ–साहिबी जवळ, डल लेकच्या दक्षिणेस आहे व झबरीवन या पर्वतावर आहे दारा शिकोवची करुण कहाणी सर्वांनाच ठाउक असेल शहाजहांनचा हा सर्वात मोठा राजपुत्र व राज्याचा खरा वारस. दारा कट्टर मुसलमान नव्हता. त्याला हिंदुधर्माबद्दलही प्रेम होते. सुफीझमकडे त्याचा बराच कल होता आपला धार्मिक शिक्षक आखून मुल्ला शहासाठी त्याने 'परिमहाल' बांधला हा महाल केवळ विलासी जीवन कठण्यासाठी बांधला नव्हता तर भिन्न भिन्न धर्मावर इथे चर्चा होई औरंगजेबाने याचा काटा कसा काढला हे इतिहासात नमूद आहेच.

दारा शिकोवने ही जागा निवडण्यात सौंदर्य दृष्टी व आध्यात्मिक दृष्टी, दोघींचे प्रदर्शन केले. इथे उभे राहिले म्हणजे श्रीनगर, तलाव याचे विहंगम दृश्य दिसते 'परिमहाल' च्या स्मृतीसाठी तिथे बोटॅनिकल गार्डन केला आहे. आणि प्रवाशासाठी उतरायला विश्रामगृह व रेस्तॉरॉं पण आहे.

ओबेरॉय हॉटेल–कै महाराजा हरिसिंगाचा हा राजवाडा ज्या ठिकाणी तो बांधला आहे ते म्हणजे 'गुपकार' टेकडीचा उतार. ज्येष्ठेश्वरच्या उत्तरेस हा राजवाडा आहे. इथून डल लेकाचा विस्तार दिसतो. चारमिनार हे छोटे बेट दिसते. नगीन लेक दिसतो इथूनच डॉ. करणसिंग ( भूतपूर्व महाराज ) यांच्या बदामी बागा आहेत व बदामी बागाच्या वर टेकडी चढून गेले की डावीकडे लष्करची सरहद सुरू होते. लष्करी व वैमानिक अधिकाऱ्यांचे सुंदर बंगले, आर्मी (लष्कर) व वैमानिक दलाचे ऑफिसर्स मेसेस आणि नंतर खूप मोठे मिलिटरी बेस हॉस्पिटल आहे. टेकडीवर चढून डावीकडे न वळता सरळ गेल्यास, रस्ता गुपकार रोडवरून शहरात जातो.

शभर एकर व्याप्ती असलेली ही एक "एक्स्क्ल्यूजिव्ह" जागा आहे. तिथे राजवाडा बांधण्यास सौंदर्य दृष्टी निश्चितच होती. अजूनही पूर्वीचे

बगीचे व हिरवळी जतन केल्या जात आहेत ओबेराय हॉटेल्स शृंखलाने हा राजवाडा विकत घेऊन ओबेराय हॉटेलमध्ये त्याचे रुपान्तर केले. या हॉटेलात ऐषारामी ७६ खोल्या आहेत (स्नानगृह संलग्न); व्यक्तीगत "स्वीटस्" (आपण सूट असा उच्चार करतो) आहेत, खाजगी गोल्फ मैदाने आहेत टुरिस्ट लोकांची गर्दी इथे असतेच, कारण पैसे खर्च करायला असतात "प्रेस्टिज" चा प्रश्न असतो. या प्रेस्टिजसाठीच निरनिराळ्या राज्यातील अधिकाऱ्यांच्या मीटींग्ज सुद्धा इथे होतात आणि ते अधिकारी सरकारी खर्चाने पाहुणचार घेतात क्रिकेट कंट्रोल बोर्डाच्या मीटींग्जही इथे होतात. त्यामुळे समाजातील 'टॉप" लोकांचो इथे वर्दळ असते. पूर्वीच्या राजवाड्यात आणखी भर घालून एक विंग जोडले आहे अजून महाराजा हरिसिंगच्या वेळच्या बुखारा कार्पेटस दालनात इथे आहेत. हॉटेलने आपल्या ग्राहकासाठी ( नव्हे पाहुण्यासाठी अथवा मेहमानासाठी ) डल लेकवर "कॅबाना बीच" राखून ठेवले आहे तिथे स्विमिंगसाठी 'पाहुणे' जातात ओबेरॉयमधल्या रात्री आधुनिक युगाला शोभेशा असतात. पाश्चात्य संगीत, पाश्चात्य नृत्य, मद्य, आपण भारतात आहोत असे वाटायला नको.

इथे स्त्रियासाठी "ब्यूटी सलून" पण आहे. इथले "चपराशी" 'उर्फ अटेण्डन्ट" ऐटबाज मोगल पोशाखात असतात.

ओबेरॉय हॉटेल एप्रिल ते नोव्हेम्बर हे आठव महिने उघडे असते हिवाळयात ते बंद असते हे पैसेवाल्याचे हॉटेल आहे. अटेन्डन्ट लोकांची नजर इतकी बसलेली असते की कुणाकडे अधिक लक्ष द्यावे, कुणाकडे "विनयपूर्ण" दुर्लक्ष करावे हे ते जाणतात. मी जग तसे पुष्कळ पाहिले आहे. युरोप, आशिया, आफ्रिका यात राहिलो आहे.

माझ्या निरीक्षणात असे आले आहे की, वरपांगी अत्यत नम्रता दाखवयाची, पण त्या नम्रतेतूनच उग्र औद्धत्य प्रकट करण्याची कला इथियोपियन माणसात आहे. त्याच्या खालोखाल भारतातले मुसलमान ओबेरॉय हॉटेलमध्ये बहुतेक अटेन्डन्टस् मुसलमानच आहेत रिसेप्शन कौण्टरवर

जो "सुसज्ज" ( केवळ 'सुसज्ज' चा "सु" रूप नव्हे! ) तरुणी असते (काही वेळा दोन ) त्यांची आतिथ्य—हीनता त्यांच्या भडक सुसज्जते-प्रमाणे चटकन् अनुभवाला येते. अर्थात, पैसेवाल्याच्या मागे गोंडा घोळण्यात या पटाईत असतात. "ब्यूटी सलून" हे स्त्रियासाठी असते हे सांगायला नकोच. कालिदासाने 'शाकुन्तल' नाटकात लिहूनच ठेवले आहे, "किमपिही मधुराणां मण्डनम् न आकृतिनाम्" म्हणजे, "जातीच्या सुंदराला काहीही शोभते." तेव्हा, ज्या मूळच्याच सुंदर तरुणी आहेत अशाची झिम्मड ब्यूटी सलून, मध्ये सहसा पाहायला मिळत नाही. ज्या येतात, त्या जेव्हा "ब्यूटी सलून" मधून बाहेर पडतात, त्याना पाहिले म्हणजे यानी अनेक नोटा फेकून कोणती "ब्यूटी" पैदा केली हे कळत नाही, 'ब्यूटी सलून' मध्ये काम करणाऱ्या स्त्रियांनी "सुंदर" असावे अशी अपेक्षा असल्यास निराशा होईल.

ओबेरॉय हॉटेलमध्ये "एस्थटिक सेन्स" कलात्मक सौंदर्य महाराजा हरिसिंग बरोबरच विलयाला गेले असावे. त्याचे कारण, कला आणि सौंदर्य दृष्टी पैशाने विकत घेता येत नाही.

इतके या हॉटेल विषयी लिहायचे कारण म्हणजे प्रवासी या हॉटेलच्या आसपास, डललेक समोर जी अनेक हॉटेल्स आहेत तिथे उतरतात. तिथून ओबेरॉय फार तर एक किलोमीटर अंतरावर आहे. तेव्हा पाहून यायला हरकत नाही म्हणजे, आपण काही गोष्टीला मुकलो असे वाटायला नको ओबेरॉय हॉटेलमधल्या पुष्कळशा "मेहमानाविषयी,' लिहायचे म्हणजे एअरकन्डिशन्ड डब्यातून (आगगाडीच्या, बसेसच्या नव्हे! आपल्या बसेस केवळ नावाला 'डीलक्स' आणि 'एअरकन्डिशन्ड' असतात) केलेल्या प्रवासात अनेक वेळा मला अनुभव आले त्याची आठवण होते पैसे असल्या मुळे ए. सी. चे तिकिट काढले, पण घाणेरड्या सवयी कुठे गेलेल्या असतात या प्रवाशाच्या! खाल्ल्यानंतर कागद खाली फेकायचे, केळाच्या साली व शेंगदाण्याची टरफले खाली फेकणे, ताबडतोब 'माणूस' ओळखायला येतो! एका पॅसेन्जरने तर कमालच केली होती. खाणं वगैरे 'नित्या प्रमाणे" झाल्यानंतर त्याने सिगरेट पेटाविली. मी विचारले, "प्रथमच ए. सी. ने प्रवास करीत आहात काय?' मोठ्या ऐटीत सिगरेट फुंकणारे

म्हणतात– छे छे. नेहमीच करतो मी म्हणालो, "ते दिसतेच आहे. कम्पाटमेन्टच्या बाहेरच्या दरवाजा बाहेर जाऊन टॉयलेटपाशी सिगरेट ओढा. ए सी त सिगरेट ओढायची नसते " मोठ्या आढ्यतेने तो जबाब देता झाला, "मला माहीत आहे ते मी जाणारच होतो" इ इ. याच लोकाचा गोतावळा मोठ्या सख्येने ओबेरॉयमध्ये उतरतो हे लोक "स्वीमींग" ला जात नाहीत किंवा "गोल्फ" ही खेळत नाहीत! "श्रीनगरला ओबेरॉयमध्ये उतरलो होतो" हे आयुष्यातल्या डायरीत लिहिले गेले म्हणजे झाले!

हरिपर्वत.– श्रीनगरच्या पूर्वेस असलेली ही टेकडी हिंदूना फार पूज्य आहे या टेकडीवर अर्धा रस्ता चढून गेल्यावर एक "स्वयंभू" शिळा लागते. या शिळेविषयी व एकदर या स्थानाविषयी पुष्कळशा कथा प्रचलित आहेत. ही 'शिळा' 'चक्रीश्वर' देवतेचे स्थान मानतात. दंतकथे [illegible] पाण्यात वास करणाऱ्या असुरांबरोबर सुरू होते. हे असुर आसपासच्या लोकांवर जुलूम करीत दैत्यांचा काही केल्या पाडाव होईना. तेव्हा पार्वतीने त्यांचे पारिपत्य करायचे ठरविले. पार्वतीने "सारिका" पक्ष्याचे रुप घेतले व मेरु पर्वतावर तिने उड्डाण केले त्या पर्वतावरून तिने एक मोठी शिळा उचलून आणली. देवाचे त्या दैत्याशी युद्ध सुरू असता, विश्रामासाठी दैत्य जलाशयात पाण्या॰ तील एका वर्तुळात शिरून अदृश्य होत. तो क्षण येताच पार्वतीने ती शिळा नेमकी तिथे टाकली व मार्ग कायमचा बद करून टाकला. त्या शिळेचा पुढे मोठा पर्वत निर्माण झाला तेच हे स्थान या टेकडीवरील प्रत्येक लहान सहान दगडच नव्हे तर धूळ सुद्धा हिंदू लोक पवित्र मानतात व हजारो हिंदू पूजा करण्यासाठी रोज इथे येतात. डल लेकच्या पश्चिम भागाला जमिनीपासून ४०० फूट ही टेकडी आहे. आसपास बदामाच्या बागा आहेत पिकनिकसाठी हे ठिकाण फार सुदर आहे व पुष्कळ लोक पिकनिकसाठी इथे येत असतात

अचर लेक – टुरिस्ट कपन्या या लेककडे तुम्हाला सहसा घेऊन जाणार नाहीत–श्रीनगरच्या "मस्ट" मध्ये याचा "प्रेक्षणीय" [illegible]



मराठी ग्रंथ संग्रहालय
६६८

अतर्भाव कंपन्या करीत नाहीत पण हे फार रमणीय स्थान आहे श्रीनगरच्या उत्तरेस सात मैलावर ३–५'×२·५' क्षेत्रफळाचे, साडेसात मैल घेरा असलेला हा तलाव शातपणे काही दिवस राहायला फार चागला आहे एखाद्याला अध्यात्मिक साधना करायची असल्यास,त्याने इथे आश्रम बाधून राहावे विलोजचे वृक्ष,चिनार वृक्ष,रेशमासारखे मऊ मऊ गवत, आसपास पर्वतांनी वेष्टिलेले, पूर्वेकडे महादेव पर्वत, उत्तरेकडे हरमुख, पश्चिमेकडे पांजाल रागा, या सर्वांची प्रतिबिम्बे जलाशयात पडलेली दिसतात. श्रीनगरपासून अचर लेकला यायला रोज सकाळी ८·३० वाजता बस असते. सध्याकाळी परत जायला बस आहेच

शकराचार्य हिल् –बहुतेक सर्व टुरिस्ट कपन्या हे स्थळ दाखवितात किंवा त्या दाखवीत नसल्यास, प्रवाशांनी या १००० फूट उच टेकडीवर जाऊन तिथले मदिर अवश्य पहावे डल लेकच्या समोर जी असख्य हॉटेल्स आहेत व ज्यापैकी एकात तुमची उतरायची सोय केलेली असण्याचा सभव आहे, तिथून जवळच या टेकडीवर जाण्याचा मार्ग आहे. चढून जाण्यासाठी शेवटपर्यंत प्रशस्त पक्क्या दगडाच्या पायऱ्या आहेत. रोज दर्शनार्थींची गर्दी असते.

मुसलमान लोक सुद्धा या टेकडीवरील वास्तूला पवित्र मानतात व शकराचार्य हिल्ऐवजी तख्त–इ–सुलेमान असे मुस्लीमी नाव त्यानी दिले आहे मुसलमानाच्या मते, हजरत सुलेमान उर्फ किंग सालोमानने (सालोमान हे नाव आल्ड टेस्टॅमेन्टमध्ये फार प्रसिद्ध आहे. याने रचलेली कवने तर अप्रतिम आहेत पुष्कळशी कवने द्व्यर्थी आहेत सालोमान राजा त्याच्या बुद्धिचातुर्याबद्दल व प्रज्ञेबद्दल प्रसिद्ध होता. इग्लिशमध्ये 'सालोमन्स वुईस्डम' किंवा 'वाईज् अँज सालोमन' असा वाक्प्रचारच आहे. इथियोपियाची सुप्रसिद्ध बायबल काळातील राणी शिबा ही सलोमनला भेटायला गेली होती व त्याच्यापासून तिला जो मुलगा झाला तोच इथियोपियाच्या हि. मा. हैलेसेलासी बादशहाचा पूर्वज असे तिथले लोक मानतात.)

काहींच्या मते, राजा सादिमनने ख्रिस्तपूर्व २६२९–२५६४ या काळात हे मंदिर बांधले व त्यात सोन्याचांदीच्या मिळून ३०० मूर्ती त्यात होत्या. ख्रि पू १३६८ मध्ये गोपादित्य राजाने याचा जीर्णोद्धार केला व ब्राह्मणांना देखरेख करायला, पूजाअर्चा करायला ठेवले. काही इतिहासकाराच्या मते, सम्राट अशोकाचा पुत्र राजा जालुकाने ख्रि. पू २०० वर्षी हे मंदिर बांधले असावे व २५३–३२८ इ. स या काळात गोपादित्य राजाने त्याचा विस्तार केला असावा. एक पडझडीत आलेली मंदिराभोवतालची भिंत व प्राचीन मंदिर व आजूबाजूस सापडणारे अवशेष प्राचीनत्वाची साक्ष देतात.

जगद्गुरु आदि शंकराचार्यांनी या मंदिरास भेट दिली व त्यांनी इथे वास्तव्यही केले. शंकराचार्य हे शिवभक्त होते व ते केरळातून हजारो मैल लांब या जागृत दैवताचे दर्शन घ्यायला आले होते. काश्मीरी पंडितांचा असा दावा आहे की, "देव्युपराध क्षमापन स्तोत्र" हे शंकराचार्यांनी इथेच रचले तत्कालीन श्रीनगर विश्वविद्यालयाचे आचार्य अभिनवगुप्त होते. त्या दोघात तत्वज्ञानातील सिद्धान्तावर वादविवाद झाला व शंकराचार्यांनी 'भक्ती' चे महत्त्व मान्य करून ते स्तोत्र रचले. (आदले रात्री शंकराचार्य झोपले असता त्यांना विलक्षण तहान लागली, पण काय आश्चर्य! त्यांना उठताच येईना अंगातली सगळी शक्तीच नाहीशी झाली एक मोलकरणीसारखी दिसणारी स्त्री त्यांना म्हणाली, "जवळच तर तांब्याभांडे आहे उठून घ्या." शंकराचार्य म्हणाले, "माझ्यात ताकदच नाही. मला उठवतच नाही." त्यावर ती स्त्री म्हणाली, "आश्चर्य आहे! अद्वैताचे सिद्धान्त प्रतिपादन करणारा द्वैतात बोलायला लागला! –" शंकराचार्यांच्या ताबडतोब लक्षात आले की ही स्त्री सामान्य नसून साक्षात् देवी आहे, तात्काळ त्यांनी देवीची प्रार्थना केली देवीने त्यांना दर्शन दिले. ते स्तोत्र म्हणजे "देवी अपराध क्षमापन स्तोत्र" अशी दंतकथा आहे )

या टेकडीवर प्राचीन शिव मंदिराच्या खाली पायऱ्यांजवळ जगद्गुरु

शकराचार्यांची पांढऱ्या शुभ्र सगमरवरी दगडात अत्यंत सुबक, तेजस्वी मूर्ती आहे. टेकडी चढून वर आल्यावर प्रथम आपल्याला जगद्‌गुरुंचेच दर्शन घडते. त्यांना प्रणाम करून आपण मंदिराच्या पायऱ्या चढू लागतो.

या स्थानाची सर्व व्यवस्था, पूजाअर्चा, साफसफाई, डॉ. करणसिंगांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या धार्मिक संस्थेतर्फे होत असते. माझ्या कल्पने-प्रमाणे व अल्प माहितीप्रमाणे, डॉ करणसिंगाप्रमाणे धर्माचे भरीव कार्य अन्य फारसे कोणी करीत नसावेत शिवाय, डॉ. करणसिंग गाजावाजा मुळीच करणार नाहीत. जे करायचे ते मुकाटयाने स्वत' डॉ. करणसिंग (ते तत्वज्ञानात पीएच डी. आहेत) अतीशय विद्वान् व फारच सुसंस्कृत आहेत त्यांचे व्यक्तित्व खरे राजबिंडे आहे आणि वाणी अत्यंत शुद्ध व तेजस्वी आहे. त्यांचे व्याख्यान श्रवणीय असते. मुद्देसूद बोलणे, प्रतिपक्षावर कडवट हल्ला नाही, संस्कृतचे श्लोक (ऋग्वेद, उपनिषदा-तील) ते म्हणतात, तेव्हा ऐकावेसे वाटते.

या स्थानी देखरेख पाहणारे साऊथ इंडियन आहेत टेकडीवर विश्रामासाठी प्रशस्त जागा आहे. पिण्यासाठी मधुर, स्वच्छ पाणी आहे. इथे एक ग्रंथालय आहे व त्यात तत्वज्ञान व संस्कृत विषयक ग्रंथ आहेत. या विषयाचे अध्ययन इथे होत असते. ज्याला इच्छा असेल त्याने अवश्य लाभ घ्यावा

या टेकडीवरून श्रीनगरचे सौंदर्य अनुपम दिसते व टेकडीच्या पायऱ्या चढून आलेल्या श्रमाचे सार्थक होते. उजवीकडे डल लेक, नगीन लेक, चार चिनार,निरनिराळे गार्डन्स तर डावीकडे हिमालयाची हिमाच्छा-दित उत्तुंग शिखरे, (त्यांतच पीरपांजाल, जिंकून परकीयांनी भारतात प्रवेश केला), समोर श्रीनगर शहर–प्रवाशानी अवश्य काही तास घालविण्यासारखे हे स्थान आहे.

हरिपर्वताभोवतालची भिंत –१५८६ मध्ये काश्मीर काबीज केल्या-नंतर, हरिपर्वताभोवती एक भिंत बांधायचे अकबराने ठरविले. भारताच्या बाहेरून २०० कारागीराना यासाठी बोलावण्यात आले होते. या भिंतीचा घेर तीन मैल आहे व दोन दरवाजे आहेत. काठी दरवाजा व संगीन

दरवाजा. भिंत बांधायला त्या काळात एक कोटी रुपये खर्च आला. दुष्काळपीडित रयतेला त्यायोगे कामधंदा मिळाला होता काठी दरवाजा, हा त्यावरील पर्शियन शिलालेखावरून मुख्य दरवाजा असला पाहिजे. अकबराच्या काळानंतर या अजस्त्र भिंतीची पडझड झाली. अहमदशहा अब्दालीने काश्मीर काबीज केल्यानंतर अटा महमदखान या अफगाण सरदारास सुभेदार नेमले होते. त्याने याचा जीर्णोद्धार केला व एक मजबूत कोट बांधून किल्ला बांधला. हा किल्ला सहजासहजी पाहायला मिळत नाही ज. का शासनाच्या डायरेक्टर ऑफ् टुरिझम-कडून प्रथम परवानगी काढावी लागते. हल्ली इथे लष्करी दारूगोळा ठेवलेला आहे म्हणून ही सावधगिरी.

**खीर भवानी:**– डॉ करणसिंगांचे आत्मवृत्त (ॲन एअर अॅपॅरन्ट) हे एक छोटेसे पण फारच चांगले पुस्तक आहे. पुष्कळांनी ते वाचले पण असेल. या पुस्तकावरील माझे विस्तृत परीक्षणही प्रसिद्ध झाले आहे. डॉ. करणसिंगाच्या या पुस्तकात खीर–भवानीसंबंधी जे लिहिले आहे ते अवश्य वाचावे. काश्मीरला जाण्यापूर्वी डॉ. करणसिंगाचे हे पुस्तक वाचण्याची मी शिफारस करतो. श्रीनगरपासून १५–१६ मैलांवर हे ठिकाण आहे. इथे जायला रोज पुष्कळशा बसेस असतात काश्मीरला जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाने खीर–भवानी हे ठिकाण पाहायलाच हवे अशी त्याची महती आहे. खीर–भवानी तुलामुल्ला गावात आहे आसपास हिरवीगार कुरणे व भातशेते. इथल्या भूमीला रेशमी–भूमी म्हणतात. प्राचीन काळी काश्मीरला रेशमी भूमी असेही नाव होते. आजुबाजूला हिमालयाच्या रांगात चोहोकडून आहेत व जमिनीत पाणी मुरून पुष्कळसे झरे (स्प्रिन्ज्) निर्माण झाले आहेत. या झऱ्यांना 'नाग' म्हणतात व प्रत्येक झऱ्याला एखाद्या देवाचे वा देवतेचे नाव दिलेले आहे. त्यातीलच सुप्रसिद्ध खीर-भवानी उर्फ क्षीर-भवानी होय. हिमालयावरून शेकडो लहान लहान प्रवाह खाली येत असतात. स्फटिकासारखे शुभ्र व अमृत-तुल्य पाणी म्हणजे काय याचा अनुभव यातील पाणी प्याले म्हणजे

येतो. खीरभवानीच्या आसपास चिनार वृक्ष, मलबेरी वृक्ष खूप आहेत. रंगीबेरंगी फुलांची तर लयलूट आहे.

खीर–भवानी हे जागृत स्थान आहे हजारो भाविक खीर–भवानीच्या दर्शनाला येत असतात विशेष म्हणजे इथे असलेली कमालीची स्वच्छता व पंडितांचा सभ्यपणा देवीची प्रतिमा एका सुंदर संगमरवरी कुंडात मध्य-भागी आहे ते कुंड चांगले खोल आहे; निदान १५ फूट त्या कुंडात एक मोठा चबूतरा आहे व त्यावर एक चौथरा आहे. त्यावर देवीचे सुंदर मंदिर आहे कुंडाभोवती कठडा आहे कठड्यापासून मंदिरापर्यन्त जायला अरुंदसा पूल आहे, पण कोणीच जाऊ शकत नाही. फक्त तिथला नेहमीचा पुजारी. देवीच्या समोर, कठड्याजवळ पंडित ( काशीकडले पण्ड्ये ) बसलेले असतात. देवीला तुम्ही अभिषेक करावा अशी तुमची भावना व श्रध्दा असल्यास, पंडित लोक तुम्हाला अभिषेक सांगतात. साहित्य सगळे आवाराच्या बाहेर मिळते. आवारात येतांना बूटमोजे बाहेरच काढायचे असतात. रक्षक असतातच. तिथेच नारळ, अभिषेकाचे साहित्य, उदबत्या, फुले, मिठाई, इ विकत मिळते अभिषेक सांगितल्यावर तुमच्या खुशीला येईल ती दक्षिणा तुम्ही पंडिताला द्या. तो कुरकुर करणार नाही. अभिषेक करा म्हणून तुमच्या पाठीमागे लागणार नाहीत. भारतातील इतर धार्मिक संस्थांनी म्हणजे मंदिरातील पुजाऱ्यांनी, पंड्यानी ही गोष्ट अवश्य ध्यानी घ्यावी पंढरपूरचे बडवे, नाशकाचे लोचट भिक्षुक उर्फ "गुरुजी," काशीचे संताप आणणारेच नव्हे तर अत्यंत उर्मट पण्ड्ये, प्रयागचे हातोहात बनविणारे पण्ड्ये (एका लहानशा पळीत पाणी व दूध घालून तुमच्या हातावर टाकतात आणि तुम्हाला संकल्प म्हणायला सांगतात. संगमाच्या प्रवाहात तुम्ही ओलेत्याने उभेच असतात त्याचा फायदा घेऊन विशेषत स्त्रियांना तो प्रयागी पण्ड्या म्हणतो, "ह, टाका पधरा रुपये!" नाहीतर दुरुत्तरे देतात! मी केवळ चार आणेली त्याच्या हातावर टिकवली तेव्हा त्याचा संताप पाहण्यासारखा होता पण त्याचे उट्टे तो माझ्या पत्नीकडून व सुनेकडून फेडेल हे मला तरी काय माहीत! –

डॉ. करणसिंगानी आपल्या पुस्तकात खीरभवानीतल्या झऱ्यातून जल-प्रवाहाबद्दल जे लिहिले आहे त्याचा उल्लेख इथे करणे अवश्य आहे व प्रवाशानी अवश्य तो जलप्रवाह पाहावा. झऱ्यातील पाणी कधी एका रंगाचे नसने हा एक चमत्कार! कधी निळसर, कधी जांभळट, कधी फिका हिरवा पाचूप्रमाणे, कधी किंचित लालगुलाबी– हे असे निरनिराळे रंग असतात हे तर मी पाहिले आहेच पण यापुढे डॉ. करणसिंगाने जे लिहिले आहे ते चिन्त्य आहे व देवी जागृत आहे हे श्रद्धाळु माणसाला पटते. डॉ. साहेब लिहितात की, या प्रदेशावर परकीय शत्रूचे संकट आले तर पाण्याचा रंग काळा होतो व संकट टळेपर्यंत काळाच रंग राहातो. १९४८ साली पाकिस्तानने काश्मीरवर आक्रमण केले होते तेव्हा प्रवाहातील पाणी सैन्य हटेपर्यंत काळेच होते असे डॉ. करणसिंगानी लिहून ठेवले आहे. याला शास्त्रीय कारणे काय देणार? तेव्हा अशा जागृत स्थानाला जरूर भेट द्या. भारतात जी अत्यंत पूज्य स्थाने आहेत, त्यात हिमालयाचे रक्षण करणारी वैष्णव देवी, अमरनाथ व खीर भवानी ही प्रमुख होत.

काश्मीरी लोक तर इथे प्रचण्ड संख्येने येतात. नारळी पौर्णिमेस तर गर्दी फार असते परंतु, तरीही गोंधळ नाही. पुष्कळसे भाविक किंवा नवस बोलणारे जेवणे घालतात. जेवणासाठी लोक शिस्तीत बसलेले असतात व त्यांना भाविकपणे वाढले जाते. या जेवणावळीत जेवण घेणे कमीपणाचे समजत नाहीत.

खीर भवानीसंबंधीची रामायणकालीन कथा इथे सांगणे इष्ट आहे. रावण हा शिवभक्त होता व तो पार्वतीचा उपासक होता. रामाशी सुरू असलेल्या युद्धात आपले महापराक्रमी बंधु ठार झाले, मुलगा मेघनादही पतन पावला. हे पाहताच त्याच्या पत्नीने, मंदोदरीने रामाशी सख्य करण्याची आपल्या नवऱ्याला गळ घातली. रावण अत्यंत क्रुद्ध झाला आणि आपल्या उपास्य दैवताला निरनिराळ्या आहुत्या देऊ लागला. त्याने यज्ञ केला. देवीने प्रसन्न व्हावे यासाठी– आजपर्यन्त देवीने त्याचे तपावर, उपासनेवर, नेहमी प्रसन्न होऊन, त्याला अनेक वरदानही दिले होते पण, यावेळेस मात्र देवीला रावणाचा संताप आला व तिने

हनुमानाला आज्ञा केली की तिला व तिच्या ३६० नाग साथीदारांना हनुमानाने सतिसारला (त्या काळातले काश्मीरचे नाव) न्यावे. देवीने आपल्यासाठी जे स्थान निवडले होते ते हेच होय. आवारापाशी मोठ्या फलकावर ही सगळी कथा लिहिलेली आहे. स्वामी विवेकानंद इथे ध्यान करण्यासाठी आले होते

काश्मीरमध्येच रावणाचा पिता पुलस्ति राहत होता खीर-भवानी "तुलामुल्ला" गावात आहे हे मघाशी लिहिलेच आहे. हे नाव मूळ संस्कृत नावाचे अपभ्रंश आहे. 'तूल' म्हणजे कापूस. 'मुल्ला' उर्फ मूल्य म्हणजे किंमत गुप्त झरा, एका विद्वान् धर्मपरायण ब्राह्मणाला स्वप्नात दिसला. त्याला स्वप्नातल्या देवतेने सांगितले की या जलाशयातून बोट वल्हवीत शादीपूरपर्यन्त ने तिथून एक सर्प तुला मार्ग दाखवील त्याप्रमाणे त्याने केले सर्प होडीत होताच. काही वेळाने सर्पाने पाण्यात उडी मारली. त्या ठिकाणी ब्राह्मणाने निर्झराला दूध, तांदूळ, मनुका, खजूर, खडीसाखर, नारळ, फुले अर्पण केली. दर शुद्धपक्षाच्या अष्टमीला ब्राह्मण इथे येई, दरवेळी त्याला पाण्याचा रंग निराळा दिसायचा. काळा रंग मात्र कधीही दिसला नाही. हा काळा रंग केव्हा दिसू लागला हे मागे लिहिलेच आहे. या स्थानाची किर्ती ऐकून हजारो लोक दर्शनासाठी येऊ लागले व महाराजा प्रतापसिंगाने मागे वर्णन केलेले मंदिर बांधले. या मंदिराभोवती ३६० झरे आहेत. या स्थानाचे आणखी एक महत्त्व म्हणजे इथे बदामांच्या बागा खूप आहेत; व इथले बदाम सर्वोत्कृष्ट गणले जातात.

ज्येष्ठातली शुद्धपक्षातली अष्टमी विशेष महत्त्वाची मानली जाते. त्या दिवशी (मे महिन्यात हा दिवस येतो. ) इथे मोठा उत्सव होतो. लोक खीरेचा नैवेद्य दाखवितात.

**'सोम' वल्लीचे ठिकाण** – प्राचीन ग्रंथातून विशेषतः ऋग्वेदातून सोमरसाचा उल्लेख अनेक ठिकाणी आला आहे देवाना सोमरस देऊन त्याना खूष करा, इंद्राला सोमरस द्या, इ. इ. अनेक ऋचातून वर्णन आढळते. एका ऋचेत तर सोमरस कसा करावा याची शास्त्रशुद्ध माहिती

तपशीलवार दिलेली आहे सोमरस ज्या वल्लीपासून तयार करतात ती सोमवल्ली याच भागात "मानसबल" या ठिकाणी विपुल प्रमाणात व्हायची. आर्य सोमरसालाच 'अमृत' म्हणून सबोधत व सोमरस प्यायल्याने काय फायदे होतात याचे वर्णनही आर्यांनी करून ठेवले आहे.

मानसबल म्हणजे ज्याना मानस सरोवर पाहता येत नसेल (मी पण पाहिले नाही) त्याना हे छोटेसे मानस सरोवरच वाटेल झेलमच्या खोऱ्यात श्रीनगरपासून केवळ १८ मैलांवर हे सरोवर आहे. मूळ मानस सरोवरावरूनच याला हे नाव दिले गेले आहे. मानस सरोवराचे दर्शन घेणे फार कष्टाचे म्हणून काश्मीरी लोकाच्या प्रार्थनेला मान देऊन परमेश्वराने हे मानसबल निर्माण केले उन्हाळ्यात या तलावांवर कमलपुष्पांचा गालिचा पसरलेला असतो, आणि पक्षी तर असख्य असतात. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात कमलपुष्पांचा रग फिका जांभळा दिसतो व ते दृश्य अवर्णनीय आहे. तलावात मासे खूप आहेत. सोमवल्ली मात्र अदृश्य झाली. एखाद्या वनस्पतीशास्त्रज्ञाने सशोधन करायचे ठरविल्यास कुठेतरी या वेलीचे अस्तित्व आढळण्याचा सभव आहे.

या सरोवराच्या काठी नूरजहानने सुदर उद्यान तयार केले, त्याला "झरोका" म्हणतात उद्यानात एक प्रासादही होता. तलावाच्या आजूबाजूस "आह तेग" ही ६२५६ फूट उचीची टेकडी आहे या टेकडीवर सायप्रसची विपुल झाडे आहेत. तलावाच्या टोकाला एक सुदर स्थान कॅम्पिंगसाठी आहे त्या ठिकाणी चिनारांची लागवड मुद्दाम केली आहे. या ठिकाणास कोझबाग म्हणतात तलावाच्या उत्तरेस व पूर्वेस खूपसे झरे आहेत व त्यावर सॅलडसारखी पाने येतात. ती सॅन्डविचमध्ये घालतात व फार चविष्ठ असतात. इंग्लिशमध्ये पानांना "कॅटरक्रेस" म्हणतात. आग्नेयाच्या बाजूने सिधू नदी तलावात प्रवेश करते. छोट्याशा नावेतून सहल करणे फारच सुखद आहे खरोखर स्वर्गसुखाचा अनुभव येतो. विलक्षण शांतता, अनुपमेय सृष्टिसौंदर्य, फुले व पक्षी याचे सान्निध्य, भोवतालची पर्वतराजी त्या सौंदर्याचे, शाततेचे रक्षण करण्यासाठी उभी !

वुलर लेक – पुष्कळशा प्रवास कपन्या वुलर लेकला प्रवाशांना घेऊन जातात याचे महत्व म्हणजे गोड पाण्याचे भारतातले हे सर्वात मोठे सरोवर उर्फ तलाव हे सरोवर १३ मैल लांब व ६ मैल रुद असून एकदर ११० मैलाचे क्षेत्र व्यापले आहे. श्रीनगरपासून २५ मैलांवर हा तलाव आहे. या तलावाची ठेवणच भव्य आहे पीरपांजालचे एक शिखर "ट्रगवल पास" (१३५९२ फूट उच)जणु ओणवे होऊन या तलावाकडे पाहत आहे असे वाटते. झेलम आपला मार्ग आक्रमण करीत असता या तलावामधून जाते खि पू २६०० वर्षापूर्वी काश्मीरच्या सादीमन राजाने वितस्ताच्या (झेलमच्या) दोन्ही किनारी एक शहर वसविले. उच उंच प्रासाद, मदिरे यांची रेखीव माडणी दोन्ही बाजूस होती. नगराचे नाव 'सादिमतनगर' होते ५४४ वर्षानतर, सुदरमेनच्या काळात जनता ऐहिक उपभोगात मग्न झाली सुरा आणि सुदरी व गाण्याचे जलसे यात प्रजा लोळू लागली. ईश्वराला विसरले. आध्यात्मिक उन्नती शब्द लुप्त झाला. नदगुप्त या नावाचा एक कुभार अत्यत धार्मिक व सतपुरुष होता. त्याने या विलासी जीवनातून लोकानी मुक्त व्हावे म्हणून पुष्कळ प्रयास केले; पण त्याचे कोण ऐकते ? त्याला या शहराचा उबग आला. एकदा त्याला स्वप्न पडले व शहर सोडून तो टेकडी चढू लागला. बरेच वर गेल्यानतर त्याने मागे वळून पाहिले. शहरात काहीच फरक नव्हता. शिखरावर पोचताच, त्याला समोरची भूमी दुभगताना दिसली व प्रदेश जलमय झाला सर्व शहराला जलसमाधी मिळाली त्या टेकडीस "काला सन्गोर" उर्फ कुंभाराची टेकडी म्हणतात बायबलमध्येही सोडोम व गोमोऱ्हा शहरांची अशीच गोष्ट आहे. जनता पापी, व्यसनासक्त व दुराचारी बनली म्हणून परमेश्वराने ती शहरे नष्ट केली व लॉट दांपत्यास तिथून जायला सागितले. जाताना मागे वळून पहायचे नाही अशी अट परमेश्वराने घातली होती. पण बायकांचा स्वभाव. जिज्ञासेने लॉटच्या बायकोने मागे वळून पाहिलेच व ती तात्काळ शिलाखण्ड झाली

तलावाचे प्राचीन नाव 'महापद्मसारस' असे होते. त्याचीही एक मनोरजक कथा आहे. 'महापद्म' हे सर्प देवतेचे नाव, शिवाच्या प्रभावळी-

तील व ह्या तलावात महापद्मचे वास्तव्य असे. जयपीडाच्या काळात (७५८–७८४ इ. स.) एका द्राविडियन जादूगाराने या सर्पाला हुसकून लावून त्या तलावातील पाणी कोरड जमिनीला मिळावे या हेतूने उत्तरेत प्रवास केला. जयपीड राजाला स्वप्नात महपद्माने दर्शन देऊन त्या जादुगाराचा दुष्ट हेतू सांगितला व आपले आणि आपल्या परिवाराचे रक्षण करण्यास सांगितले. असे केल्यास महापद्म राजाला सुवर्ण कुठे सापडेल, तो पर्वत दाखविणार होता. जयपीड राजाने त्या स्वप्नावर विचार केला, व द्राविडियन मांत्रिकाला शोधून काढले व इतके खोल तळे कोरडे कसे करणार म्हणून त्याला विचारले. द्राविडियन मांत्रिक म्हणाला, 'मला तळे दाखवा म्हणजे तुमच्या समोरच मी ते कोरडे करून दाखवीन" जयपीड त्या मांत्रिकास तळ्यापाशी घेऊन गेला व महापद्मचे निवासस्थान त्या तळ्यात कुठे आहे ती जागा दाखविली. मांत्रिकाने तीन बाण अभिमंत्रित केले व त्या जागेवर सोडले त्याबरोबर तळ्यातले पाणी कमी कमी होत होत कोरडा दिसायला लागला एका जागी महापद्म व त्याचा परिवार तळमळताना दिसला. अर्धे सापाचे शरीर व अर्धे माणसाचे असा महापद्म व त्याचा परिवार जयपीडाची करुणा भाकायला लागला व आपले प्राण वाचविण्याची प्रार्थना केली जयपीडाला महापद्म व कुटुंबियांची कासावीस स्थिती पाहवेना व त्याने मांत्रिकास ते तळे पूर्ववत् जलमय करण्याची गळ घातली. मांत्रिकाने पुन तीन बाण अभिमंत्रून तळ्यात सोडले, त्याबरोबर ते पूर्वीप्रमाणे तुडुम्ब भरले. त्या रात्री महापद्म राजाच्या स्वप्नात येऊन म्हणाला, 'माझे प्राण तू वाचविलेस, पण आपले वचन पूर्णपणे पाळले नाहीस. तेव्हा, सोन्याची खाण न दाखविता मी तुला ताम्याची खाण दाखवितो. त्यापासून तू दशलक्ष मुद्रा बनविशील–" महापद्मने आपले वचन पाळले.

पण या तळ्याविषयी जनतेच्या मनात एक प्रकारची दहशत अनेक शतके वास करीत होती. या तळ्यात प्रवेश केल्यास जीवाला धोका आहे ही दृढ समजूत होती, आणि ही भोळी अंधश्रद्धा एकोणीसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत टिकली होती १८८६ मध्ये कॉन्स्टेनच्या नेतृत्वाखाली

केम्ब्रिज युनिव्हर्सिटी बोट रेसची टीम भ्रमणार्थ इथे आली असता ते या तलावात पोहचले व त्यांना काहीही झाले नाही हे पाहून लोकपण निर्धास्त झाले

वुलर लेकवर राहण्यासाठी बरेच हौशी प्रवाशी येत असतात. त्यांच्यासाठी "पर्णकुट्या" शासनाने बांधल्या आहेत. खाजगी पण आहेत. एखाद्या हाऊसबोट' वर राहणे पर्णकुटीत राहाण्यापेक्षा अधिक चागले व एखादी नाव भाडयाने करून लेकच्या फेऱ्या माराव्यात

श्रीनगरहून टुरिस्ट रिसेप्शन सेंटरवरून सकाळी आठ साडेआठच्या दरम्यान बसेस (शासनाच्या) सुटतात. बस श्रीनगरहून प्रथम अचार सरोवरापाशी जाते, मार्गात देवदारधाम ओढयातून जावे लागते अचर नतर तुलामुल्लाला बस खीर-भवानीच्या दर्शनासाठी थांबते त्यानतर सफा• पूरला थांबते. सफापूरहून मानसबलचे दृश्य फार मनोहर दिसते. जवळच "फकीर का बगीचा" आहे एक मुसलमान फकीर इथल्या गुहेत राहात असे व त्याने ही बाग लावली. या बागेतली पीचेस व द्राक्षे मधुर आहेत. गुहा पाहायलाही लोक जातात. त्यानंतर मधुमती या नदीच्या किनारी असलेल्या बदीपूर या छोटया गावातून बस पुढे 'वटलाब' गावी लचसाठी थांबते. तिथे गव्हर्मेन्ट रेस्टहाऊस आहे. काही प्रवासी लगतची बाबा शकुरउद्दीनची मशीद पाहायला जातात मशीदीपासून तलावाचे दृश्य फारच चित्तवेधक दिसते वटलाब नतर बस झेलमच्या काठी असलेल्या सोपोरेला थाबते. परतीच्या प्रवासात बस पट्टणमार्गे जाते पट्टणला शकरवर्मन या राजाने (ज्याने काश्मीरवर ८३३-९०२ पर्यन्त राज्य केले) बाधलेले सुदर मदिर प्रवाशांना पाहायला मिळते.

नीलनाग उर्फ वेरीनाग

बनियहाल पासच्या पायथ्याशी, नैऋत्येकडे काश्मीरमधलाच नव्हे परतु भारतातला सर्वात मोठा झरा-स्प्रिन्ग-इथे आहे "नाग" (उर्फ 'नग' म्हणजे पर्वत,) वेर जिल्ह्यात आहे. इथल्या उघडया मैदानाच्या टोकाला, पर्वत राशींच्या पायथ्याशी एक विशाल उद्यान आहे. या उद्या•

नात पाईनची झाडे आहेत व अनेक लहान लहान झरे आहेत. पूर्वी वर्तुळाकार असलेले पण आता अष्टकोनी असलेल्या मोठ्या कुंडातून उर्फ जलाशयातून शुभ्रपाण्याचा झरा बाहेर येतो. तोच नीलनाग हा कश्यप ऋषीला त्याच्या कद्रू या पत्नीपासून झाला होता. कश्यपाने नीलनागाला काश्मीरमधल्या नागाचा राजा नियुक्त केले होते. नीलनागापासून केवळ २५–३० फुटावर आणखी एक झरा आहे एखाद्या लहानशा विहीरी-सारखा तो दिसतो. नीलनागापूर्वीपासून याचे अस्तित्त्व आहे व शंकराने आपला त्रिशूळ या जागी खुपसून ह्यातून वितीच्या आकाराची (वितस्ता) जागा दुभंगून त्यातून गंगा अवतीर्ण झाली. याला नीलकुण्ड म्हणतात

वेरिनागमधल्या अनेक झऱ्याचे पाणी एका अष्टाकृती मोठ्या जला-शयात पडते या जलाशयाचे चांगले बांधकाम जहांगीरने १६१२ त केले होते. जलाशयाची खोली ५४ फूट आहे व त्याचा परीघ २४० फूट आहे. चोहोबाजूने विटाची भिंत आहे. जहांगीरला जागेचे फार आकर्षण होते व पंजाबातून पीरपंजाल ओलांडून आपल्यानंतर या शांत व रम्य स्थानी अनेक आठवडे त्याचा मुक्काम असायचा शहजहानने या ठिकाणी आणखी सुधारणा केल्या व मोठमोठाली उद्याने, कारंजी, कृत्रिक धबधबे १६२० मध्ये बांधले. अनेक पक्षी आपली मंजुळ गाणी या उपवनात लक्षावधी फुलांच्या सान्निध्यात गात असतात त्यावेळी

"गात रहा सख्या अपुली आवडीची गाणे
मीही तुझ्या सन्निध बसुनी बघत कौतुकाने"

या माधवज्यूलियनच्या ओळी किंवा उमर खय्यामच्या "या इथे तरुतळी" या ओळीची आठवण होते.

काश्मीरमधले विश्रांतीसुख निसर्गाच्या सान्निध्यात घालविण्यासाठी हे एक अत्यन्त रम्य ठिकाण आहे. ज का. शासनाने उद्यानांची देखरेख व निगा राखून सौंदर्य वाढविले आहे व विश्रांतीगृहही बांधले आहे जवळच महादेवाचे प्राचीन मंदिर आहे एक पंडित त्याची रोज नित्यनेमाने पूजा करीत असतो.

हौशी प्रवासी इथे गळ टाकून मासेही पकडतात. कारण इथे मासे खूप आहेत व अतिशय चविष्ट आहेत असे खाणारे सांगतात

अच्छाबल गार्डन्स .– वेरीनागपासून १० मैलावर व श्रीनगरपासून ४० मैलावर हे एक अतिशय रमणीय उद्यान आहे. चिनारांची राई, थुई थुई नाचणारी कारंजी, पाण्याचे कृत्रिम धबधबे, असे हे रमणीय उद्यान नूरजहाने बांधायला सुरुवात केली होती त्याला पूर्णरूप शहाजहानच्या मुलीने, जहानआराने दिले. अच्छाबलमधले पाणी देवदार वृक्षांनी झाकलेल्या पर्वतातून तीन ठिकाणाहून येते. राजा "आषा,"च्या काळात ( ख्रि पू ४८६–३२६ )याचे नाव "अक्षीपलग" असे होते.

नूरजहाँ व जहाँआराच्या काळात इथे सुंदर "हमाम" (स्नानगृह) होते ते आता कोरडे आहे व कुंडातील पाण्यावर पाने आणि इतर कचरा यांचा थर आहे मोगलांच्या काळात यातील पाणी हमेशा गरम ठेवले जाई. त्याच्यानंतर, हे पाणी गरम कसे ठेवले जाई, कुठून गरम पाणी येई, याचा पत्ता कधी लागला नाही. तेव्हा लोकांनी हमाम उघडले, जमीन उखडली व दंतकथा अशी आहे की, प्रचंड पेटती मेणबत्ती तिथे होती व ती पाणी सतत गरम ठेवी ती मेणबत्ती हमामाची जमीन उखडताना नष्ट झाली त्यानंतर पुन्हा ते पाणी गरम होऊ शकले नाही. आज हमामाची इमारत व भिंती तेवढ्या उभ्या आहेत

पण उद्यानातील सौंदर्य टिकून आहे. उद्यानातले पाणी दगडांनी बांधलेल्या तीन कालव्यातून वाहते तीन टेरेसेस व तीन धबधब्यावरून कालवे वाहतात. मुख्य कालव्यात अनेक कारंजी आहेत. मुख्य टेरेसवर तीन शामियाने बांधले आहेत. विस्तीर्ण सुशोभित अशा हिरवळी, मनोहर फुलांचे असंख्य ताटवे, शीतल वाऱ्याची झुळूक, बनिहालपासवर विश्रांती घेत असलेल्या, धवल ढगानी त्यांना अधिक शीतल करणं हे सर्व पाहत असता व तेथील असीम शांततेचा व सौंदर्याचा आस्वाद घेत असता भान हरपते.

ट्राऊट फिशरी – यातील तलावात मासे पुष्कळ आहेत आणि जवळच ट्राऊट मासळीची फिशरी (मत्स्यगृह) आहे. ट्राऊट मासा फार चविष्ट असतो व मासे खाणाऱ्याचे ते पक्वान्नच आहे. काश्मीरमध्ये ट्राऊटची लागवड ड्यूक ऑफ् बेड्फर्डच्या देखरेखीखाली १८८९ मध्ये महाराजा अमरसिंगने केली होती. ट्राऊटची कीर्ती ऐकून महाराजा अमर-सिंगने फ्रॅन्क मिचेल, कर्नल कॉर्ड, असि रेसि. कर्नल स्टुअर्ट ग्रॉडफे आणि रेसि सर अॅडलबर्ट याना ड्यूक ऑफ् बेडफर्डला विनती करून ट्राऊट पुरविण्याविषयी गळ घालायला सांगितले. ड्यूकने स्कॉटलन्डमधून खास ट्राऊट माशांची दहाहजार अंडी (ओल्हा) पुरविली. मिचेलने या ओल्हातून मासळी उत्पन्न करण्यासाठी स्वन चा बाग– इ–दिलवरखान निवडला. राज्यातील सर्व पाणी राज्याच्या मालकीचे असल्याने, १९०१ मध्ये त्याची मालकी राज्याकडेच आली हवे तसे यश मिळेना व माशांची उपज नीट होईना म्हणून हल्लीचे हरवन क्षेत्र निवडून तिथे मासळीची हॅचरी बांधली. १९०६ पर्यंन्त ट्राऊटसचा साठा त्रिन्धी, लिड्डुर, अच्छाबल, एरिन व मधुमती इथे असायचा आता ट्राऊट्सचे वैपुल्य आहे व साठविण्याची गरज पडत नाही. १९०६ मध्ये २७ इंच लांब, १८ इंच घेर व १२½ पौंड वजनाचा ट्राऊट मिळायचा. अलिकडे १४ ते १५ पौंड वजनापर्यंन्त ट्राऊट्स मिळतात

षड्हरवन (सहा भिखूंचा विहार) –शालीमारपासून पाच कि मी. वर, टेकडीच्या पूर्वेकडील उतारावर हा ऐतिहासिक दृष्टीने महत्वाचा असा बौद्धविहार आहे मध्य आशियातून आलेल्या बौद्ध भिख्खूंनी इ. स ३००मध्ये षड्हवनलावाद्याचा चौथी आंतरराष्ट्रीय परिषद भरविली होती कनिष्क या बौद्ध सम्राटाच्या कुशान साम्राज्यात त्यावेळी काश्मीरचा अंतर्भाव होता. उत्तरेत शुभ साम्राज्याचा लोप झाला होता व कनिष्कने तिथे आपला विस्तार केला.

षड्हर्वनला बौद्धविहार होता व इतिहासकार कल्हणच्या मते, विद्वान पंडित नागार्जुनचे वास्तव्य तिथे असे. विहारात स्तूप होता, लहान मंदिरे होती व अन्य इमारती होत्या. इथे जे अवशेष सापडतात, त्यावरून तत्कालीन लोकांच्या पोशाखाची, आभरणाची (कानात लांब लोलक

घालणे) वास्तुकलेची चांगली कल्पना येते. जिज्ञासूंनी, विशेषत इतिहासाच्या अभ्यासकांनी या विहाराला जरूर भेट द्यावी

इथून पुढे गेल्यावर षडिहंद्वन, श्रीनगरपासून १२½ मैलांवर महादेव पर्वताच्या (१४००० फूट उंच) पायथ्याशी हे एक महत्त्वाचे स्थान आहे. उन्हाळ्यात या पर्वताचे आरोहण पुष्कळजण करताना दिसतात. षडिहंवनला कृत्रिम तलाव आहे. त्यात 'मारसार' तलावाचे पाणी येते व साठविले जाते श्रीनगर शहराला पाण्याचा पुरवठा करणारा हाच कृत्रिम तलाव. या तलावात जवळच्या पर्वतराजींचे, घनदाट झाडींचे प्रतिबिम्ब पडलेले दिसते, तसेच दच्छिगाम गेम रिझर्व्हही दिसतो पूर्वी यात्रेकरी दाच्छिगामकडूनच महादेव पर्वत चढत.

दाच्छीगाम खोरे ( उर्फ दस गाम रक्ष ) .—

श्रीनगरला पाणी पुरविणाऱ्या तलावाच्या वरच्या टोकापासून दिसणारे हे एक अत्यन्त रमणीय खोरे आहे. यात किती वनस्पती आहेत, नाना प्रकारचे वृक्ष, वेली, फुले, रानटी जनावरे, उदा चित्ता, अस्वल, हरिण शिवाय लहानसहान ज्याची नावे माहीत नाहीत अशी श्वापदे, अनंत प्रकारचे पक्षी व त्यांच्या मजुळ स्वरांनी निनादलेले ते खोरे वनदेवतेचे मोठे प्यार असले पाहिजे असे वाटते की, वनदेवता इथे विहार करण्याकरिता येत असाव्यात इथे वाहणारे ओढे या खोऱ्याला प्रत्यही टवटवीत ठेवीत असतात. हे स्थान गुप्तवंशातील राजाचे आवडते विहार स्थान होते व आजही एका भागात वसु गुप्तच्या नावाचे 'वसुपूर' हे छोटे खेडे आहे. याच्यावर "शकर–शिळा" उर्फ "शकरपाल" आहे. शकरगुप्त या ठिकाणी ध्यान धारणेसाठी येत असे. या प्रचण्ड शिळेच्या एका भागावर शिव वेदान्त कोरलेला आहे या शिळेचा पुष्कळसा भाग आता जमिनीत गेलेला आहे. इथे जवळच "गुप्तगगा,' आहे. शकरपालच्या पायथ्यापी मांशाचे मोठे कुड आहे. त्यात तऱ्हेतऱ्हेचे मासे खेळताना दिसतात इथून आणखी जवळ एका प्रचण्ड चिनार वृक्षाच्या आडोशाला, (हवरन-

पासून केवळ सव्वामैल अंतरावर) जिवंत झऱ्याचे कुंड आहे त्यातील पाणी प्याल्यास अनेक रोगांचे मूळ नाहीसे होते अशी त्याची कीर्ती आहे. या कुण्डास शारदा देवीच्या नावे " शारदाबल " असे म्हणतात.

बुर्झा होम– पाच हजार वर्षांपूर्वीचे काश्मीरी लोकांचे वसतीस्थान म्हणून याला फार महत्त्व आहे. मिन्या फुजीवारा हा जपानी प्रवासी या स्थानास भेट देऊन गेला होता ("काश्मीर पृ.४६). त्याचे अवशेष उत्खनन केल्यानंतर सापडू लागले आहेत. श्रीनगरपासून १५ मैलांवर व शालिमार गार्डनच्या वायव्येस ५ मैलांवर हे उत्खननाचे काम सुरू आहे व पाचहजार वर्षांपूर्वीचा इतिहास उजेडात येत आहे. मागे पीर-पांजालच्या पर्वत श्रेणी समोर डल लेकचा विस्तार, मखमलीसारखी हिरवीगार कुरणे, त्यात संचार करणारे व वास्तव्य करणारे ख्रि पू. २५०० वर्षांपूर्वीचे काश्मीरी लोक कसे राहत असावेत याच्या खुणा आढळत आहेत. काही मातीची भांडी सापडत आहेत, मातीचे सरळ रेषे-तील ओटे, जळलेले कोळसे, भांड्यांवरील नक्षीकाम, यावरून त्यांच्या जीवनाची काही कल्पना येते त्या उत्खननात जी भांडी सापडली, तशी भांडी आजही काही अंतर्भागातील खेड्यातील लोक वापरतांना दिसतात. एक लिहण्याची दगडी शिळा सापडली आहे. ही शिळा भग्न असली तरी तीवरील शिकारीचे दृश्य स्पष्ट टिकून आहे या शिळेवरील चित्रात मध्यभागी बारांशिगी असून पाठीमागून एक उंच शिकारी त्याच्या शरीरात हत्यार खुपसत असून, समोरचा शिकारी त्या पशूवर बाण मारीत आहे असे दाखविले आहे. चित्राच्यावरच्या भागात शिकारी कुत्रा दाखविला आहे. या चित्रातील मनोरंजक भाग म्हणजे दोन सूर्य प्रकाशतांना दाखविले आहेत! अर्थात् बुर्झा होम पुष्कळसे भूमीच्या उदरात आहे निसर्गावर मात करून मानव आपले जीवन कसे कंठत होता याचे ज्ञान या उत्खननावरून होत आहे

नंदऋषी उर्फ शेख नूरउद्दिनची छत्री –श्रीनगरपासून युसमर्गकडे जाणाऱ्या रस्त्यावर १९ मैलावर या साधूची समाधी उर्फ दर्गा आहे. काश्मीरमधले हिंदू व मुसलमान दोघेही या दर्ग्यास भेट देतात

हिंदु त्याला नंदऋषीची समाधी म्हणतात, मुसलमान शेख नुरुद्दीनचा झियारात हिंदुमुसलमानांनीच नव्हे तर सर्व प्राणीमात्रांनी एकमेकावर प्रेम करावे, एकमेकाच्या उपयोगी पडावे, धार्मिक मतभेदाला जागा नसावी अशी त्याची सुफी तत्त्वज्ञानाला अनुसरून शिकवण होती अनंत नाग जिल्ह्यातील कैमोह खेड्यात नुरुद्दीनचा जन्म १४ व्या शतकात झाला वडील लहानपणीच निवर्तले होते नुरुद्दीनची धार्मिक प्रवृत्ती शैशवापासून आढळून येई त्याचे लग्न झाले पण त्याची वृत्ती विरक्त राही दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर, एका मध्यरात्री त्याने घराचा व संसाराचा त्याग केला बारा वर्षे एका गुहेत त्याने चिंतनात घालविली. ईश्वराला अनन्यभावे शरण, आत्मसमर्पण, सदाचार आणि प्रेम ही त्याची मुख्य शिकवण होती या तत्त्वाचा प्रचार जन्मभर त्याने केला. शिरडीच्या साईबाबाप्रमाणे हिंदु व मुसलमान दोन्ही याचे भक्त आहेत त्यांतून हिंदू अधिक आहेत,

युसमर्ग उर्फ लघुगुलमर्ग –श्रीनगरपासून तीस मैलावर व झियारात-पासून ११ मैलावर पीर पन्तसाल पर्वताच्या उतारावर हे एक रम्य ठिकाण आहे. युसमार्गचा मार्गही मोठा आल्हाददायक आहे रस्त्याच्या दुतर्फा पाईनची उंच झाडे, नीलनाग नदीचा किनारा, हिरवीगार शेते, फळांनी लादलेल्या बागा व त्यातून दरवळणारा मंद सुगंध व त्यात लुप्त झालेले इवलेसे गोंडी पठार खेडे आणि जवळच जिवंत पाण्याचा तलाव. या तलावाची खोली ३० फूट आहे व यातील पाणी कुठे बाहेर पडताना दिसत नाही. खेडुताची श्रद्धा की एकदा भूकंपाचा हादरा बसला असता हे तळे निर्माण झाले या तळ्यात सुसरी व साप खूप आहेत, व राक्षसांनी सापाचे व सुसरींचे रुप धारण केले आहे, असे लोक सांगतात. मात्र या तलावातील पाणी अगदी स्वच्छ, निळसर व ऊबदार आहे.

पर्वतांच्या उतारावर प्रचण्ड पाईन आणि फरची झाडे आहेत. पायथ्याशी अनेक प्रकारची फुले आहेत; त्यात डॅन्डेलियन (मेडन् हॅन्ड) फुले पण आहेत. या फुलाचा उपयोग फ्रान्स व युरोपमध्ये वाइन (मद्य)

...ार करण्यात आणि सॅलडसारखा करतात पण इथल्या रहिवाशांना ...ाचा औषधी उपयोग अधिक माहीत आहे. हाड कुठे निखळले असल्यास किंवा फ्रॅक्चर झाले असल्यास, ही फुले एका विशिष्ट मसाल्यात उकळतात व पट्टी बांधताना फुले अगोदर जखमी भागावर ठेवतात. हाडे जुळून येतात हा त्यांचा अनुभव आहे. उतरणीच्या खाली पारिथेरमची सुद्धा लागवड करतात

डोंगरावरून एक रस्ता "दुर्गा-दोलन" या स्थानापाशी जातो दुर्गादेवीचे हे छोटेसे मंदिर आहे दुर्गा सर्व संकटाचे हरण करते हा जनतेचा विश्वास आहे. दुर्गा-दोलनच्या जरा वर गेल्यास खळाळून वाहणारी दुधासारखा पाण्याचा रंग असणारी दूधगंगा दृष्टीस पडते दूधगंगा ज्या भूभागातून वाहते ती सांगी-सफेद दरी एक रम्य स्थान आहे. याच्या उत्तरेकडील पर्वतांच्या उतारावर ज्यूनिपर झुडपे खूप उगवतात. ज्यूनिपरफळापासून युरोपात 'जिन' नावाचे मद्य बनवितात, विशेषत हॉलण्ड व इंग्लडमध्ये. ज्यूनिफर फळांपासून बनलेल्या ड्रायजिनची लज्जत विशेष असते असे म्हणतात या खोऱ्यातील कुरणांचा उपयोग मेंढयांच्या चरण्याकडे जास्त होतो मेंढ्या फुलांना फारसे वाढूच देत नाहीत. त्यांच्या आतच ती स्वाहा होतात

युसमर्गच्या या भागात टूरिस्ट लोक खूप येतात दरीच्या मध्यभागी खूप टूरिस्ट हट्स निर्माण झाल्या आहेत. एक "हेल्थ रिसॉर्ट" म्हणून याची विशेष ख्याती पसरत आहे. युसमर्गच्या सौंदर्यासाठी त्याला छोटेखानी गुलमर्ग म्हणतात

**कोन्सर नाग, कऊमसारस किंवा विष्णु पाद –**

पन्तसालच्या उच्च शिखरांखाली तीन शिखरे ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तींच्या नावाची आहेत. या शिखरांखाली एक अत्यन्त विलोभनीय सारस उर्फ तलाव आहे. त्याचा आकार प्रचण्ड उजव्या पायासारखा (टाच, पाच बोटे ) आहे, म्हणून त्याला 'विष्णुपाद' म्हणतात हे 'सारस' सुद्धा १२००० फूट उंचीवर आहे आजूबाजूच्या हिमाच्छादित शिखरांतून शुभ्र

हिंदु त्याला नदऋषीची समाधी म्हणतात, मुसलमान शेख नुरुद्दीनचा झियारात हिंदुमुसलमानांनीच नव्हे तर सर्व प्राणीमात्रानी एकमेकांवर प्रेम करावे, एकमेकाच्या उपयोगी पडावे, धार्मिक मतभेदांना जागा नसावी अशी त्याची सुफी तत्त्वज्ञानाला अनुसरून शिकवण होती अनंत नाग जिल्ह्यातील कैमोह खेड्यात नुरुद्दीनचा जन्म १४ व्या शतकात झाला वडील लहानपणीच निवर्तले होते नुरुद्दीनची धार्मिक प्रवृत्ती शैशवापासून आढळून येई त्याचे लग्न झाले पण त्याची वृत्ती विरक्त राही दुसऱ्या मुलांच्या जन्मानतर, एका मध्यरात्री त्याने घराचा व ससाराचा त्याग केला बारा वर्षे एका गुहेत त्याने चिंतनात घालविली. ईश्वराला अनन्यभावे शरण, आत्मसमर्पण, सदाचार आणि प्रेम ही त्याची मुख्य शिकवण होती या तत्त्वांचा प्रचार जन्मभर त्याने केला. शिरडीच्या साईबाबाप्रमाणे हिंदु व मुसलमान दोन्ही याचे भक्त आहेत त्यांतून हिंदू अधिक आहेत,

युसमर्ग उर्फ लघुगुलमर्ग --श्रीनगरपासून तीस मैलांवर व झियारातपासून ११ मैलावर पीर पन्तसाल पर्वताच्या उतारावर हे एक रम्य ठिकाण आहे. युसमार्गचा मार्गही मोठा आल्हाददायक आहे. रस्त्याच्या दुतर्फा पाईनची उंच झाडे, नीलनाग नदीचा किनारा, हिरवीगार शेते, फळानी लादलेल्या बागा व त्यातून दरवळणारा मंद सुगंध व त्यात लुप्त झालेले इवलेसे गोजी पठार खेडे आणि जवळच जिवंत पाण्याचा तलाव. या तलावाची खोली ३० फूट आहे व यातील पाणी कुठे बाहेर पडताना दिसत नाही खेडूताची श्रद्धा की एकदा भूकपाचा हादरा बसला असता हे तळे निर्माण झाले या तळ्यात सुसरी व साप खूप आहेत, व राक्षसांनी सापाचे व सुसरीचे रूप धारण केले आहे, असे लोक सांगतात. मात्र या तलावातील पाणी अगदी स्वच्छ, निळसर व ऊबदार आहे.

पर्वतांच्या उतारावर प्रचण्ड पाईन आणि फरची झाडे आहेत. पायथ्याशी अनेक प्रकारची फुले आहेत, त्यात डॅन्डेलियन (मेडन् हॅन्ड) फुले पण आहेत. या फुलाचा उपयोग फ्रान्स व युरोपमध्ये वाइन (मद्य)

तयार करण्यात आणि सॅलडसारखा करतात पण इथल्या रहिवाशांना त्यांचा औषधी उपयोग अधिक माहीत आहे. हाड कुठे निखळले असल्यास किंवा फ्रॅक्चर झाले असल्यास, ही फुले एका विशिष्ट मसाल्यात उकळतात व पट्टी बांधताना फुले अगोदर जखमी भागावर ठेवतात हाडे जुळून येतात हा त्याचा अनुभव आहे. उतरणीच्या खाली पारियेरमची सुद्धा लागवड करतात

डोंगरावरून एक रस्ता "दुर्गा–दोलन" या स्थानापाशी जातो दुर्गादेवीचे हे छोटेसे मंदिर आहे दुर्गा सर्व संकटाचे हरण करते हा जनतेचा विश्वास आहे दुर्गा–दोलनच्या जरा वर गेल्यास खळाळून वाहणारी दुधासारखा पाण्याचा रंग असणारी दूधगंगा दृष्टीस पडते. दूधगंगा ज्या भूभागातून वाहते ती सांगी–सफेद दरी एक रम्य स्थान आहे. याच्या उत्तरेकडील पर्वताच्या उतारावर ज्यूनिपर झुडपे खूप उगवतात. ज्युनिपरफळापासून युरोपात 'जिन' नावाचे मद्य बनवितात, विशेषत हॉलण्ड व इंग्लंडमध्ये. ज्यूनिफर फळापसून बनलेल्या ड्रायजिनची लज्जत विशेष असते असे म्हणतात. या खोऱ्यातील कुरणांचा उपयोग मेंढयाच्या चरण्याकडे जास्त होतो मेंढ्या फुलांना फारसे वाढूच देत नाहीत त्याच्या आतच तो स्वाहा होतात

युसमर्गच्या या भागात टुरिस्ट लोक खूप येतात दरीच्या मध्यभागी खूप टुरिस्ट हट्स निर्माण झाल्या आहेत. एक "हेल्थ रिसॉर्ट" म्हणून याची विशेष ख्याती पसरत आहे. युसमर्गच्या सौंदर्यासाठी त्याला छोटेखानी गुलमर्ग म्हणतात

कोन्सर नाग, कउसरसर किंवा विष्णु पाद –

पन्तसालच्या उच्च शिखराखाली तीन शिखरे ब्रह्मा, विष्णु, महेश या त्रिमूर्तींच्या नावाची आहेत. या शिखराखाली एक अत्यन्त विलोभनीय सारस उर्फ तलाव आहे. त्याचा आकार प्रचण्ड उजव्या पायासारखा (टाच, पाच बोटे ) आहे, म्हणून त्याला 'विष्णुपाद' म्हणतात हे 'सारस' सुमारे १२००० फूट उंचीवर आहे. आजूबाजुच्या हिमाच्छादित शिखरातून शुभ्र

पाण्याचा सतत पुरवठा याला होत असतो. तलावाची लांबी २ मैल व रुंदी पाऊण मैल असून पाण्याची खोली १५० फूट आहे. श्रीनगरपासून बसने जाण्याचा रस्ता आहे. बसचा पहिला थांबा शुपियानला, श्रीनगर-पासून ३१ मैलावर आहे

शुपियान – हे व्यापारी दृष्टीने फार महत्त्वाचे केंद्र आहे लोकरी कपडे इथे बनतात, लोकरीचा मोठा उद्योगधंदा या गावात आहे शुपि-यानची आणखी ख्याती तेथील फळांसाठी आहे, खास करून सफरचंदांसाठी इथे मिळणारी सफरचंदे चवीला मधुर असतात. इतिहासात राजकीय घडामोडींसाठी शुपियानने नाव कमावले होते. पूर्वीचा अफगाण अमल जाऊन शीखांचे वर्चस्व १८१९ मध्ये महाराजा रणजित सिंगच्या आधि-पत्याखाली इथेच सुरू झाले.

इथून ट्रेकिंग करायला खूप जागा आहेत त्यासाठी भाड्याची तट्टे व सामान वाहून न्यायला पोर्टर्स मिळतात. कारण इथून अहरबल उर्फ हरिबल ( विष्णुचे स्थान) धबधबा आठ मैलावरच आहे. शुपियानपासून एक मैलावर कपाला मटसान निर्झर आहे. हिंदू त्याला फार पवित्र मानतात. ऑगस्टमधल्या एका विशिष्ट दिवशी इथे हिंदू लोक मोठ्या संख्येने येतात. त्या दिवशी,त्या वर्षात मृत्यू पावलेल्या मुलांचे एक प्रकारचे श्राध्दच तिथे होते.

अहरबल– हरिबल– विष्णुधाम– मोटारीने किंवा पायी, शुपियान पासून केवळ आठ मैलांवर हे स्थान आहे ट्रेकिंग करण्यात विशेष मौज आहे. कारण आजूबाजूला पाईन वृक्षांचे गर्द अरण्य इतरत्र दिसणार नाही. धबधब्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा अल्पाईन फुले आहेत. जातांना गौरवतनला एक पूल आहे त्या पुलावरून खाली पाहिजे की भव्य दृश्य दिसते, व वेगाने वाहणारा प्रवाह दिसतो. एक मैल पुढे गेल्यावर अहरभल प्रपात दिसतो. ५० फूट कड्यावरून पाणी खाली पडते. सूर्योदयाचे वेळी हिमाच्छादित शिखरावरून कोवळी किरणे चमकत खाली इंद्रधनुष्ये निर्माण होतात व जलप्रपातातील तुषार निरनिराळ्या रत्नांसारखे

चमकतात, ते दृश्य अवीट आहे. यातील सौंदर्याचा आस्वाद मनोसक्त घेता यावा यासाठी टुरिस्ट हट्स बांधल्या आहेत. गिर्यारोहक कोनमर नागपर्वतवर चढण्यासाठी इथून ४ मैलवरील सेडाऊ गावापासून सुरवात करतात तिथूनच खरी चढण आहे. सेडाऊला चढायला सुरवात केल्यानंतर चार तासानंतर 'कुगवतन' नावाच्या रमणीय भागाकडे गिर्यारोहक येतो.

कुगवतन– शुपियानपासून ११ मैलावर निर्झरा पासून जरा अंतरावर हे रमणीय स्थान आहे. नदीच्या किनाऱ्याजवळ असलेल्या पाईन वृक्षांच्या राईत एक गरम पाण्याचा गंधकाचा झरा आहे. मुक्काम करायला टुरिस्ट हट् बांधलेली आहे. या मोकळ्या कुगवतन स्थानी खूप मोठी कुरणे आहेत व त्यात चराई करायला बकऱ्या मेंढ्यांचे कळपच्या कळप येत असतात. त्याचे "पालक" धनगर हे गूजर (काश्मिरी मुसल-मानां मधील गवळी जमात) आणि रजपूत लोक जुलै–ऑगस्ट महिन्यात 'चोथ–यात्रे"ला येतात त्यांच्याकडे पाहिल्यानंतर आपण जुन्या बायबलच्या अब्राहाम आणि इझाकच्या काळात आहोत असेच वाटत, बहुधा हे लोक त्यांचेच वंशज असावेत याच्या कपड्यांचा रंग काळा असतो. डोक्यावर एक बसकी गोल टोपी असते. अशी टोपी आपल्याला काश्मीरमधल्या मुसलमानाच्या डोक्यावर सुध्दा दिसेल. टोप्यावर कवड्या असतात या गुराख्यांच्या जमावात बायका सुध्दा असतात त्याच्याही डोक्यावर टोप्या असतात. त्या अधिक खाली लोंबणाऱ्या असतात. बायका पुरुषापेक्षा अधिक चपळ, चरतरीत वाटतात आणि पुरुषांपेक्षाही अधिक काम करतात. काश्मीर मधल्या सर्वसाधारण बायकाबद्दल (मध्यम किंवा वरिष्ठ वर्गातील नव्हे) हेच म्हणता येईल. शेतांवर काम करणे, खपणे व घरातील सगळी कामे व मुलांकडे पाहणे, ही सगळी कामे बायका करतात.

आसपासच्या भागातून, अनेक ठिकाणी पाण्याचे झरे निघताना दिसतात, जणु काय जमिनीला भोक पडले आहे व त्यातून फवारा निघत आहे. एका ठिकाणी असे सात प्रवाह आहेत व त्याला "सात पोखरी" म्हणतात. "सात पोखरी" हे नभोमंडलातील "सप्तर्षी" चा अपभ्रंश आहे

व त्याला अनुलक्षून हे नाव ठेवले गेले असावे. त्या सप्तर्षींची पृथ्वीवरील ही रुपे आहेत, अशी श्रद्धा आहे

एका खोलगट भागात जमीन साचले गेले आहे. त्याला महिनाग म्हणतात कुगवतनपासूनचा "येचिनी" पर्यन्तचा चढाव १० मैलाचा आहे ही चढण चढताना मन प्रसन्न व उल्हसित राहते. महिनागच्या किनाऱ्याने जाणारा रस्ता दुर्गम नाही काही वेळाने महिनागचा प्रवाह ओलाडावा लागतो. पाण्यापेक्षा मोठमोठाले दगडच अधिक आहेत उजव्या किनाऱ्याकडील रस्ता जवळचा आहे पण दगडांतून जावे लागते. डावीकडील अधिक अंतराचा पण सुगम आहे जवळ जवळ १०,००० फूट चढून गेल्यावर मैदानाच्या शिखरावर आपण येऊन पोचतो. इथून दिसणारे सृष्टि सौंदर्य पाहून असे वाटते, हे स्वर्गातल्या देवदेवतांचेच स्थान असावे या पुढील २०० फुटाचा रस्ता बर्फाच्छादित व उताराचा आहे पाय निसट• ण्याचा संभव असतो किंचितशी बेफिकिरी दाखविल्यास घरंगळत जाऊन साठसत्तर फूट खाली बर्फाळचा भूमीवर पडावे लागते. याच मार्गाने गुजर लोक आपली गुरेढोरे, शेळयामेंढया चरण्यासाठी उन्हाळयात घेऊन येतात शिखरावरून खाली नजर टाकली की खाली तलावातील जलाशय निरनिराळे रंगच्छटांचा दिसतो आसपासच्या हिमाच्छादित पर्वताची प्रतिबिम्बे जलाशयात पडलेली असतात आपल्याला खिळून टाकतात. गुराखी पैजेवर म्हणतात की ती प्रतिबिम्बे नाहीत, तिथे एक सुवर्णमंदिर पुरलेले आहे. त्याच्या श्रध्देला हसावेसे वाटत नाही ते खरेच वाटते

जलाशयातून एक ओघ निघतो दऱ्यातून वाहणारा हा जलौघ सात मैल लांब आहे लक्षावधी वर्षांपासून तो वाहत आहे.

खाली उतरणे मात्र अवघड मुळीच नाही. गिर्यारोहकानी रंगीत कॅमेरे आपल्याबरोबर ठेवावेत. असली दृश्ये स्वित्झर्लंडमध्ये किंवा नॉर्वेतही पहायला मिळणार नाहीत नॉर्वेत दऱ्या मधून वाहणारे जलौघ (गॉर्ग ) आहेत, व उन्हाळयातून जवळ जवळ चोवीस तास सूर्य असल्याने या जलौघाचे दृश्य विलोभनीय दिसते खरे पण हिमालयातील भव्यता, काही उदात्तता, त्यातील मांगल्य व पावित्र्य, विविध रंगांचा शिडकाव, सूर्य

किरणांनी उदय व अस्त यावेळेस फेकलेले रंग, आणि या उदात्तेच्या पार्श्वभूमीवर हजारो वर्षांपासूनचे रहिवासी शेळ्या मेंढ्या चरायला नेताना पाहून आपण विसाव्या शतकात नसून त्या काळातच गेलो आहोत असे वाटते.

## गुलमर्ग

ज्या सृष्टिदेवतेने आपले सर्व सौंदर्य काश्मीरवर उधळले आहे, सर्व प्रकारचे सौंदर्य उधळले आहे, त्या सौंदर्याचे मुक्तपान करण्यासाठी ३ ठिकाणे खास आहेत गुलमर्ग, पहेलगाम व सोनमर्ग

गुलमर्ग हे ठिकाण श्रीनगरपासून ३२ मैलावर आहे. समुद्रसपाटी पासून ८५०० फूट उंचीवरील हे ठिकाण प्रचण्ड फर वृक्षांनी उंचच उंच असलेल्या पाईन वृक्षांनी रक्षण केलेल्या रत्नजडित कटोऱ्या सारखे आहे. 'गुलमर्ग' शब्द 'गौरीमार्ग' चा अपभ्रंश आहे वसंत ऋतूच्या मध्यात गुलमर्गची शोभा काय वर्णन करावी? जिकडे तिकडे फुलेच फुले विविध रंगाची हे सृष्टिसौंदर्य, नव्हे हा सृष्टिचा चमत्कार पृथ्वीवर अन्य कुठे पहायला मिळणार? इंदिरा गांधी विश्रांतीसाठी गुलमर्गलाच येत शेख अब्दुल्ला शनिवार रविवार आपल्या बेगमेसह इथे येई. ( आणि इथेच त्याला तत्कालीन राजप्रमुख डॉ करणसिंगने मध्यरात्री, अटक केली होती. शेख अब्दुल्ला त्यावेळी जम्मू–काश्मीरचा प्राईममिनिस्टर होता. ) त्साक राजा युसफ शहाला गुलमर्ग फार आवडायचे. आपले आवडते प्रीती पात्र हब्बा खातूनला घेऊन तो इथे यायचा व खुप हिंडायचा. येथील देवता "गौरी"– गौरी म्हणजे गिरीची मुलगी, म्हणून या ठिकाणाला 'गौरीमार्ग'. म्हणतात १५८० मध्ये युसुफ शहाने त्याचे "गुलमर्ग" नामांतर केले.

पन्तसाल पर्वतराईच्या वायव्ये कडील हे ठिकाण १४,८०० फूट असलेल्या 'अफावंत' च्या छायेत आहे. गुलमर्ग जवळ जवळ दोन मैल लांब पसरलेले आहे, आणि पाऊण मैल रुंद आहे श्रीनगरपासून सुंदर रस्ता गुलमर्गपर्यन्त केलेला आहे. श्रीनगरनंतर २४ मैलावर 'तनमर्ग' ठिकाण लागते. तनमर्ग पर्यंतचा मार्ग जवळ जवळ सपाटच आहे. तनमर्ग

सुध्दा ७४०० फूट उंचीवर आहे तनमर्गला बसेस चहासाठी थांबतात शिवाय सरकारी विश्रामगृह आहे. हिंदु आणि मुसलमान यांची वेगवेगळी उपहारगृहे आहेत स्वच्छतेला इथे फाटा दिलेला आहे तेव्हा कोणी स्वच्छतेचे फाजील स्तोम माजवू नये. श्रीनगर ते तनमर्ग रस्ता फारच सुंदर आहे रस्त्याच्या दुतर्फा पॉप्लर झाडें व आजुबाजूला भाताची खाचरे व मक्याची कुरणे दिसतात. इथून पुढे गुलमर्गचा रस्ता थोडा अरुंद, खूप वळणांचा व चढणीचा आहे. पायी जाणाऱ्यासाठी, ट्रेकिंग करणाऱ्यासाठी एक छोटा फूटपाथ पण आहे

गुलमर्गच्या भोवती एक बाह्य वर्तुळाकार मार्ग ( सर्क्युलर वॉक ) पाईनच्या जंगलातून ११ मैल लांबीचा आहे. इथून जाताना उत्तरेकडे ८५ मैल लांब असणाऱ्या नंगा पर्वताची शिखरे दिसतात

गुलमर्गच्या दोन्ही बाजूला डोंगर आहेत. व ते उंच फर आणि पाईन झाडांनी भरलेले आहेत खालच्या मैदानावर अनंत रंगांची फुलेच फुले आहेत. गुलमर्ग हे हौशी व रंगेल तसेच धाडसी व खेळाडू लोकाचे ठिकाण आहे इथे ब्रिटिशांनी जी गोल्फ मैदाने अतिशय काळजीपूर्वक व मेहनत घेऊन तयार केली आहेत, तशी मैदाने निदान आशियात तरी कुठे नाहीत ८७०० फूट उंचीवरील या मैदानात, ९ होल व डबल फ्लॅग १८ होल आहेत गुलमर्ग खेरीज श्रीनगर व पहेलगामलाही गोल्फ क्लब्ज आहेत गुलमर्गच्या गोल्फ क्लबचे वैशिष्टय म्हणजे गोल्फर्स साठी निवासाची सोय क्लबमध्येच केलेली आहे. वसंत व हेमंत ऋतूतील गोल्फ टूर्नामेन्टस श्रीनगर आणि गुलमर्ग, दोन्ही ठिकाणी जून व सप्टेंबर महिन्यात होतात अजूनही गुलमर्गचे वातावरण पाश्चात्य वाटते. ब्रिटिश जमान्यात रेसिडेंटने गुलमर्ग हे उन्हाळ्यात राहण्याचे ठिकाण केले होते त्याने सुंदर टेनिस कोर्टही तयार केली, आणि पाश्चात्य हॉटेलेही बांधली सेंट मेरीज, चर्चेहायलॅन्ड हॉटेल, हॉटेल नेडोस, हॉटेल वुडलॅन्ड ही त्यातील विशेष हॉटेले होत हॉटेल्स खेरीज पुष्कळश हट्स ( पर्णकुटचा ) निर्माण झाल्या आहेत व प्रवाशाना इथे आरामशीर मुक्काम करता यतो.

"गुलमर्ग गोल्फ क्लब' मध्ये सीझन असता गुलमर्गला एक जिवंतपणा असतो. क्लबच्या सगळया हालचाली दोन अत्यन्त सुंदर गोल्फ कोर्सेस भोवती असतात, ही मैदाने प्रथम १८९० मध्ये ले कर्नल नेव्हिल चेम्बर-लेनने तयार करायला सुरुवात केली होती. १९०२ मध्ये ती पूर्ण झाली. मुलांसाठी निराळे मैदान आहेत अधिकृरीतत्या १ मे पासून सीझन सुरू होतो, तो १५ ऑक्टोबरपर्यन्त असतो. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्या नंतर आजूबाजूच्या टेकड्या व गुलमर्गच्या काही भागावर बर्फवृष्टि सुरू होते नाताळात आणि मार्चमध्ये, राज्य शासनाच्या टूरिस्ट खात्यातर्फे स्कीईंगचे खेळाचे आयोजन केले जाते. स्कीईंग साठी खिलनमर्ग, अफारवंत वरील उतार फारच चागले. अधिकृतरीत्या पधरा पंधरा दिवसांसाठी हे आयोजन असते, पण नेहमीप्रमाणे, अनधिकृतरीत्या मध्य डिसेम्बर ते मार्च अखेरपर्यन्त स्कीईंग सुरू असते. त्यासाठी सामग्री म्हणजे स्कीज, स्कीबूट, क्लव्ज, इ. पुरविली जाते.

खिलनमर्गला महिला खिलाडूसाठी स्वतंत्र निवासाची सोय आहे.

बर्फवृष्टि सुरू झाल्यावर गुलमर्गचे सौंदर्य आगळेच दिसू लागते. उतार बर्फाच्या जाड थरांनी भरले जातात. आणि बर्फावरील खेळ खेळण्या-साठी खिलाडी येईपर्यन्त या सर्व भागावर गभीर शांतता पसरते शंकराचा वर्ण, त्याचा नीलकण्ठ, त्याच्या भोवतालचा सर्प, शिरावरील गंगा, शरीराला फासलेले भस्म त्याचे गण, या सर्वांचे रहस्य व अर्थ इथे यावेळी उमगायला लागतो.

गुलमर्गचे महत्त्व तिथल्या विविध गोष्टीवर अवलंबून आहे. गोल्फ् आणि विंटर स्पोर्ट्स्साठी गुलमर्ग प्रख्यात आहे ट्रेकिंगसाठी प्रसिद्ध आहे. उन्हाळ्यात तेथील सृष्टिसौंदर्य वेडावणारे आहे श्रीनगर पासून गुलमर्ग पर्यन्त पुष्कळ बसेस असतात सरकारी टूरिस्ट खात्याच्या लक्झरी कोचेस असतात. त्यासकाळी ८-८॥ ला निघून संध्याकाळी परत येतात. गुलमर्गला आल्यानंतर खिलनमर्गला जरूर जावे. तिथे जाण्यासाठी भाड्याचे तट्टे मिळतात. ही तट्टे शिकवून तरबेज झालेली असतात. अगदी शांतपणे

निर्विकार सन्यासी वृत्तीने ही तट्टू पाठीवरील माणसाचे ओझे वाहून नेतात. शिवाय, गुलमर्ग ते खिलनमर्ग खिंडी तरून जाणारा ६५६१ फूट लांबीचा रोपवे सुद्धा आहे एक लहानसा रोपवे ( दोरखंडाला पाळणा बांधून ) गुलमर्गच्या एका टेकडीपासून दुसऱ्या टेकडी पर्यन्तची खिण्ड ओलांडयाला ५९० फूट अंतरासाठी केलेला आहे तिथे खूप गर्दी असते पण या हवाई पाळण्याने जाण्यात खरी गम्पत नसते तट्टावरूनच जायला पाहिजे. उन्हाळ्यात, म्हणजे मे– जुन महिन्यात सुद्धा टेकडीच्या शिखरावर तुरळक तुरळक, हलक्या थराचे बर्फ असते तट्टावरून शिखरापर्यंत पोचणारे प्रवासी, परत येतांना बर्फ घेऊन येतात

खिलन मर्ग – फुलांचा गालिचा

गुलमर्गपासून चार मैल अंतरावरील हे गुलमर्गपेक्षाही २००० फूट अधिक उंचीवर असलेले ठिकाण म्हणजे जिकडे तिकडे फुलांचा गालिचाच पसरल्यासारखा वाटतो चढत असता फुलाची वृष्टीच झाल्यासारखी वाटते. खिलनमर्गचे दोन भाग आहेत. पश्चिमखिलन उर्फ खोरीवन (खोऱ्यातले वन)आणि पूर्वखिलन उर्फ बाग्नील १ मैल लांब व १२०० फूट रुंदीचा हा भाग शासनाने "सुरक्षित" (रिझर्व्हड कॅचमेन्ट एरिआ) ठेवला आहे. इथूनच गुलमर्गला पाणी पुरविले जाते या भागात जायला बंदी आहे. मानवी वर्दळ नसल्याने, फुलांनी हा भाग पूर्णपणे व्याप्त असून फुलांचेच ते छोटेखानी राज्य आहे खिलनमर्गच्या शिखरावर उभे राहिले म्हणजे हिमालय पर्वताच्या रांगा दिसू लागतात उत्तरेस महाप्रचण्ड नगापर्वत (अगदी उघडाबोडकाच वाटता) पूर्वेस अजस्त्र हरमुख सिंध खोऱ्यात नजर टाकून आहे, महादेवपर्वत श्रीनगरचे रक्षण करीत आहे.

**गोठलेला तलाव–अलापाथोर :–** अफार्वतच्या मुख्य शिखराच्या पायथ्याशी (१४८०० फूट) व खिलनमर्गच्या मागील कडेने, नागमोडी रस्ता गेला आहे, तो अलोपथरी मैदानात जातो, आणि तिथून तलावाकडे जातो हे तलाव जूनपर्यंत गोठलेले असतात. जूनपूर्वी या मार्गाने जाणे धोक्याचे असते, कारण बर्फावरून पावले निसटतात. पर्वतांवरील बर्फाचे

गोल दगड बनतात व त्यावर किरणे पडून पाचू, वैडुर्य या रत्नांची आठवण करून देतात, पण इथले दृश्य पाहून मनुष्य थबकतो. सौंदर्या-पेक्षा भीषणता अधिक वाटते

कण्ठार नाग—नील कण्ठ '— काश्मीरमधल्या सर्वात उंचीवरले, (१३२५० फूट) हे सरोवर म्हणजे शिवाच्या निळ्या कण्ठासारखे दिसते इथल्या बहुतेक सरोवरांना कोणत्या तरी देवतेचे नाव दिलेले असते. कण्ठार नाग वर्तुळाकृती आहे व त्याचा परीघ २०० फूट आहे. पिकनिक्‌साठी वा ट्रेकिंगसाठी लोक इथे येत असतात. गुलमर्गजवळ पुष्कळ छोटे छोटे नाले आहेत त्यातील फेरोजपूर नाल्यापासून कण्ठीर नागला जायला तीन दिवस लागतात. मध्ये हरपत झबऱ ओढा लागतो, त्याच्यापुढे 'पदन'ची चढण आहे व टोकावर गेले की 'नागरद' हे कॅम्पिंगन ठिकाण आहे. नागरदला अनेक झरे आहेत नागरदला रात्र घालविल्यावर, दुसरे दिवशी 'नाशुकरी बल'ची चढण सुरू होते जवळ जवळ ६०० फूट गेल्यानंतर, रस्ता एका झऱ्याच्या बाजूने जाऊ लागतो. हेच स्थान म्हणजे कण्ठार नाग—कण्ठार-नागला गुजर लोकांच्या झोपड्या आहेत त्याच्या जवळच कॅम्पिंगनसाठी जागा निवडावी— इथून परत गुलमर्गला खिलनमर्गमार्गे जातात.

या भागात मलबेरी, अक्रोट, पेअर, सफरचंद यांची झाडे मुबलक आहेत देवदार वृक्ष आहेत. इथून जवळ जंगल "सुरक्षित" क्षेत्र आहे त्यात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत असे सांगतात

हा सगळाच भाग ट्रेकिंग करायला आदर्श आहे अल्पाईनची कुरणे, तोसा मैदान इत्यादि ठिकाणी जाऊन राहाणे फारच आल्हाददायक आहे. इथे राहाण्याने मनुष्याची प्रकृती सुदृढ होते व बाह्य सुधारलेल्या जगाचा त्याला विसर पडतो अशी अनंत ठिकाणे गुलमर्गच्या आसपास आहेत व या भागात एकदा राहिल्यास पुन पुन यावेसे वाटेल एखाद्या वाटाड्यावरोबर घ्यावा व कॅम्पिंगचे सामान बरोबर असावे. निसर्गाचे ऐश्वर्य, त्यात काय चमत्कार आहेत याची पुसटती तरी कल्पना येईल.

# पहलगाम

गुलमर्गचे सौंदर्य त्यातील भव्यतेमुळे आहे पहलगामचे सौंदर्य आगळेच आहे. गुलमर्गला ट्रेकिंग करायला तरुण वय, धाडशी वृत्ति, कोप सहन करण्याची तयारी, अडचणींना तोंड देण्याची भावना पाहिजे. पहलगाम म्हणजे ट्रेकिंग करणाऱ्यांचा स्वर्गच आहे. पाश्चात्य प्रवासी काश्मीरला पौर्वात्य स्वित्झर्लंड म्हणतात, पण माझ्या मते, स्वित्झर्लॅन्ड याच्यापुढे काहीच नाही. जहाँगीरला काश्मीरचे वेडच होते व आपल्या अमदानीत त्याने इथे पुष्कळ बाग बगीचे निर्माण केले. शहाजहानने ममरवरी पॅव्हिलियन्स बांधले आणि ग्रीष्म ऋतूत राहण्यासाठी महाल बांधले औरंगजेबच्या जहानआरा मुलीचे हृदय तर काश्मीरने पुरे जिकले होते १८१७ त केलेल्या प्रवासाचे वर्णन तिने लिहून ठेवले व ते 'लालारुख या नावाने प्रसिद्ध झाले आहे. महाराजाच्या अमदानीत ब्रिटिशांना वा कोणाही श्वेतकाय परदेशस्थाला काश्मीरमधे जमीन विकत घ्यायची वा प्रॉपर्टी करता येत नसे त्यामुळे काश्मीरची अस्मिता टिकून राहिली

पहलगाम हे श्रीनगरपासून ६० मैलावर आहे टुरिस्ट केंद्रापासून शासनातर्फे लक्झरी बसेस सकाळी आठ साडेआठच्या सुमारास निघतात. आठच्या अगोदर पंधरा मिनिटे तरी हजर असायला पाहिजे तिकिटे आदल्या दिवशी काढून मिळतात व तसेच केलेले बरे. तुम्ही एखाद्या टुरिस्ट कंपनीतर्फे काश्मीरला आला असल्यास ती कंपनी तुमची व्यवस्था पाहतेच. पण जे स्वतंत्रपणे आलेले असतात व हॉटेलात उतरलेले

असतात, त्यानी सकाळी सातलाच इथे यावे. कारण, टुरिस्ट केंद्रावर शाकाहारी हॉटेल आहे. ते स्वच्छ आहे व तुम्हाला फराळाचे चांगले मिळते. पोहे, वडे उपमा, इडली–डोसा, इ. चहा पण चांगला मिळतो.

या बसेसमधून प्रवास आरामात होतो अर्थात आम्ही भारतीय पुष्कळवेळा काही स्थळे पाहायला जातो, ते इतराना सांगता यावे म्हणून विशेषत माझा असा अनुभव आहे की पंजाबी–शीख–सिंधी या लोकांना, आणि अधिकतर उत्तर हिंदुस्थानी लोकाना असल्या सौंदर्याची अभिरूची कमी असावी. त्यामुळे, सौंदर्य निरीक्षण करण्यापेक्षा किंवा त्याविषयी बोलण्यापेक्षा, ते बसमध्ये बसल्यानतर काही वेळा ट्रान्झिस्टर, टेपरेकॉर्डर उघडतील व ते कानठळ्या बसविणारे सगीत तुम्हाला जबरदस्तीने ऐकावे लागते व प्रवासातील आनद नाहीसा होतो. त्याचप्रमाणे या लोकांचा जठराग्नी नेहमीच प्रदीप्त असतो की काय कुणास कळे. कारण, बरोबर आणलेल्या पेटाऱ्यातून काहीना काही काढून यांचे खाणे सुरूच असते. या मानाने बंगाली व दाक्षिणात्य लोकाना प्रवासाचे महत्त्व कळलेले असते बहुतेक प्रत्येक ठिकाणी (गुलमर्ग, पहलगाम, सोनमर्ग आदि) यांच्या स्पेशल बसेस असतात. पहलगामला मला तर आश्चर्य वाटते, बगाली भाषेतले बोर्ड वाचून. त्यांच्यासाठी विश्राम स्थाने आहेत. त्याचप्रमाणे, गुजराथी लोकांचे विश्रामगृह (लॉजिग व बोर्डिग) आहे आणि तिथे उत्तम शाकाहारी जेवण मिळते. बस स्टॅन्डच्या अगदी जवळच गुजराथी हॉटेल आहे.

लक्झरी बसने प्रवास नको असल्यास साध्या बसेस ही असतात व त्याचे भाडे पुष्कळच कमी असते या बहुधा खाजगी मालकीच्या असतात, त्यामुळे याच्यात गर्दी पुष्कळ व अनेक ठिकाणी त्या थांबतात. याउलट सरकारी बसेस उतारू अधिक घेणार नाही व मोजक्या, निश्चित ठिकाणीच थांबतात आणि ठराविक वेळी, म्हणजे सध्याकाळी सहाचे सुमारास श्रीनगरला परत येतात यासाठी शासकीय लक्झरी बसने प्रवास करणे हितावह आहे.

पहलगामला गेल्यानतर, टूरिस्ट कंपनीने तुमच्यासाठी तिथे तट्टाची सोय बहुधा केलेली नसते बसमधून उतरल्यानतर अनेक तट्टेवाले काश्मीरी मुसलमान त्यांच्या काश्मीरी पोशाखात, तुमच्याभोवती गर्दी करतील. प्रथम ते वाटेल तेवढे पैसे मागतील तेव्हा, माहीतगाराकडून एका तट्टाचे ताशी किते भाडे अगोदर ठरवून घ्यावे तट्टू म्हणजे काही अरबी घोडा नाही गरीब प्राणी, गाढवासारखा तुम्ही एकदा त्याच्यावर स्वार झालात की मालकाच्या आदेशाची वाटही न पाहता ते चालायला लागते या तट्टांवर बसायला घाबरायचे काहीच कारण नाही. माझी पत्नी घोड्यावर किंवा तट्टूवर कधीही बसलेली नव्हती, व बसायला घाबरत ही होती, काही वेळेस रस्ता चढणीचा किंवा उतरणीचा असतो, वाट खूप अरुंद असते, खाली घसरल्यास कपाळमोक्षच व्हायचा. त्यातून पुन्हा, समोरून परत जाणारे तट्टे येत असतात. अशा वेळी आपल्या छातीत तर धडकीच भरते. परतु ही गरीब, आज्ञाधारक जनावरे कधीही "टेक ओव्हर" करणार नाहीत; समोरून तट्टे येत असल्यास जागा नसल्यास कडेला थाबतील हे सर्व पाहून नवल वाटते शिवाय, निघाल्यानतर, प्रथम कोणत्या ठिकाणी थांबायचे हे सुध्दा त्यांना माहीत असते पुष्कळ वेळा तट्टांचा मालक ( किंवा ज्याचेकडून आपण तट्टू भाड्याने घेतो ) तो आपल्याबरोबर चालत नाही. पुढे असतो किंवा मागे असतो. फक्त चढावयाला व उतरावयाला तो येतो अशावेळी आपले तट्टू शिकवल्या प्रमाणे वागते. एखादे स्थळ पाहून सपल्यानतर, आपण त्याचेवर आरूढ झालो की पुढे कुठे जायचे हे ही त्याला माहित असते. धन्याच्या आदेशाची वाट न पाहता ते चालू लागते. तेव्हा. प्रवाशानो ( स्त्री, पुरुष, लहान मुले सुध्दा) बिनधास्त तट्टांवर स्वार व्हावे काही काही वेळेस आपल्याला या तट्टाची कीव येते, कारण आरूढ झालेल्या व्यक्तीचे वजन २००—२५० पौंडही असते।

पहलगामला अक्रोड फार स्वस्त मिळतात, व चागले असतात. १९८३ साली ७ रुपये किलो हा भाव होता. पहलगामला अक्रोड खूप होतात बसमधून उतरल्यानतर ढीगच्या ढीग अक्रोडांचे, विकण्यासाठी

तुम्हाला आढळतील इथेही भाव करायलाच पाहिजे कारण, टुरिस्टस्ना लुबाडणे हे काश्मीरी लोक जाणतात. तसे पाहिले तर हिंदूच्या धार्मिक स्थळी लुबाडणाऱ्या पंड्यांपेक्षा हे लोक बरे वाटतात. कारण, हंगाम संपला की हे घरी बसले। वर्षातले सात महिने तरी घरीच बसावे लागते, म्हणून वर्षाची बेगमी हंगामात करावी लागते.

पहलगाम अधिक सुंदर की गुलमर्ग की सोनमर्ग, याची चर्चा पुष्कळ जण करतात. यावर मत देणे अवघड आहे. मला पहलगम अधिक आवडले कारण तिथे शेषनाग नदी ( उर्फ पूर्व लिडुर ) वरून उतरलेली उर्फ लम्बोदरी नदी व अरु या नद्यांचा संगम आहे ( या नदीतच एका दिल्लीच्या अधिकाऱ्याने आपल्या पत्नीचा खून करून प्रेत टाकले होते हो माहिती वर्तमानपत्रातून प्रवाशांनी वाचली असेलच. ) पहलगाम हे ७००० फुट उंचीवर आहे देवदार, ज्यूनिपर आणि अन्य अनेक जातीची झाडे इथे आहेत इथले सृष्टिसौंदर्य गुलमर्गपेक्षा निराळे आहे हिमालयाचे उंच पर्वत आसपास दिसतात, त्यांच्या शिखरावर उन्हाळ्यातही तुम्हाला बर्फाचे बारीक थर दिसतील व कुठली तरी झाडेही दिसतील. इथली लॅन्डस्केप्स् माणसाला लुब्ध करतात. एका महान जादुगार चित्रकाराने आपल्याला पाहाता यावे व शांती, सौंदर्य, यांचा अनुभव घेता यावा म्हणून निर्माण केले आहे. इथल्या सौंदर्यातील कोमलता, प्रसन्नता, शुचिता गांभीर्य, यांचा अनुभव घेत असता, माणूस अध्यात्मिक विचारांनी भारला जातो संवेदनाशील व्यक्तीला तर इथून हलावेसे वाटणार नाही स्वित्झर्लंडची लोक तारीफ करतात, त्याचप्रमाणे इंग्लडमधल्या "लेक डिस्ट्रिक्ट कट" ची लोक तारीफ करतात मी दोन्ही ठिकाणी जाऊन आलो आहे. इग्लंडमधले लेक डिस्ट्रिक्ट ( सरोवरांचा प्रदेश ) निश्चितच पाहण्या सारखा आहे सुप्रसिद्ध निसर्ग कवि विल्यम वर्डस्वर्थ याच ठिकाणचा. तो ग्रासमीयर या सरोवराच्या गावी राहत असे. ज्या मोठ्या शिलाखडावर बसून वर्डस्थने आपली सुप्रसिद्ध "डॅफोडिल्स" कविता लिहिली, तो शिलाखड ग्रासमीयर तलावाच्या किनारी आहे, तो आपल्याला दाखवितात कवीमनाला सुंदर काव्ये निसर्गाच्या स्तुतीवर लिहायला लेक

डिस्ट्रिक्ट आदर्श आहे पण आमचा मराठी कवि बालकवि हा मात्र खान-देशच्या ( हल्ली जळगाव जिल्हा म्हणतात ) रुक्ष भुमीत जन्मला आणि तरीही त्याने सुंदर निसर्ग कविता लिहिल्या बा सी. मर्ढेकरही खान देशचेच.

पण लेक डिस्ट्रिक्ट मधल्या काही भागाच्या सौंदर्यात थोडी "भयानकता" आहे. कित्येक सरोवरे इतकी शांत, निर्जन भागात आहेत की तिथे मनाला थोडी भीतीच वाटते. पहलगाम पाहाताना असा अनुभव कधीही येणार नाही. सृष्टीचा चमत्कार पाहून माणसाचे मस्तक परमेश्वरा पुढे आपोआप नम्र होते.

मूळ पहलगाम हे मेंढया चरणविणाऱ्या गुराख्याचे छोटे से खेडे मोगलानी त्याला जागे केले आणि ब्रिटिशांच्या काळात त्याला प्रसिद्धी मिळाली. स्वातंत्र्यानंतर तर टुरिस्ट लोकांचे तांडेच्या तांडे यायला लागले इथून अमरनाथला जाता येते ही एक फार महत्वाची गोष्ट आहे दुसरे गुलमर्गपेक्षा इथे राहुटया ठोकून त्यात आठ पंधरा दिवस किंवा १ – २ महिने घालविणे याची लज्जत न्यारीच आहे त्या दृष्टीने इथली हवा अधिक चागली आहे. ट्रेकर्संना तर पहलगाम प्रारंभी म्हटल्याप्रमाणे आदर्श आहे गुलमर्ग प्रमाणे रस्ते ( पायवाटा ) धोक्याचे नाहीत. काही अंतर गेल्यानतर, तपकिरी काळसर रगाची अस्वले आढळतील. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही अस्वले शाकाहारी आहेत वनस्पती, फळे इ वर ते राहतात येवढे प्रचण्ड धुड भाजीपाल्यावर कसे राहाते हे नवलच आहे

गुलमर्गपेक्षा इथे टुरिस्टसाठी अधिक हॉटेले, हटस्, कॉटेजेस, राहुटया, विश्रामगहे आहेत पुष्कळशी तरुण जोडपी मधुचंद्रासाठी इथे येतात त्यासाठी इथले वातावरण खरोखर रोमँन्टिक आहे. वृद्ध माणसाना आपले वय विसरायला लावणारे हे ठिकाण आहे. पहलगामला मोकळे व उघडे मैदान विस्तृत आहे, व आसपास कृपाळूदृष्टीने पाहाणारी हिमशिखर. जवळच शेषनाग आहे जूनपर्यंन्त तो पूर्ण बर्फाच्छादित

असतो त्याचे शिखर सप्तशिराच्या शेषनागा सारखे दिसते म्हणून त्याचे शेषनाग नाव पडले. आपल्या भारतीय पूर्वजांची काव्यशक्ती व प्रतिभा शक्ती प्रखर व सौंदर्यपूर्ण होती निरनिराळ्या पर्वतांना व नद्यांना त्यांनी दिलेली नावेच त्याची साक्ष आहे.

पहलगामला "पहलगाम क्लब" हा एक "एक्स्ल्यूजिव्ह" क्लब आहे. सभासदां खेरीज अन्य कुणाला प्रवेश नाही अर्थात्, तात्पुरते सभासद बनण्याची सोय आहे. टेनिस, बॅडमिंटन या साठी कोर्टे आहेत. गोल्फसाठी आहेत. आणि इथे भोजन फार रुचकर मिळते. काश्मीरी व पाश्चात्य, दोन्ही पध्दतीचे

**श्रीनगरहून पहलगामला जाताना पाहण्या सारखी ठिकाणे.—**

**पाम्पोरे**— श्रीनगरपासून हायवे वर केवळ १० मैलांवर हे गाव आहे. पाम्पोरे केशरांच्या लागवडी साठी प्रसिद्ध आहे जिकडे तिकडे केशराची शेते दिसतात केशराची लागवड जुलै—ऑगस्ट महिन्यात होते. ऑक्टोबर मध्ये कापणी होते. रोपाला गद जाभळी फुले येतात. कापणीच्या वेळेला ती लालसर नारगी होतात हौशी प्रवाशानी शक्य असल्यास एखादे फूल मिळवावे व काश्मीर—स्मृति म्हणून जतन करावे. एरव्ही केशराचे फूल पाहायला तरी कसे मिळणार? मजजवळ अशी दोन फुले आहेत. दरवर्षी हजारो टन केशराची उत्पत्ती होते. त्यासाठी सरकारी फॅक्टरिज गुदाम, आहेत. केशराचे फूल असते यातील पू—स्त्री केसर म्हणजे केशर अर्थात् सगळेच केसर केशर नसतात. त्याची पारख केशर—पारखीच करू जाणे या पाकळ्या तोडून त्या सुकवितात व 'केशर' म्हणून विकले जाते

काही दुकानातून केशर अत्यन्त स्वस्त मिळते वस्तुत, त्याचा भाव १९८३ मध्ये श्रीनगरला रु १००/ होता म्हणजे असली केशराचा पण काही दुकानातून ४० ते ५० रुपये भावापर्यन्त केशर मिळते. याचे कारण, असली केशरी ततू बरोबर अन्य ततूही केशराचा रग व सुगध, "पुष्पसगे मातीस वास लागे" या न्यायाने घेता ते केशर म्हणून विकल

जाते. काही ठिकाणी असली केशराच्या केसराबरोबर साथीचे केसर मिसळले जातात, तेही स्वस्त मिळते पाम्पोरेला शासकीय दुकान केशर विकण्यासाठी आहे श्रीनगरला पण शासकीय एम्पोरियममधून केशर विकले जाते ते कितपत 'अस्सल' याची खात्री देता येत नाही, पण अगदीच बनावट नसते असली केशर विकत घेण्यासाठी परिचयाचे,खात्रीचे दुकानदार हवेत, काही दुकानदारांची स्वतःची केशराची शेते आहेत त्यांचेवर विश्वास ठेवून जावे लागते सरकारी अधिकारी किंवा लष्करी अधिकारी ओळखीचा (चांगल्या दाट ओळखीचा) असल्यास, तो तुम्हाला असली केशर आणून देतो. श्रीनगरचे स्थायिक पंडित लोक ओळखीचे असल्यास, त्यांचेमार्फत मिळू शकते. अन्यथा, दैवावर हवाला देऊन डोळे मिटून घ्यावे.

'पाम्पोरे' पूर्वी मोठे शहर होते व ते राजा आजातपीडच्या काळात (८१३-८५०) पद्मने वसविले होते याच ठिकाणी संत लाला ईश्वरीने अवतार घेतला होता व विश्वबंधुत्वाचा प्रचार केला होता.

अवंतीपूर -(अवंतीवर्मनची स्वप्न-नगरी)

पाम्पोरेच्या पुढे एक मैल गेल्यानंतर, वैष्णव राजा अवंतीवर्मनने (८५५-८८३) बांधलेल्या दोन विशाल मंदिराचे भग्न अवशेष दिसतात. शासकीय टूरिस्ट बस इथे मुद्दाम १५ मिनिटे तरी थांबते ही मंदिरे किती भव्य होती याची कल्पना खाडन झालेल्या,पण अजूनही ताठ उभ्या असलेल्या स्तम्भावरून येते एक मंदिर विष्णूचे आहे व त्यापलिकडे सहाफलीगावरचे शिवमंदिर आहे. अवंतीवर्मनचा काळ समृद्धीचा व शांततेचा होता; आणि त्याच्या कारकिर्दीतली बांधली गेलेली मंदिरे तत्कालीन काश्मीरी हिंदु स्थापत्यशास्त्राच्या उच्च स्तराची साक्ष पटविते. नदीचा प्रवाह संपूर्णपणे बदलण्याची किमया याच्याच वेळची. राज्यदरबारचा इंजिनियर सूर्य, त्याने शादिपुऱ्याच्या खाली वितस्ता (झेलम) नदीच्या प्रवाहाचा मार्गच बदलला व त्याने बदललेल्या मार्गाने वितस्ता गेली ११०० वर्षे वाहात आहे. अवंतीवर्मनची राजधानी अवंतीपूरला आली त्यावेळी बुद्धधर्माचा जवळ जवळ अस्तच भारतात झाला होता, व हिंदुधर्म पूर्णपणे

प्रस्थापित झाला होता मंदिरांची अडण घडण सुद्धा हिंदुधर्माचा प्रभाव दाखविते

शिवमंदिर 'अवंतीश्वर या नावाने प्रसिद्ध होते त्याच्याभोवती दगडाची अजस्त्र भिंत उभारलेली आहे मुख्य दरवाजा पश्चिमेकडे आहे शिवमंदिरापेक्षा अधिक प्रेक्षणीय, विष्णूचे "अवंतीस्वामी मंदिर होय कमानी स्तम्भ, देवळाच्या चारही कोपऱ्यातील लहान मंदिरे, मोठे पटांगण, भिंतींवरील शिल्पकाम हे सर्व प्रेक्षणीय आहे. विशेषत स्तम्भावरील कोरीव काम तर अप्रतिम आहे.

पट्टण — श्रीनगरपासून १७ मैलांवरील पट्टण या गावी (पूर्वीचे नाव शंकरपुपट्टण, शंकरवर्मन राजाच्या, ८८३-९०२ मूळचे नाव शंकर-पुरपट्टण) शिवमंदिरे पुष्कळ आहेत राजा शंकरवर्मन आणि राणी सुगंधा दोघेही शंकरभक्त व दोघांनीही मंदिरे बांधली यातले सर्वात मोठे मंदिर म्हणजे शंकरगौरीश्वर—पट्टणलासुद्धा टूरिस्ट बस थांबत असते, पण थोडा वेळ

अनंत नाग अनंताचे धाम '— हायवेवर हे गाव लागते पण काझीकुंडकडे (म्हणजे बनिहालपास, जम्मूला जाणारा हायवे) जाणारी बस गावाबाहेरून जाते व पहलगामकडे जाणारी बस गावामधून जाते आणि शहराच्या केंद्रभागात उभी राहाते. हिंदूंना या स्थानाचे महत्त्व आहे काश्मीरमध्ये झरे अनेक ठिकाणी आहेत, आणि अनंतनागलाही पुष्कळ झरे आहेत या सर्व झऱ्यात सर्वात मोठा म्हणजे अनंतनागचाच, विष्णु ज्या शेष नागावर शयन करतो त्या शेषाचे धाम म्हणजे अनंत' होय, म्हणून त्याचे नाव अनंतनाग. या झऱ्याचे पाणी कुंडात आणले आहे अर्थात पाणी वाहतेच असते आणि ते इतके शुभ्र आहे की खालचा तळ स्पष्टपणे दिसतो पाणी आणखी एका कुंडात जाते, तिथे महादेवाचे लिंग आहे जवळच एक अत्यंत सुंदर मंदिर आहे. आपण मुसलमान बहुमुख्य असलेल्या काश्मीर-मध्ये आहोत असे इथे वाटत नाही, इतका इथे हिंदुत्वाचा दाट प्रभाव आढळतो मंदिर अत्यंत स्वच्छ आहे व पंडेगिरी अर्थातच नाही जम्मू-

काश्मीरचे हे वैशिष्ट मला पुन पुन्हा सांगावेसे वाटते की इथली मंदिरे अतिशय स्वच्छ, भरपूर सूर्यप्रकाश गाभ्यापर्यंत असलेली आणि पण्डेगिरी नाही. पुष्कळ हिंदू प्रवासी इथल्या कुंडात स्नना करतात पाणी औषधी व गंधकयुक्त आहे. जवळून खळाळून वाहाणारा शुभ्र पाण्याच्या झऱ्यातील पाणी अमृतासारखे मधुर आहे इंद्राला गौतम ऋषीने शाप दिल्यानंतर त्याच्या शरीराला हजार क्षते पडली, तेव्हा भगवान् विष्णूने इंद्राला या कुंडात स्नान करायला सांगितले होते अशी दंतकथा आहे. इंद्राच्या शरीरावरील हजार क्षते नाहीशी होऊन त्याजागी हजार नयन आले, म्हणून इंद्राला सहस्त्रनयन म्हणतात. आश्विनातल्या शुक्लपक्षातील चतुर्दशीस इथं हिंदूची मोठी यात्रा भरते, ते उपवास करतात आणिखीरेचा नैवेद्य वाहत्या झऱ्याला अर्पण करतात.

हिंदु मुसलमान दंगे झाले म्हणजे अनतनागला त्याचे चटके चांगलेच बसतात. वर्तमानपत्रात त्या बातम्या वाचल्याही असतील विलायती दारू विक्रीची दुकाने हिंदूच्या मालकीची आहेत आणि दंगा झाला म्हणजे कुराणात मद्यपान निषेध आहे. याचे स्मरण याचवेळी मुसलमानाना होते व दंगेखोर दुकानांची नासधूस करतात

अनतनागचे आणखी एक वैशिष्टच प्रवाशासाठी आहे, ते म्हणजे. काळ्या काबळ्यावर केलेले विणकाम हे एक प्रकारचे गालिचेच असतात यांना गब्बा म्हणतात - श्रीनगरलाही दुकानातून हे गालिचे "गब्बे" मिळतात, पण अनतनागलाच ह्या काबळ्यावर कशिदा काढणारे आहेत व अतिशय सुंदर हे गालिचे असतात दुसरे गालिचे कमीत कमी १२०० ते २००० रु पर्यन्त मिळतात, पण हे १०० रु. पासून ५०० रु. पर्यंन्त मिळतात अनतनागला हे गब्बे जरूर विकत घ्यावेत टिकायलाही पुष्कळ वर्षे टिकतात

मट्टान उर्फ मार्तण्ड तीर्थ – टुरिस्ट बस बहुधा इथे थांबायची नाही. अनतनागच्या पूर्वेस चार मैलावर व श्रीनगरपासून ३८ मैलावर हे तीर्थ आहे, आणि जवळ जवळ सर्व देशातून यात्रेकरू या तीर्थक्षेत्री येतात विष्णु आणि सूर्याची पूजा मार्तण्डच्या रूपाने इथे होते. या मार्तण्ड तीर्था-

बद्दल अनेक दतकथा प्रचलित आहेत. परंतु, शिवाने या तीर्थाला वरदान दिले आहे हा त्या दतकथांचा साराश आहे. विजया सप्तमी आणि द्वादशाला इथ भाविक लोक आपल्या पितराची श्राद्धकर्मे करतात. अर्थात नत्र देवतात सूर्यदेवतेला अधिक महत्त्व आहे

**मार्तण्ड मंदिर** — हे तीर्थ एका पठाराच्या पायथ्याशी आहे पठारा-वरच 'बावन' उर्फ "मट्टान" गाव आहे मार्तण्ड मदिराची उभारणी ललितादित्य मुक्तपीडने (उर्फ मु–तो–पि), जो ६४९-७३६ काळात होऊन गेला त्याने केली हे मदिर शिल्पकामासाठी अत्यन्त प्रसिद्ध आहे ललितादित्य हा फार पराक्रमी राजा होऊन गेला. याने तिबेटही आपल्या अमलाखाली आणले होते, आणि चीनला राजदूत पाठविला होता. तो स्वत विष्णूचा उपासक असला तरी त्याने शिवमंदिरे आणि बौद्धांसाठी विहारही बांधले.

'राजतरंगिणीत' ल्या काही श्लोकावरून हे मदिर पाचव्या शतकात राजा रणादित्य व त्याची राणी अमृतप्रभा यानी बांधले असा अर्थ होऊ शकतो, परंतु, उपलब्ध पुराव्यांवरून राजा ललितादित्यानेच हे भव्य मदिर बांधले हे निश्चित ठरते.

हे मदिर शिवाला अर्पण केलेले असले तरी यात भैरव, नटराज व त्रिमूर्ती याच्या पण मूर्ती आहेत. आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे जल-विहाराच्या वस्त्रातील गगा पण आहे. काहीच्या मते हे मदिर ग्रीस, पार्थिनान किंवा ताजमहालपेक्षाही भव्य व सुदर आहे, व जगात याच्या तोडीची इमारत नाही, असाही दाव केला जातो. यगहस्बन्ड या सुप्रसिद्ध कलासमीक्षकाने तर या मदिराची फार स्तुती केली. तो म्हणतो, 'भव्यतेत ईजिप्शियन पिरॅमिड्स व स्फिन्क्स आणि सौंदर्यात ग्रीकाच्या शिल्पाची बरोबरी करणारे हे मदिर आहे."

मट्टान आणि मार्तण्ड तीर्थापासून २ मैलांवर एका सपाट भूमीवर या मदिराची उभारणी आहे. या मदिरातील स्तम्भ तर ग्रीक शिल्पकलेला मागे टाकतील अशी त्यावरील कलाकृती आहे. अर्थात, कालिदासाने म्हटल्या-

प्रमाणे "सा रम्या नगरी" ची पुढे, अवस्था झाली तीच या मंदिराचीही झाली आता हे भग्नमंदिर, २२० 'X १४२' लाम्बीरुंदीचे व ७२' उंच शिखर असलेले पाहून विस्मय वाटतो व थोडा विषादही वाटतो या मंदिरात ८४ स्तम्भ होते, म्हणजे वर्षातले सप्ताहचे दिवस, व बारा राशी त्यावर रेखाटलेले आहेत पाण्याची व्यवस्था लिद्दर नदीतून प्रवाह काढून केली होती यगहमवन्डने पुढे म्हटले आहे, "या भग्नावस्थेत सुद्धा मंदिराची भव्यता, कला, निरनिराळ्या शोभिवंत आकृत्या हे पाहून मन थक्क होते त्या काळात भारत या कलेत किती प्रगत होता याची कल्पना येते याची प्रमाणबद्धता तर दिङ्मूढ करणारी आहे". शिल्पकलेची आवड असणाऱ्यांनी. भारतीय पुरातत्त्वाचा अभ्यास करणाऱ्यांनी व भारताच्या प्राचीन वैभवाचे दर्शन व्हावे अशी इच्छा बाळगणाऱ्यांनी या मंदिरास अवश्य भेट दिली पाहिजे. तुम्ही ज्या प्रवासी कंपनीतर्फे प्रवास करीत असाल, त्या कंपनीच्या चालकाला मार्तण्ड मंदिराचे दर्शन ही बाब कार्यक्रमात अंतर्भूत करायला सांगावे या मंदिरातील अनेक दगड कुठे गेले, इथल्या मूर्तींना छिन्न भिन्न कुणी केले याचा इतिहास, भारतातल्या अन्य देवळाची व मूर्तींची तशी दशा कोणी केली तोच आहे

अन्य काही स्थळे –याच्या आसपास आणखी काही ऐतिहासिक स्थळे पाहण्यासारखी आहेत 'ऐतिहासिक' विशेषण लावण्याचे कारण म्हणजे काश्मीरचा इतिहास काश्मीरचे परिवर्तन, काश्मीरमधील हिंदु मुस्लीम संत यांचे अध्ययन करणाऱ्यांनी या स्थळांना जरूर भेट द्यावी. उदाहरणार्थ,मट्टनपासून केवळ १ कि मी अंतरावर बुमाझाव गावी प्राचीन मंदिर राजा क्षेमगुप्तच्या काळात (९५०–९५८) भीम साहीने बांधलेले दृष्टोस पडते पूर्वी या गावाचे नाव भीमकेसवा असे होते. मंदिरात पुढे बाबा बमुद्दीन निवासाला आला. बाबा बमुद्दीन पूर्वी एक निःसंग हिंदु साधु होता पण इस्लामचे आक्रमण झाल्यानंतर त्याने इस्लाम धर्माचा स्वीकार केला. पण ,त्यायोगे त्याच्या पूर्वीच्या धर्मपरायणतेत किंवा अखिल मानवजातीवर प्रेम करण्याच्या व्रतात फरक पडला नाही हल्ली मुसलमानाचे 'झियारात' चे (धार्मिक यात्रा ) हे स्थळ आहे. या वास्तूत बाबा बमुद्दीनला कफन केले गेले होते. जवळच

एक गुहा आहे व तिथले मदिर अजूनही चागल्या अवस्थेत आहे मुसलमानानी एक थडगे तिथे बाधले आहे

**ऐषमुक्काम झियारात**– चौदाव्या शतकात काश्मीरमध्ये अनतनाग जिल्हयातील कैमोह गावी सुफी सत नूरुउद्दीन होऊन गेल्याचे मागे लिहिलेच आहे नुरुद्दीनला नदा ऋषि पण म्हणत; कारण लाला ईश्वरी या हिंदु सताने त्याला उपदेश केला होता. नुरुद्दीनने जन्मभर समता व बधुभावाचा प्रचार केला त्याच्या चार महत्वाच्या शिष्यांपैकी एक शिष्य पहलगाम भागात मरण पावला होता व त्याचा दर्गा आहे त्या शिष्याचे नाव झैन शहासाहेब उर्फ बाबा झियाउद्दीन– मुसलमानाप्रमाणे हिंदूही त्याला मानतात व हिंदूमध्ये जनक ऋषि या नावाने तो माहीत होता. पहलगामला जाताना, रस्त्याच्या कडेला ५०. फूट उचीवर याच्या स्मरणार्थ मशीद बाधली गेली. ही जागा मोठी रमणीय आहे पाईन वृक्ष, देवदार वृक्ष, फर, ज्यूनिपरची झाडे, आणखीही अन्य प्रकारचे वृक्ष याचे जगलच आहे. खाली त्रिकोणाकृति दिसणाऱ्या भागात शेषनाग व अरु याचा सगम आहे आजुबाजूला हिमाच्छादित पर्वत शिखरे आहेत असे वाटते, निसर्गाची पूजा करण्यासाठी ही जागा निवडली गेली असावी

मामलेश्वर– लिद्दुर उर्फ लम्बोदरी नदी वितस्ता नदीला मिठी मारण्यासाठी खळाळून पहलगाम दरीतून वाहत जाते तिच्या डाव्या बाजूला सपाट मैदान व उजव्या बाजूला प्रवाहाने पर्वताला पाडलेल्या कपारे– याच्या विरुद्ध दिशेला, एका झऱ्यापाशी महादेवाचे मामलेश्वर मदिर आहे हे मदिर किती प्राचीन आहे याची कल्पना करवत नाही. परतु बाराव्या शतकात राजा जयसिंहाने (११२८–११४९) या मदिरावर सोन्याचे कळस चढविल्याचे उल्लेख आहेत मदिरासमोर सभागृह आहे त्याच्या बाजूला स्तम्भ आहेत समोरच पक्क्या दगडानी बाधलेली १२ वर्गफुटाची पाण्याची टाकी आहे इथले सौदर्य इथल्या पक्ष्यात आहे किती• तरी रगाचे विविध पक्षी इथे आहेत त्यात मधुर सगीत गाणारेही आहेत

**भाई सरण**– इथून जवळच, तीन कि मी वर भाई सरण नावाची हिरवीगार दरी सारखी जागा आहे आजुबाजूला पाईनचे घनदाट जगल

प्रमाणे "सा रम्या नगरी" ची पुढे, अवस्था झाली तीच या मंदिराचीही झाली आता हे भग्नमंदिर, २२० 'X १४२' लाम्बीरुंदीचे व ७२' उच्च शिखर असलेले पाहून विस्मय वाटतो व थोडा विषादही वाटतो या मंदिरात ८४ स्तम्भ होते, म्हणजे वर्षातले सप्ताहचे दिवस, व बारा राशी त्यावर रेखाटलेले आहेत पाण्याची व्यवस्था लिड्डर नदीतून प्रवाह काढून केली होती यंगहसबन्डने पुढे म्हटले आहे, "या भग्नावस्थेत सुद्धा मंदिराची भव्यता, कला, निरनिराळ्या शोभिवंत आकृत्या हे पाहून मन थक्क होते त्या काळात भारत या कलेत किती प्रगत होता याची कल्पना येते याची प्रमाणबद्धता तर दिङमूढ करणारी आहे". शिल्पकलेची आवड असणाऱ्यांनी भारतीय पुरातत्त्वाचा अभ्यास करणाऱ्यांनी व भारताच्या प्राचीन वैभवाचे दर्शन व्हावे अशी इच्छा बाळगणाऱ्यांनी या मंदिरास अवश्य भेट दिली पाहिजे. तुम्ही ज्या प्रवासी कंपनीतर्फे प्रवास करीत असाल, त्या कंपनीच्या चालकांना मार्तण्ड मंदिराचे दर्शन ही बाब कार्यक्रमात अंतर्भूत करायला सांगावे या मंदिरातील अनेक दगड कुठे गेले, इथल्या मूर्तींना छिन्न भिन्न कुणी केले, याचा इतिहास, भारता-तल्या अन्य देवळांची व मूर्तींची तशी दशा कोणी केली तोच आहे

**अन्य काही स्थळे** —याच्या आसपास आणखी काही ऐतिहासिक स्थळे पाहण्यासारखी आहेत 'ऐतिहासिक' विशेषण लावण्याचे कारण म्हणजे काश्मीरचा इतिहास काश्मीरचे परिवर्तन, काश्मीरमधील हिंदु मुस्लीम संत, याचे अध्ययन करणाऱ्यांनी या स्थळांना जरूर भेट द्यावी. उदाहरणार्थ,मट्टान-पासून केवळ १ कि मी अंतरावर बुमाझाव गावी प्राचीन मंदिर राजा क्षेम-गुप्तच्या काळात (९५०–९५८) भीम साहीने बांधलेले दृष्टोस पडते पूर्वी या गावाचे नाव भीमकसेवा असे होते मंदिरात पुढे बाबा बमुद्दीन निवासाला आला. बाबा बमुद्दीन पूर्वी एक नि:संग हिंदु साधु होता पण इस्लामचे आक्र-मण झाल्यानंतर त्याने इस्लाम धर्माचा स्वीकार केला. पण ,त्यायोगे त्याच्या पूर्वीच्या धर्मपरायणतेत किंवा अखिल मानवजातीवर प्रेम करण्याच्या व्रतात फरक पडला नाही. हल्ली मुसलमानांचे 'झियारात' चे (धार्मिक यात्रा ) हे स्थळ आहे. या वास्तूत बाबा बमुद्दीनला कफन केले गेले होते. जवळच

एक गुहा आहे व तिथले मंदिर अजूनही चांगल्या अवस्थेत आहे मुसलमानांनी एक थडगे तिथे बांधले आहे

**ऐषमुक्काम झियारात**– चौदाव्या शतकात काश्मीरमध्ये अनंतनाग जिल्ह्यातील कैमोह गावी सुफी संत नूर-उद्दीन होऊन गेल्याचे मागे लिहिलेच आहे नूरउद्दीनला नंदा ऋषि पण म्हणत; कारण लाला ईश्वरी या हिंदु संताने त्याला उपदेश केला होता. नूरउद्दीनने जन्मभर समता व बंधुभावाचा प्रचार केला त्याच्या चार महत्वाच्या शिष्यांपैकी एक शिष्य पहलगाम भागात मरण पावला होता व त्याचा दर्गा आहे त्या शिष्याचे नाव झैन शहासाहेब उर्फ बाबा झियाउद्दीन– मुसलमानांप्रमाणे हिंदूही त्याला मानतात व हिंदूमध्ये जनक ऋषि या नावाने तो माहीत होता. पहलगामला जाताना, रस्त्याच्या कडेला ५०० फूट उंचीवर याच्या स्मरणार्थ मशीद बांधली गेली. ही जागा मोठी रमणीय आहे. पाईन वृक्ष, देवदार वृक्ष, फर, ज्यूनिपरची झाडे, आणखीही अन्य प्रकारचे वृक्ष याचे जवळच आहे. खाली त्रिकोणाकृति दिसणाऱ्या भागात शेषनाग व अरु याचा संगम आहे आजुबाजूला हिमाच्छादित पर्वत शिखरे आहेत असे वाटते, निसर्गाची पूजा करण्यासाठी ही जागा निवडली गेली असावी

मामलेश्वर– लिड्डर उर्फ लम्बोदरी नदी वितस्ता नदीला मिठी मारण्यासाठी खळाळत पहलगाम दरीतून वाहत जाते. तिच्या डाव्या बाजूला सपाट मैदान व उजव्या बाजूला प्रवाहाने पर्वताला पाडलेली कपारे– याच्या विरुद्ध दिशेला, एका झऱ्यापाशी महादेवाचे मामलेश्वर मंदिर आहे हे मंदिर किती प्राचीन आहे याची कल्पना करवत नाही. परंतु बाराव्या शतकात राजा जयसिंहाने (११२८–११४९) या मंदिरावर सोन्याचे कळस चढविल्याचे उल्लेख आहेत मंदिरासमोर सभागृह आहे त्याच्या बाजूला स्तंभ आहेत समोरच पक्क्या दगडांनी बांधलेली १२ वर्गफुटाची पाण्याची टाकी आहे इथले सौंदर्य इथल्या पक्ष्यात आहे कितीतरी रंगाचे विविध पक्षी इथे आहेत. त्यात मधुर संगीत गाणारेही आहेत.

**भाई सरण**– इथून जवळच तीन कि मी वर भाई सरण नांवाची हिरवीगार दरी सारखी जागा आहे आजुबाजूला पाईनचे घनदाट जंगल

आणि वर्फाच्छादित पर्वतानी वेढलेलीही जागा अतीशय रम्य आहे याची उचीच ८० ० फूट आहे गिर्यारोहण करणाऱ्याना घोडी मिळतात.

तुलियन सरोवर—भाई मरजपासून हे सरोवर ११ कि. मी. (७ मैल आहे ) हे सरोवर आसपासच्या बर्फशिखरानी जणु आच्छादलेले आहे, आणि वर्षातले अनेक महिने ते बर्फाच्छादितच असते, ते १२००० फूट उचीवर आहे गिर्यारोहक पायी जाऊ शकतात किंवा भाडयाची तट्टेही मिळतात चढण कटाळवाणी वाटत नाही माणूस अखेरपर्यंन्त ताजा-तवाना असतो

## पहलगाम खोऱ्यातील भ्रमन्ती (ट्रेकिंग )

पहलगाम हे शेषनाग (पूर्व लिडुर उर्फ लम्बोदरी ) आणि अरु ( पश्चिम लिडुर ) या नद्याच्या सगमावर आहे हे मागे लिहिलेच आहे. या खोऱ्यातील शेवटले खेडेगाव अरू ( उच्चार अराऊ करतात ) हे सात मैलावर आहे व ७९०० फूट उचीवर आहे पहलगाम खोरे म्हणजे सौदर्याचे कोमल नृत्य व भैरवाचे तांडव नृत्य! कडाक्याच्या थडीत भैरव नृत्य दिसेल, पण अन्य महिन्यात सौदर्याची लयलूट असते मात्र सौंदर्यदृष्टि पाहिजे पुष्कळसे लोक इथ येतात आणि 'बॉबी' सिनेमाचे शूटिंग कुठे झाले ती जागा पहयाला उन्मुक्त असतात, भारतीय चित्रपटातील ड्रिडिग आणि ओंगळ नर्तन फक्त ज्याच्या सौदर्यदृष्टीला आवडतात त्याना इथे कटाळा येईल भारतीय चित्रपटातीलच संगीत ऐकण्याची ज्याना सवय, ते भीमसेन जोशींच्या गाण्याला, बिसमिल्ला खॉच्या सनई वादनाला व रविशंकरच्या सतारीला कटाळतात. त्याना इथल्या निर्झराचे सगीत पक्ष्याचे मजुळ गाणे, ऐकू येणार नाही. म्हणनच, कवीने उद्वेगाने लिहुन ठेवले आहे, अरसिकेषु कवित्व निवेदनम्, शिरसि मा लिख, मा लिख,मा लिख"! पहलगामला इतस्तत पसरलेली उच हिमशिखरे भव्यता आणि उदात्तता आणतात, त्यातून उडया मारणारे जलप्रवाह, त्यावरील उच उच वृक्षाची राई, हिरवीगार कुरणे, कधीही न आढळणाऱ्या पक्ष्याचे उड्डाण आणि कूजन पहलगाम ते अरु रस्ता असा गोजिरवाण आहे. त्याच्या

थोडेवर गेल्यावर निसर्गाच्या कुशीत गुजर आपल्या साथासुध्या झोपड्यात राहताना दिसतात. त्याच्या झोपड्या निसर्गानेच बांधलेल्या असतात लाकडाची उणीव नाही व पानाचे तर जंगलच. भिंती व छत तावडतोब तयार या झोपड्यातून किती ऊब असते ते आत गेल्यावरच कळते तेथील माणसा-प्रमाणेच हे गुजर मुसलमान आहेत, पण त्यांचा जीवनक्रम ऋग्वेद काळात ऋषींनी सूक्ते रचली त्यावेळी होता, तसाच आहे ते निसर्गाशी एकरूप झालेले आहेत. प्रथम तुमच्याकडे ते संशयाने पाहतील, कारण आधुनिक संस्कृतीचा स्पर्श त्यांना झालेला नाही. ट्रान्झिस्टर व वीज तिथे शिरली नाही. आपल्या जीवनक्रमापासून सर्वस्वी भिन्न अशा "सुधारलेल्या सुसंस्कृत" माणसांना आपल्यात एकदम सामावून घेणे त्यांना जमत नाही. हा अनुभव छत्तीसगढच्या जंगलातल्या वन्य जमातींसंबंधी येईल किंवा कोकणातल्या खाडीच्या पुराने उध्वस्त होत असलेल्या व वर्षानुवर्षे त्याला तोंड देत तिथे लहानशा खेडेगावात राहणाऱ्या कोकण्याकडून येईल

गुजरांची वस्ती खिलनला आणि आसपास आहे तो माग आक्रमीत असता, एके ठिकाणी मोठा खडक पाण्याच्या प्रवाहात दिसतो. त्याचा वरचा भाग तांबड्या रंगाचा आहे. त्याला 'गणेश' मानतात. लिद्दुर नदी गुर खम्बला दिसेनाशी होते (अरुपाशी ती पुन्हा ९० फूटानंतर दृग्गोचर होते. या प्रवाहाजवळ पुन्हा एक मोठा खडक आहे व तिथे माणसे ऐसपैस बसतील अशी बैठक झाली आहे

गुजराच्या झोपड्या निरनिराळ्या वेलींनी झाकल्या गेल्या आहेत त्याच्या झोपड्यांची कुंपणे म्हणजे उंच वाढलेले गवत गुजर आपल्या शेतात बटाटे, मका जाडा गहू हे धान्य काढतात

इथून जवळच आश्मीनचे खोरे आहे. ते एक रमणीय सहलीचे ठिकाण आहे पर्वतातून तीन निर्झर इथून वाहतात व त्यांचे पाणी हिम-प्रवाहाच्या पाण्यापेक्षाही अधिक शुभ्र आहे. याचे पाणी, एका पाश्चात्य प्रवाशाच्या मतानुसार शॅम्पेन प्रमाणे आहे, केवळ दिसायला नव्हे तर रूची सुद्धा व खूप प्यायले तर शॅम्पेन फार प्याल्यास चढते, तसे हे पाणी सुद्धा अमल आणते

लिडुरवटचे हिमप्रवाह् (ग्लेशियर्स) – अरुपासून चिचोळा रस्ता कोलोहोई ग्लेशियरकडे गेला आहे, व तो लिडुरवाटमधून हा जातो. हा सगळाच भाग वनश्रीने इतका नटलेला आहे की याची तुलना कोणत्याही सृष्टिसौंदर्याशी होऊ शकणार नाही. सगळे फिके पडेल. जगाच्या माथ्या-वरची ही बागेश्री अभूतपूर्व आहे इथे सृष्टी अशी नटली आहे, व आपले सौंदय तिने इतक्या तऱ्हेने व प्रकाराने अक्षरश उधळले आहे की मनुष्य स्तिमित होतो आसपास दिसणाऱ्या घळया, त्यात बहरलेली हिरवी वनस्पती, खळखळणारे धबधबे, या ठिकाणी तुम्हाला खानाबादोशची भटकी जमात आपले तंबू ठोकून राहाताना आढळतील वन्यजातीप्रमाणे याचे पोषाख विविध रगाचे असतात याच्या स्त्रिया या उंच, डौलदार आणि ऐटबाज आहेत आपल्याशी हे स्त्रीपुरुष अत्यत सौजन्याने वागतील, पण त्याच्याशी बोलताना आपणाला सतत वाटत असत, आपण एका आपल्यापेक्षा श्रेष्ठ जातीशी (सुपेरियर रेस) बोलत आहोत

हळूहळू रस्ता चढणीला लागतो व ७ मैलात आपण लिडुरवटच्या पाचव्या मैदानात येऊन पोचतो. हे स्थान १०८२६ फूट उचीवर आहे त्याला लम्बोदर वाट किंवा गणेशवाट असे नाव आहे आजूबाजूची गर्द झाडी त्याच्यामागे भव्य शिखरे पाईन वृक्षातून झिरपणारा कोमल आल्हाददायक सूर्यप्रकाश. हे मैदान चिचोळे होत होत एका नदीपाशी येते हा नदी वर्फाच्छादित असल्याने अचल वाटते, पण तिचा प्रवाह् हळू हळू सरकतच असतो व काही अतरावर पूर्णपणे जलमय होतो

लिडुरवाट ही यक्ष, गधर्व, किन्नर यांचीच भूमी वाटते. या ठिकाणी तीन मार्गांचा सगम (जक्शन) आहे एक पूर्वेकडे कोलोहोईला जातो, पश्चिमकडला सोनमर्गला जातो आणि दक्षिणेकडला पहलगामला जातो. हे रस्ते पवताला वळसे घालीत घालीत जातात खाली प्रवाहानी पर्वतात केलेल्या घळया दिसतात. लिडुरवाटचा मार्ग लिडुरनदीच्या डाव्या किनाऱ्या वरून जातो, नजीकडे पूल बांधला आहे व तो ओलांडल्यावर टूरिस्ट-साठी शासनाने विश्रामस्थान बांधले आहे या ठिकाणी टुरिस्टने विश्रांती

घेऊन पुढील प्रवासासाठी, तारसर सरोवराकडे जाण्यासाठी अथवा कोलो-होई ग्लेशियर (हिमनदी),(केवळ १० च मलावरील)पाहाण्यासाठी तयार व्हायचे असते

कोलोहोई खोरे म्हणजे फुलाची बिछायतच आहे. लिड्डर नदीने य चे दोन भाग केले आहेत व कुरणांवर गुजराच्या झोपड्या दिसतात यात फक्त जून ते ऑगस्ट मध्यापर्यंत बसती असते खोऱ्याच्या टोकाला गेल्यानंतर, ११२०० फूट उचीवरून हिमनदी पडताना दिसते; हाच अरु नदीचा उगम होय.

हिमालयाची उत्तुंगपर्वतश्रेणी वायव्य ते ईशान्येकडे कोलोहोईकडे गेलेली आहे इथल्या शिखराची उची १७८०० फूट आहे, कोलोहोईचे मूळचे नाव ग्वाशी ब्रार उर्फ तेजाची देवता इथून थोडे पूर्वेकडे गेल्यास जगप्रसिद्ध अमरनाथची गुफा लागते. जगन्लातून आणि कुरणातून मार्ग आक्रमण केल्यानंतर लिड्डरवाटच्या रेस्ट हाऊस पाशी आपण येऊन पोचतो जवळ जवळ ९९०० फूट उचीवर हे रेस्ट हाऊस आहे कोलोहोई खोऱ्या पासून अर्धा मैल, एक रस्ता प्रवाहाच्या डावीकडून जातो, तो १४००० फूट उचीवरील दुधनागकडे याचा आकार वर्तुळासारखा आहे व दूध वर्णाचा आहे.

दक्षिणेकडील शिखराची उची १७७९८ फूट आहे पायथ्याशी प्रचण्ड फत्तर आहेत व तिथून पश्चिम लिड्डरची उची दृग्गोचर होऊ लागते कोलोहोई आणि हरिपर्वत याच्यामध्ये हरमुख (शांततेचा देव)जो ग्वाशी ब्रार या तेजोदेवतेचा वर नियोजित झालेला असतो दतकथा अशी आहे की ग्वाशी ब्रारने हरमुखशी विवाह करण्याचे एका अटीवर मान्य केले, त्याने खाली झुकले पाहिजे. बिचारा त्याप्रमाणे झुकला, पण ग्वाशी ब्रारने आपले वचन पाळले नाही व आपले मस्तक हरमुखपेक्षा उच ठेवून दिमाखात ती तळपत असते

ग्वाशी ब्रारवर सूर्याची किरणं प्रथम पडून निमुळत्या होत गेलेल्या शिखराना ते तेजोमय करून सोडतात ते दृश्य म्हणजे भयचकित करणारे असते आग्नेय बाजूला अजूनही मानवाने पदभ्रष्ट न केलेली शीषराम नाग पर्वत पक्ती आहे (१६ ०० फूट उच)

कोलोहोई पर्वताच्या शिखरावर पोचल्यावर नून कून व नगा पर्वताची शिखरे (२३००० आणि २६१८१ फट अनुक्रमे) दिसू लागतात पहलगामपासून जाता येता चार दिवसाचा हा प्रवास आहे, पण ज्याना पर्वतारोहणाची हौस आहे व अगदीच गौरीशंकर किंवा नगापर्वतसारख्या दुर्गम व कष्टप्रद चढण चढण्यापेक्षा हा प्रवास अगदी आटोक्यानला व सोपा आहे इथून पुढे हरनाग सरोवराकडेही जाता येते. या सरोवरला "शांतीचे सरोवर नाव आहे ते अगदी यथार्थ आहे. या सरोवराचा आकार एखाद्या झोपलेल्या याक प्राण्याप्रमाणे आहे त्याचा आडवा पडलेला सुस्तावलेला देह व त्याची केसाळ शेपटी म्हणजे जग हा तलाव असले कोणतेही स्थान असले की त्याच्यामागे दंतकथा असलीच पाहिजे या तळ्याचीही दंतकथा आहे भारताचे दुर्दैव असे की या दंतकथा कोणत्या सत्य घटनेभोवती गुफल्या गेल्या आहेत याची उकल कोणी न केल्याने या दंतकथा विज्ञानाच्या दृष्टीने भाकडकथा व आमच्या सुशिक्षितांच्या दृष्टीने हास्यास्पद ठरल्या आहेत. हरनाग सरोवर ज्या हरनाग पर्वताच्या पायथ्याशी आहे, त्याने एकदा स्वतःसाठी स्वाशी वार जवळ राहाण्यासाठी एखादे सुंदर स्थान शोधायला आपल्या मुलाला व सुनेला पाठविले. त्यानी पुष्कळ जागा शुडल्या जागा होती, पण हरनागसाठी नव्हती निराश होऊन, हरनागने आपल्या जावयाला त्या कामावर पाठविले जावयाने जागा शोधून काढली पण म्हणाला की फक्त हरनागापुरतीच ती जागा आहे. हरनागने आपल्या मुलाचे व सुनेचे पाषाणात रूपांतर केले व जावयावर खूष होऊन त्याला आपल्या पायाशी जागा करून दिली, म्हणूनच त्या सरोवराला जामनौर नाग (जावई–तलाव) असे नाव आहे. दोन मोठाले शिला खडही तिथे आहेत–या भागातून धनगराची व गुराख्यांची वसती आहे आणि त्या तला-वाच्या देवतेस ते गुराखी व धनगर भाताचा प्रसाद अर्पण करीत असतात.

# अमरनाथ यात्रा

अमरनाथ यात्रा –भारतातले एक अत्यन्त पवित्रस्थान म्हणजे हिमा-लयावरील अमरनाथ शब्दश शेकडोशे नव्हे तर हजारो भाविक दरवर्षी

अमरनाथच्या यात्रेला जात असतात त्यात स्त्रियाचाही भरणा पुष्कळ असतो आणि या भाविकात अगदी जख्ख म्हातार. म्हाताऱ्या सुद्धा असतात आणि तरुण-तरुणी पण असतात पुष्कळसे भाविक आपले नवस फेडायला इथे अनेक कष्ट सहन करून येत असतात. अमरनाथची यात्रा म्हणजे सुखद मुळीच नव्हे त्यात शारीरिक कष्ट आणि क्रूर यातना आहेत. पुष्कळसे स्त्रीपुरुष डोली करून जातात. बरेचसे पायी जातात काही ठिकाणी रस्ता इतका काही अरुंद आहे की थोडीशी चूक झाल्यास खोल दरीत पडून एकदम स्वर्गातच रवानगी वैष्णव देवीपेक्षा अमरनाथची यात्रा कष्टाची व सहनशीलतेची कसोटी घेणारी आहे केवळ जबर इच्छाशक्तीच्या जोरावर व दृढश्रद्धेच्या बळावर स्त्रीपुरुष ही यात्रा पार पाडतात अमरनाथची यात्रा म्हणजे जीवनातली एक फार मोठी सफलता आहे वर मंदिरापाशी पोचल्यानंतर साऱ्या श्रमाचा परिहार
ह होतो व कष्टाचे चीज होते. अश्रद्ध माणसालाही भुरळ पाडील असे दृश्य वरून दिसते व आतील बर्फाची पिंडी म्हणजे तर एक चमत्कारच आहे.

र अमरनाथला पहलगामहून जाता येते शेषनागच्या उजव्या किनाऱ्यावरून हा रस्ता जातो. इथून तट्टे मिळतात किंवा पायी पण जाऊ शकतात पहिले मुक्कामाचे ठिकाण ९५०० फूट उंचीवरील, पहलगामपासून दहा
श मैलावरील चंदनवाडी होय इथून पिस्सूघाटी (११०८१ फूट उंच)
थ रस्ता जातो काही अंतरावर जोझीपाल ही गुजराची वस्ती लागते.
वन इथे यात्रेकरी मुक्काम करू शकतात इथून ८ मैलावर शेषनाग
दर्श आहे शेषनाग म्हणजे नागाचा फणा शेषनाग तलावाची लांबी ५
ग मैल, रुंदी २ मैल आहे हे अत्यन्त रमणीय स्थान आहे प्राचीन काळी शेषनागला "श्वशुर नाग" तलाव म्हणत, आणि वरच्या भागाला जामातर ( जामातृ ) नाग म्हणत दंतकथा अशी आहे की नागाने आपल्या मुलीचा विवाह बिजब्रेहऱ्याच्या एका विद्वान ब्राह्मण तरुणाशी लावून दिला. तिथल्या राजाची पापी दृष्टी नागाच्या मुलीवर पडली. तिचा ब्राह्मण पति तिचे रक्षण करण्याची धडपड करू लागला. ती तरुणी आपल्याला वश होत नाही असे पाहून राजा त्यांचा छळ करू

लागला नागाच्या कानावर ही बातमी जाताच त्याला अतिशय क्रोध आला त्याने तलावाचे रुप घेतले व तलावाचे पाणी प्रचण्ड फुगून सगळी नगरी जलसमाविस्थ झाली आपली कन्या व जावई यांना त्याने आपल्या बरोबर आणले, व तलावाचा वरचा भाग त्याना दिला, म्हणून त्याला जामातर नाग म्हणतात

इथून पुढे बावाजन पर्वतावर चढावे लागते हा मुक्कामाचा तिसरा टप्पा–

यानतर शेषनाग व सिध खोऱ्यातून महागुणा खिंडीतून जावे लागते ही खिड १४,४३५ फूट उचीवर आहे. इथून उतार लागतो, व पचतरणी मोकळा मैदानात पोचतो. हे ठिकाण यात्रेकरूच्या शेवटल्या मुक्कामाचे. याला पचतरणी म्हणण्याचे कारण म्हणजे इथे पाच रस्ते जात असे म्हणतात. इथून अमरगगा नदीच्या बाजूने हळूहळू चढण सुरु होते ही चढण खऱ्या कसोटीची आहे अमरनाथ गुफा इथून चार मैलावर १३१२३ फूट उचीवर आहे चार दिवस इथे पोचायला लागतात.

एका अमेरिकन प्रवाशाने इथले सृष्टिसौदर्य पाहून भारावून जाऊन असे उद्गार काढले, 'हे वन्यसौंदर्य इतके भव्य, विशाल, उदात्त आहे की जगात अन्यत्र कुठेही पाहायला मिळणार नाही'. आपण गुफाच्या जसजसे जवळ जात जातो, तसतसा रस्ता आकुंचित होत जातो. निसर्गाचा दोन रुपे, विनाश आणि सृजन, याचा क्रम नियमित इथे सुरू असतो विनाशाचे रुप आपल्याला एकदम अनुभवाला येते. हिमप्रवाहानी, जलधारांना, मोठमोठाल्या दगडांना कपारे पडलेले असतात. आजूबाजूला १७००० फूट उचीची हिमशिखरे. पर्वतावरुन दोन ठिकाणी ओहोळ येतात, त्याचा एक प्रवाह बनून तो गुहेसमोरून वाहता पर्वतावरून निसटलेल्या बर्फाच्या प्रचण्ड खडानी प्रवाह आच्छादला जातो शभर यार्ड आणखी चढल्यानतर गुहेच्या प्रवेशद्वारापाशी आपण येतो, तिथून 'अमरावती' नावाचा छोटासा ओहळ वाहतो. या प्रवाहात सर्व भाविक यात्री स्नान करतात. अमरावती-तले स्नान महान पुण्यकारक समजले जाते दतकथा अशी आहे की,

पंचतरणीला (शेवटच्या मुक्कामाचे स्थान) शिवाने आपले तांडव नृत्य सुरू केले होते. नृत्याच्या बेभान स्थितीत असता जटेतून पाच बटा खाली निसटल्या, आणि गंगेचे पाच प्रवाह उगम पावले. त्यातली ही अमरावती. स्नानाने शुचिर्भूत होऊन भाविक यात्री अत्यंत विनम्रतेने गुहेत प्रवेश करून पांढऱ्या शुभ्र महादेवाच्या पिंडीचे दर्शन घ्यायला जातात

अमरनाथ गुंफामधील या महान बर्फ लिंगाचे वर्णन करणे शब्दा-पलीकडे आहे आतमध्ये शिरल्यानंतर नास्तिक माणूस सुद्धा आस्तिक होऊन शिवलिंगापुढे मस्तक नम्र करील. या शिवलिंगाचा महिमाच अपरंपार आहे. तसे पाहिले तर हिमालयाच्या परिसरात भ्रमंती करीत असता, स्थायी स्थायी परमेश्वराचे अस्तित्व जाणवते, नव्हे, सान्निध्यच जाणवते. परंतु अमरनाथ गुफामधील शिवलिंगात एक जादू आहे ती जादू तुम्हाला जागच्या जागीच खिळवून ठेवते अशाच प्रकारचा, पण अल्प प्रमाणात, वैष्णवदेवीचे दर्शन घेताना अनुभव आला होता इथले सारे काही अद्भुत आहे ही गुफा १७,३०० फूट उंचीवर आहे गुहेमधल्या छतातून थेंब थेंब टपकणाऱ्या पाण्याचे बर्फ बनते व त्या बर्फकणातून शनैं शनैं लिंग तयार होते असे म्हणतात. या लिंगाचा पूर्ण आकार श्रावण शु. १५ म्हणजे नारळी पौर्णिमेस होतो, व त्या दिवशी इथे अक्षरश हजारो यात्री आलेले असतात हे लिंग एक फिकट निळसर रंगाच्या ओटलीवर बनत जाते लिंगाभोवती लोखंडी कठडे केले आहेत भाविकांनी तिथूनच दर्शन घ्यायचे असते आणखी एक न उलगडलेला गेलेला व बहुधा न उल-गडला जाणारा चमत्कार म्हणजे पांढऱ्या शुभ्र रंगाचे कबूतराचे जोडपे तिथे केवळ याच दिवशी आपल्याला आढळते अन्य कोणत्याही दिवशी ते जोडपे तिथे किंवा आसमंतात् सुद्धा दिसत नाही ते कबूतराचे जोडपे सुद्धा दर्शनार्थ येत असावे. दुसरे दिवशी ते जोडपे कुठे उडून नाहीसे होते त्याचाहि पत्ता लागत नाही– येते कुठून जाते कुठे? अन्य दिवशी नाही, फक्त नारळी पौर्णिमेच्या दिवशी व तेही बाहेर नव्हे, गुहेच्या आत! शास्त्रज्ञांनाही हे कोडे उलगडणार नाही

हल्ली या गुहेचे क्षेत्रफळ ६० फूट लांब ५५ फूट रुंद व ५० फूट खोल ( उंच ) असे आहे आणि प्रतिवर्षी गुहा मोठी होत आहे असे म्हणतात. कारण, छतावरील लाईमचा दगड विरघळून हळू हळू नाहीसा होत असावा. बर्फाची जी ओटली ( मोठ्या बैठकीसारखी ) आहे तिच्या वरच जिथे जिथे थेंब थेंब पाणी टपकते तिथे ते एकदम बर्फ बनत नाही. त्या आसनावर आणखी दोन निमुळते दोट फूट उंचीचे स्तम्भ आहेत एक पार्वती दुसरा गणेशजी गुहा उत्तराभिमुख भैरवजल पर्वताकडे (१४००० फूट उंच ) तोंड करून आहे. भैरव हे शिवाचे आणखी एक रूप आहे भैरव म्हणजे विश्वाला भरणारा, पूर्ण करणारा भैरव आपल्या हातातील डमरूच्या नादाने विश्वात समतोलता ठेवीत असतो

गुहेत प्रवेश केल्यानंतर मनुष्य अक्षरश सगळे विसरतो सर्व दु:खाचा विसर पडतो; काळज्या, विवंचना, आशानिराशा, यांचा मागमूसही मनात राहात नाही. एक विशुद्ध शान्ती चित्ताला लाभते इथपर्यंत प्रवास करण्यात, भोगलेल्या कष्टाचाही विसर पडतो याच गुहेत भगवान् शंकराने पार्वतीला आपल्या मायेचे रहस्य समजावून सांगितले होते. ते सांगत असता, एक कबूतराचे जोडपे पण श्रवण करीत होते हे ध्यानी येताच, प्रसन्न होऊन भगवान शंकराने त्यांना वर दिला की त्यांना अमरत्व प्राप्त होईल व प्रतिवर्षी या दिवशी भगवान् शंकर त्यांना दर्शन देईल. काही वेळेस एका ऐवजी दोन पांढऱ्या शुभ्र कबूतरांची जोडपी येत असतात. या गुहेतील कण न् कण शिवमय आहे, मंगल आहे, शांती निधान आहे उत्पलदेव आचार्यांनी या लिंगाचे दर्शन घेतल्यानंतर प्रार्थना केली, "हे जगन्नियंत्या, मला तुझ्यात सामावून घे"

जी उंच बैठक बनलेली असते, त्याच्याजवळ छरी साहेबाचा महंत बसलेले असतात. मूर्तीच्या दोन्ही बाजूला मोठे रजत ( चांदीचे ) दण्ड ठेवलेले असतात हा चांदीचा दण्ड उर्फ छरी साहेब, मोठ्या थाटमाटाने श्रीनगरपासून इथपर्यन्त यात्रेकरूंच्या जथ्याच्या आघाडीवर ठेवून आणला जातो छरीच्या पुढे कोणीही जाता कामा नये असा दण्डक आहे. ही सर्व

व्यवस्था काश्मीरच्या धर्मार्थ खात्यातर्फे केली जाते, व हल्ली त्याचे प्रमुख डॉ. करणसिंह आहेत. छरी साधारणपणे आश्विन शुद्ध चतुर्थीला श्रीनगरहून निघते. पंढरीच्या वारकऱ्यांच्या अशा दिंड्या असतात, तशाच दिंड्या छरी घेऊन श्रीनगरहून निघतात. निघण्याचे दिवशी श्रीनगर येथील बादशहा चौकातील दशनमी आखाड्यात छरीची विधिवत पूजा होते. ही पूजा शासकीय अधिकाऱ्यातर्फे होते. डॉ. करणसिंह श्रीनगरला असल्यास ते पूजा करतात यावेळी हजारो लोकांचा मेळावा भरतो त्यात मुसलमान स्त्रीपुरुष सुद्धा असतात. छरी हा पवित्र दण्ड वाहून नेणाऱ्याने पायीच यात्रा केली पाहिजे. अर्थात् साधूचा मोठा जथ्था सागाती असतोच. जिथून जिथून छरी जाते तिथे तिथे भाविक लोक पूजा करतात, आणि जथ्थ्यातील साधूना भोजन देतात. हा दण्ड प्रथम महंत अंतवरगीरने धारण केला होता. त्यानंतर महंत सरस्वतीगीरने. महंत सरस्वतीगीरने अमरनाथला येणाऱ्या साधूसाठी ओटे आणि आश्रम बांधले. काही साधू तबूतही राहतात प्रयागवरील कुंभमेळ्याचे वेळी जसे दृश्य दिसते, अगदी तसे थोड्या फार प्रमाणात इथे पाहायला मिळते.

छरीसाहेबाचा इतिहास– 'छरी' हा शब्द "छत्र" शब्दाचा अपभ्रंश असावा असे वाटते भृगु संहितेत असा उल्लेख आहे की, कश्यप ऋषीने काश्मीर खोरे जलाशयातून पुनश्च मिळवल्यानंतर, नागराज तक्षकामुळे त्या भागात पुष्कळ लोकवस्ती झाली एक दिवस भृगु ऋषि हिमालयातून भ्रमण करीत असता काश्मीरमध्ये आले. अमरनाथ गुहेचा शोध लावणारे पहिले भृगु ऋषीच होय भृगु ऋषीने लोकांना अमरनाथ तीर्थ क्षेत्राचे महत्त्व समजावूनही सांगितले

दुर्दैवाने, काही दशके लोटल्यावर दैत्य प्रबळ होऊन त्याचा पगडा बसला व लोक अमरनाथ तीर्थ विसरून गेले. तेव्हा, भृगु ऋषी पुनश्च तिथे अवतीर्ण झाले व त्यांनी जनतेला सांगितले की महादेवाची आराधना करून प्रसन्न करून घेतले आहे आणि महादेवाने त्यांना ( भृगु ऋषीला ) एक दंड दिला आहे. हा दण्ड ऋषीने नागराज तक्षकाच्या स्वाधीन केला.

भृगु ऋषीनी लोकाना सांगितले की हा दण्ड घेऊन तीर्थ यात्रा केली पाहिजे व काश्मीरच्या राजाने यात्रेकरूच्या प्रवासाची सगळी व्यवस्था केली पाहिजे हा दण्ड श्रीनगरपासून निघाला पाहिजे. त्या दिवसापासून साधूचा मुख्य छरीसाहेब घेऊन अन्य साधूबरोबर श्रीनगर ते अमरनाथ यात्रा करीत आले आहेत, व मागे लिहिल्याप्रमाणे शासनाचे धर्मार्थ खाते यात्रेकरूची सर्व व्यवस्था ठेवते. पहलगामला छरीसाहेबाची मिरवणूक येते, तिथे एक मंदिर आहे. शेकडोशे भाविक छरीसाहेबाची वाट पाहात असतात. इथून पुढल्या प्रवा सासाठी यात्रेकरू भाड्याची तट्टे करतात व सामान वाहून न्यायला कुली ( ठरवितात ) बरोबर घेतात. यात्रेकरूनी लोकरीचे उबदार कपडे, खिळे ठोकलेले बूट ( बर्फावरून घसरू नये म्हणून ) रेन कोट, व मुक्कामासाठी तंबू बरोबर नेणे आवश्यक आहे.

जे श्रावण महिन्यात ( जुलै - ऑगस्ट) पहलगामला जातील, त्यांनी निघून अमरनाथचे दर्शन न घेता भाड्याचे तट्टे करून व कूलाला बरोबर घेऊन अमरनाथच्या यात्रेला जरूर जावे. पहलगामला तंबू सुद्धा भाड्याने मिळतात. चारपाच लोकांनी मिळून केल्यास खर्च फारसा येत नाही. एकीकडे आपण असे ऐकतो की हिंदु लोक फार धार्मिक आहेत. मला तर पुष्कळ वेळा याची शंकाच वाटते. मुसलमान मक्केला जाऊन 'हाज' करून आला की त्याचे केवढ स्वागत होते. त्याला लगेच, "हाजी" उपाधि पण मिळते. अर्थात् या हाजीमध्ये हाजी मस्तान सारखे प्रख्यात स्मगलरही असतात; पण ते 'हाजी' आहेत यावरच त्यांना मुस्लीम समाजात मान आहे. ख्रिश्चन लोक जेरुसलेमला जातात, रोमला जातात त्यांनाही महत्त्व मिळते त्यांच्या धर्मात पारंगत होणाऱ्यांना उपाध्या असतात व समाजात त्यांना आदराचे स्थान असते. धर्मगुरूच्या शिक्षणासाठी ख्रिश्चन लोकांची भारतात पुष्कळ महाविद्यालय आहेत यातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्याना "फादर" ही उपाधि मिळते; व बायकांना 'सिस्टर' आणि पदोन्नति झाल्यावर 'मदर', "मदर सुप्रीम" इ (मदरमध्ये सुद्धा मदर व सुप्रीम मदर हा भेद आहेच) मिशनशाळेत हे फादर, सिस्टर शिकवायला असले म्हणजे विद्यार्थ्यांनी त्याना 'फादर', 'सिस्टर',

'मदर' असेच म्हटले पाहिजे; ही सक्ति आहे एका विद्यार्थ्याने "मला फादरने असे सांगितले" असे म्हटल्यावर मी त्याला म्हणालो, "ज्यांनी तुला जन्म दिला तेच तुझे 'फादर' असू शकतात. इतरांना फादर म्हणणे चुकीचे आहे." यावर तो विद्यार्थी गप्प बसला दुर्दैवाने हिंदत धर्मगुरूमाठी महाविद्यालये नाहीत तीर्थयात्रा करणाऱ्यांना समाजात महत्त्व नाही, त्याची उपाधि मिळत नाही हिंदुधर्मात चारधाम यात्रा करायला सांगितले आहे जो चारी धाम करतो त्याला 'चारधामी' किताब द्यायला काय हरकत आहे ? त्याचप्रमाणे आपल्याकडे बारा ज्योतिर्लिंगाचे महत्त्व आहे या बारही ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन येणाऱ्यास समाजात मानाचे स्थान पाहिजे. आमचे धर्मग्रंथ म्हणजे वेद. त्यांचे पठण तर हल्ली नामशेषच होत चालले आहे. सर्व कुराण मुखोद्गत असणाऱ्यांना 'हफीज' म्हणतात व मुसलमानात हफीजना तर 'हाजी' पेक्षा ही अधिक मान आहे. मुसलमानांच्या धार्मिक उत्सवाचे वेळी (विशेषत: रमजान) या हफीजना मोठी मागणी असते. आमच्याकडे वेद मुखोद्गत असणाऱ्यांना काहीच महत्त्व नाही. त्यामुळे वेद पठणाकडे लक्ष कोण देणार ? वेद व अन्य धार्मिक ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत व संस्कृतचे अध्ययन सनातनीपणाचे समजले जाते दुर्दैवाने त्याला जातीयतेचाहि वास यायला लागला. या सर्व परिस्थितीकडे [illegible] नाही इंग्लंडमधल्या धर्मगुरूंना लॅटिन यायलाच पाहिजे, व इंग्लंडची राणी (किंवा राजा), डिफेन्डर ऑफ् द फेथ असल्याने, त्यांना राज्यारोहणाप्रसंगी ज्या धार्मिक विधीतून जावे लागते ते विधी शेकडो वर्षे पुराणे आहेत व ते मंत्रोच्चार लॅटिनमधून होतात. त्याला कोणी 'सनातनी' वा "मागासलेलापणा" म्हणत नाही (काय हिम्मत आहे म्हणण्याची—!) त्या धार्मिक विधीत काही अर्थ आहे किंवा नाही, आजच्या 'स्पेस—युगात' त्याची काय जरुरी असेही प्रश्न कोणी विचारीत नाहीत. आपल्याकडे मात्र, उपनयन कशाला (सोशॅलिस्ट 'एसेम' जोशांनी आपल्या नातवाची मुंज लावली म्हणून त्याचेवर प्रगतिवादी आणि सुधारकांनी केवढी टीका केली होती !) आणि उपनयन आठव्या वर्षी करायचे ते मग लग्नाचे

वेळी धाईघाईने आटपून घ्यायचे हा फार्स ! 'हुडा कशाला' ? हा प्रश्न कोणी विचारीत नाही ! — आपले धार्मिक विधी एकजात निरर्थक टाकाऊ आहेत असे सरसकट पोरकट विधान करण्यापेक्षा त्यातील मतितार्थ समजून घेणे अधिक महत्वाचे आहे! — दुर्दैवाने त्यांचे मर्म उलगडून दाखविणारे विद्वान पंडितच दुर्मिळ होत चालले आहेत—आणि वैचारिक धार्मिकतेची बैठक नसल्यामुळे आम्ही जातींना व उपजातींना चिकटून आहोत व महाराष्ट्रात जातीयवादाचे तर विषय पसरलेले आहे. आणि धर्माच्या नावाखाली आम्ही काही खुळचट संस्कार विश्वास नसताना करीत असतो अशावेळी वाटते अमरनाथसारखी यात्रा निदान श्रध्दांना तरी करून आणवावी !

ज का. सरकार यात्रेकरूसाठी उत्तम व्यवस्था ठेवते हे लिहिले पाहिजे. रेव्हेन्यू कमिशनरच्या दर्जाचा अधिकारी या व्यवस्थेला जबाबदार असतो मुक्कामाच्या ठिकाणी चहा—फराळाची दुकाने "उगवतात" तशीच यात्रेकरी गेले की नाहीसे होतात. सरकारतर्फे वैद्यकीय उपचारांसाठी डॉक्टर्स व नर्सेसना ठेवले जाते व फिरते रुग्णालय पण आयोजित केले जाते. पोलीस बंदोबस्त उत्तम असतो. पिण्याच्या पाण्याची सोय, सरपणासाठी लाकडे, राहण्यासाठी तंबू व झोपड्या, इ. ची सोय शासन करीत असते. शेख अब्दुल्ला जिवंत असता त्याने जातीने लक्ष पुरवावे, त्याच्यानंतर त्याचा मुलगा डॉ फरुख अब्दुल्ला मुख्यप्रधान झाला त्याने यात्रेकरूंची कुठलीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व व्यवस्था चोख राहिली पाहिजे अशी दक्षता घेतली होती. पहलगामला आलेल्या यात्रेकरूसाठी राज्य सरकारतर्फे वाहनाची सोय केली जाते. श्रावण शु।। ० ११ शुक्ल पक्षातील एकादशीच्या रात्री यात्रींचा मेळावा अमरनाथला जायला निघतो. घोडी, खेचरे, कुली, पोर्टर, डोल्या, इ. ची सोय सरकार- तर्फे केली जाते. ( दर सुद्धा फार नसतात ) कॅम्प ऑफिसर म्हणून एका वरिष्ठ अधिकाऱ्याची या यात्रेसाठी नियुक्ति होते व त्याच्या हाता- खाली पोलीस, मेडिकल टीम, स्वयंसेवक असतात. धर्मार्थ ट्रस्ट तर्फे छरी साहेब घेऊन जाणाऱ्या महंत व साधूंची सर्व व्यवस्था ( भोजनासकट )

फुकट केली जाते. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी यात्रेकरूंसाठी सरपण, तंबू शिधासामग्री सरकार तर्फे ( पैसे देऊन ) उपलब्ध होते. ज. का. टुरिस्ट खात्यातर्फे फिरते कॅफेटेरिया सेवेसाठी सुसज्ज असते. महिलांसाठी लेडी डॉक्टर्स असतात. चंदनवाडी, शेषनाग व पंचतरणी या मुक्कामाच्या ठिकाणी सरकारी शिधासामग्रीची दुकाने आहेत. दुधाचे डबे, चहासाखरही उपलब्ध होते, सरपण तर चंदनवाडी, पिस्सूघाटी, शेषनाग, वावजान, बायबल, महागुणास, पंचतरणी आणि अमरनाथची गुहा या आठही ठिकाणी उपलब्ध असते. यात्रेकरूना थंडीचा त्रास रात्री किंवा केव्हाही होऊ नये ( सरपणाच्या अभावी ) याची खास तरतूद केलेली असते. केवळ श्रीनगर पासूनच नव्हे तर पठानकोट व जम्मूपासून अमरनाथच्या यात्रेसाठी पहलगाम पर्यन्त बसेस सुटतात. यात्रेकरूना जिथून बसायचे असेल तिथून बसावे केवळ अमरनाथची यात्रा हाच उद्देश असला तरी पहलगामहून जावे अनायासे श्रीनगरसुद्धा पाहून होईल प्रवाशांजवळ वेळ किती आणि पैसे किती हे सुद्धा विचारात घ्यायला हवे. पण, सर्वसाधारणपणे, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग ही व इथली आसपासची स्थळे पाहून, पहलगामहून अमरनाथला जावे खीरभवानीला जरूर जावे. श्रीनगरची शंकराचार्यांची टेकडी तर श्रीनगरच्या कार्यक्रमातच अन्तर्भूत करावी

अमरनाथहून परतीचा प्रवास पुष्कळसे भाविक लोक संगमला थांबून मग पुढे जातात अमरनाथची यात्रा केल्यामुळे मनाला आलेली प्रसन्नता आणि त्याहीपेक्षा असीम शांती आपल्याप्रमाणेच पूर्वजाना मिळावी हा हेतू धरून पितरांची श्राद्धे इथे केली जातात दतकथा अशी आहे की पृथ्वीरील मानवजातीने शिवाला प्रार्थना केली की त्यांना अमरत्व प्राप्त होण्याचा मार्ग भगवान शिवाने दाखवावा शिवाने आपल्या जटेतून अमरावती नदी निर्माण केली. अमरावती पंचतरणीला संगमला जाऊन मिळते इथेच काही श्रद्धाळु यात्री श्राद्धकर्मासाठी थांबतात. अर्थात् कड्याच्या कडाने रस्ता वर गेलेला आहे, तिथे सामाळूनच जावे लागते, म्हणून, फार कमी यात्री संगमकडे जातात.



६६८

अस्तनमर्गच्या बाजूने परतायला शासनातर्फे बंदी आहे, कारण साककोटवरील उतार फार धोक्याचा आहे. यात्री वावजनपासून मार्ग आक्रमीत जातात व शोजीपालला (११५८० फूट उचीवर) मुक्काम करतात. इथून जवळच १२००० फूट उचीवर सोनसर उर्फ सुवर्णसरोवर आहे सोनसर पास (१४५०० फूट) वरून वर्धवन खोऱ्यात जाणारा रस्ता फार रमणीय आहे. सोनसर तलाव म्हणजे आसपासच्या पर्वतांवरून ओघळणारे प्रवाह इथे पडून तलाव निर्माण झाला आहे पाणी अत्यन्त शुभ्र, स्फटिक मण्याप्रमाणे. सोनसर तलावातील पाण्याचा प्रवाह पुढे खाली खडकावर पडतो. तेव्हा असे वाटते,की चांदीचा रस खाली पडत आहे. म. प्र. मधील पचमढी या हिल् स्टेशनवर रजत-प्रपात म्हणून एक ठिकाण आहे. पुष्कळसे प्रवासी खूप लांबूनच, टेकडीवरून चांदीच्या धारेसारखा खाली पडणारा तो प्रवाह पाहातात, परंतु खरा आनंद, तीन-साडे तीन मैल जंगलातून रस्ता (पायवाट आहे) तुडवीत, टेकडी• वरून खाली एका मोठ्या शिलाखंडावर अगदी रेपेसारखा तो २०० फूट खाली पडतानाच नव्हे तर त्या शिलाखंडावर जाऊन तो प्रवाह अंगावर घेण्यात आहे ते पाणी खडकावरून खाली पडते व त्याचे एक मोठे कुंड बनले आहे पचमढीवरील रजत प्रपातापेक्षा इथली रम्यता अधिक आहे, फक्त खाली जाता येत नाही.

### तारसर आणि मारसर तलाव—

तारकासुराची कथा बहुतेकांना माहीत असावी. पुराण काळात तारकासुर देवांना फार त्रास देऊ लागला. त्याच्या जुलमानी देव त्रस्त झाले. पण, ब्रह्मदेवाने दिलेल्या वरामुळे तारकासुर हा शिवपुत्राखेरीज इतरांना अवध्य होता. भगवान् शंकराला तर पुत्र नव्हता, त्यामुळे तारकासुराने थैमान मांडले होते. देवांनी मदनाला प्रार्थना केली की त्याने शंकराच्या शरीरात कामाचा प्रादुर्भाव करावा मारू(कामदेव) वसंता-बरोबर हिमालयातील सुरीश्वर पर्वत शिखरावर (डल सरोवराच्या किनारी) गेला व तिथून महादेव पर्वतावर ध्यानस्थ असलेल्या भगवान्

शकराच्या हालचालींचे निरीक्षण करू लागला. एके दिवशी शिव आणि पार्वती एकत्र बोलत असता कामदेवाने प्रथम वसताला पाठवून वातावरण सुगंधित, पुष्पमय करायला सांगितले. वसंताने शिवपार्वतीची जागा लतावेलीनी वेढून टाकली, मजुळ पक्ष्यांची गाणी झाडांवरून ऐकू येऊ लागली, जिकडे तिकडे फुले टवटवीत होऊन वाऱ्याच्या झुळकीबरोबर सुगंध वातावरणात पसरू लागला [अशावेळी] मदनाने फुलांनी सुसज्ज असा आपला बाण शकरावर फेकला. शकराला मदनाचा या कृत्याचा राग येऊन, त्याने तृतीय नेत्र काढून मदनाला भस्म केले. मदनाला भस्म झालेले पाहाताच, पार्वतीचे दयाळू अतःकरण द्रवले व तिच्या डोळयातून जी आसवे ओघळली त्यातून सरोवर निर्माण झाले. मदनाच्या पत्नीने, रतीने, मदनाचे भस्म उचलले व ते तारसरात फेकले; त्याबरोबर मार सर निर्माण झाले. या दोन सरोवरात एक टेकडी आहे. तिला अजूनही कामदेव डाकी हेच नाव आहे.

लिड्डरवाटच्या पश्चिमेस १० मैल जो रस्ता जातो तो तारसारपासून तारसरच्या बाजूने रस्ता जातो, त्या उतारावर गुलाबांचे ताटवेच ताटवे आहेत; आणखीही पुष्कळ प्रकारची फुले आहेत. डाव्या किनाऱ्याने गेल्यावर १२५०० फूट उंचीवरील तारसर तलाव दृष्टीस पडतो. याचा आकार एखाद्या मोठ्या बदामासारखा आहे यातले पाणी अतिशय पांढरेशुभ्र, स्वच्छ, आणि बर्फाचेच असल्यामुळे थंड आणि अतीशय मधुर आहे तलावाच्या काठावर उभे राहिले असता, आजूबाजूची बर्फाच्छादित शिखरे दसतात.

तिथून, धुकाळ अवकाशात मार सर तलाव दिसतो. धुके असते तेव्हा चद्राला ग्रहण लागावे तसा तलाव दिसतो. धुके निवळल्यानतर दुधाच्या रगाचा जलाशय दिसतो, व आपले पाणी दचीगाम खोऱ्यात टाकते, तिथून रिझर्व्हायरमधे साठवले जाऊन श्रीनगरला पुरवले जाते. पहलगाम पासून तार सर मार्गे, श्रीनगरच्या नैऋत्येस सिंध नदीचे खोरे आहे या मार्गातून कोणे एके काळी मध्य आशियातून व्यापारी जात येत. पहलगाम पासून हा भाग पहायला जरूर जावे. फार रम्य आहे. लिड्डरवटचा रस्ता

सोडल्यानंतर, तार सर च्या प्रवाहाच्या बाजूने जात जात 'हमवास' गावाजवळ बर्फाचा पूल बनलेला आहे. तिथून कोलोहोई शिखरे स्पष्ट दिसतात. तिथून सेकीवास पठारावर (१११५२ फूट उंच) तारसर पासून २ मैलावर आणि लिडुरवटपासून १० मैलांवर आपण पोचतो. तिथे कॅम्पिंगला चांगली जागा आहे, पण उघडे मैदान असल्याने वाऱ्याचा त्रास होतो. काही वेळेस वाऱ्याची गर्जना भीषण आवाज करतात. हा भाग साहसी तरुणांना ट्रेकिंग करायला फार चांगला आहे.

सेकीवासपासून ६ मैलांवर केम सर आणि येम सर ही दोन छोटी सरोवरे आहेत. या तलावाजवळ शासकीय टूरिस्ट लॉज आहे आणि वन विभागाचे विश्राम गृह आहे. इथून सिंध व्हॅलीतील कुलानकडे (७३०० फूट उंच) रस्ता जातो. आठ मैलाचा हा रस्ता चराऊ कुरणानी आणि बर्च वृक्षांनी भरलेले आहे बर्च कुलान जंगलात झाडाप्रमाण फरचा झाड ही विपुल आहेत. दोन्ही बाजूला फुलाचे ताटवेच्या ताटवे आणि अनेक पक्ष्यांचे आवाज यामुळे ट्रेकिंग करायला मजा वाटते तलावानतरची ४ मैलाची उतरण (जवळ जवळ १०००० फूट) संपल्यावर आपण झेवनला पोचतो इथेही वन विभागाचे विश्रामगृह आहे सिंध नदी ओलांडल्यानंतर, आपण कुलानला येऊन पोचतो कुलान हे एक छोटे गाव आहे व इथून श्रीनगर १८ मैलावर आहे. या ठिकाणी सिंध व्हॅली संपते.

# सोनमर्ग

सिंधच्या उत्तरेस जातांना, ६ मैलांवर ९००० फूट उंची-वरील 'सोनमर्ग' लागते. 'सोनमर्ग' म्हणजे सुवर्णाची कुरणे-श्रीनगरपासून सोनमर्ग ५२ मैलांवर आहे व श्रीनगर पासून उत्तम मोटर-रस्ता आहे, व तो सर्व ऋतूत प्रवास करण्यासारखा आहे. सोनमर्गच्या दक्षिणेस २ मैलावर सोनमर्ग उर्फ थाजीवस हिमप्रवाह आहे. तत्पूर्वी एक मैलावर रेस्ट हाऊस आहे. पहलगाम प्रमाणेच सोनमर्ग सुद्धा वनविहाराला (ट्रेकिंग) आदर्श आहे. आपण जिथे कॅम्पिंग करतो, तिथून जवळच जवळच पर्वतावरून हिमप्रवाह आलेले दिसतात. उताराचर व मोकळ्या

मदानावर अल्पाईनची अत्यंत सुंदर फुले, आणि फर, बर्च याची गर्द झाडी, या सर्वांनी सोनमर्गला एक आगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे. पदभ्रमण केल्याखेरीज आकाशाला भिडलेली हिमालयाच्या अन्तर्भागातील शिखरे व त्यावर उधळलेले सृष्टिसौंदर्य याची कल्पना येणार नाही.

थाजीवास सोनमर्ग हिमप्रवाहाच्या पायथ्याशी आहे तिथे पोस्ट ऑफिस आहे, शिवाय काही हॉटेले व रेस्तॉरॉं आहेत. शिवाय, सोनमर्गला रेस्ट हाऊस आहेच. थाजीवस हून हिमप्रवाह (ग्लेसियर) वर चढून जाणे धोक्याचे आहे, परतु, वळणावळणाने शखधर हिल्वर गेल्यास, फार सुंदर दृश्य दिसते.

सोनमार्गच्या उत्तरेस ९॥ मैलावर, ९००० फूट उंचीवर झोजीला पासच्या खाली बालताल स्थान आहे. बालताल जवळ येत असता, आपणाला कित्येक जलप्रवाह दिसतील याच ठिकाणी अमरनाथचा अमरावती प्रवाह सिंधला मिळतो संगमाच्यावर डाक बंगला आहे. ह्या बंगल्यात एक दिवस मुक्काम करून इथल्या अपरिमित सौंदर्याचा अनुभव घ्यावा सभोती गर्द झाडी, त्याना लतानी वेष्टिलेले आणि किती रंगाचे पक्षा ! कुणाचा चोच पाहाण्यालायक, कुणाच्या मानेजवळ सुंदर रंग, कुणाचे पंख मखमली, वर्णन करणे अशक्य आहे. झोजीला पासच्या दुसऱ्या बाजूने २ मैल खाली गेल्यास एक रस्ता गेला आहे. त्या रस्त्याने अमर-नाथ गुहा केवळ एक दिवसात जाता येते, परतु रस्ता धोक्याचा आहे बर्फीलेपूल ओलांडावे लागतात, उन्हाळयातच अमरनाथची यात्रा होते व त्याचवेळी बर्फही वितळत असते, त्यामुळे धोका निर्माण होतो. सबंध झोजीला भाग ऑगस्ट महिन्यात फुलांनी डवरलेला असतो, एकदर ७५ प्रकारची फुले इथे आढळतात झोजीला पासच्या दरीतून खाली सिंध वाहात असते. दुसऱ्या बाजूला तिबेटपठाराची काही शिखरे दिसतात. ती वर्षभर बर्फाच्छादित असतात. झोजीला पासच्या दुसऱ्या एका बाजूने 'मातायान'ला रस्ता जातो, तिथे मान्सेहोई हिमप्रवाह आहे. त्याची व्याप्ति मिनिमर्ग या फुलानी सजलेल्या भागाजवळ गुम्बार पर्यन्त जाते.

या मार्तेहोईच्या टोकाला, गुम्बारपाशी मार्तसोहोईमधून दुधाळप्रवाह निघतांना दिसतो. त्याच्या जरा पलिकडे एक जलप्रपात आहे; तोच सिंध नदीचा उगम याच नदीला वालतालला अमरातीचा प्रवाह मिळतो

गंगाबल घाटी – गंगाबल तलाव (हीच उत्तरगंगा किंवा हरमुकुट गंगा) काश्मीरी हिंदूचे एक अत्यन्त पवित्र तीर्थ आहे, व दरवर्षी शेंकडोंशे पंडित (काश्मीरच्या ब्राह्मणांना 'पंडित' म्हणतात, ते विद्वान् असोत किंवा नसोत) इथे येतात हरमुखच्या पायथ्याशी हा तलाव आहे त्याचा विस्तार एक मैल लांब व एक मैल रूंद असा आहे. १२००० फूट उंचीवर हा जलाशय आहे इथे निसर्ग देवतने आपल्या सौंदर्याला उधळले आहे असे वाटते अनेक रंगाची फुले, पक्षी आणि जलाशयात पडलेली निळसर हिमशिखराची प्रतिबिम्बे–

दंतकथा अशी आहे की शंकराने गंगेला आपल्या जटेत लपविण्याचा प्रयत्न केला असता उमेने गंगेला जटेतून बाहेर काढले. अर्थात ही दंत· कथा आहे, पण ती सत्य वाटावी असेच इथले दृष्य आहे हरमुखचे उंचच उंच शिखर, त्याच्या माथ्यावरून ओघळणारे प्रवाह, जणू काय त्यांना बाहेर खेचून काढले आहे आणि त्यावर सूर्याची किरणे पडून त्याची चमक विलक्षण दिसते गंगाबलच्या वर, आसपास व खाली अनेक लहान मोठे तलाव आहेत व त्या सर्वांचा मिळून मोठाच विस्तार आहे उदा लूलगल आणि आदनसर १३५३० फूट उंचीवर आहेत, नंदकोल उर्फ नंदीखेंड (शिवाचा द्वारपाल) पूर्वेकडे ५०० फूट खालच्या बाजूस आहे, नंदकोल म्हणजे जणु काय शिवाच्या पायाशी अथरलेला निळा गालिचा ! तीन मैलावर कोलसर आहे आणि कोलसर पासून हरद्वार या प्रचण्ड शिळेने अलग केलेले उथळसे ब्रह्मसर इथे परशुरामाने तपश्चर्या केली होती

मनुष्याची वक्रदृष्टी न पडलेले हा निसर्गाचा अत्यंत रमणीय भाग आहे. हरमुखच्या पायथ्याशी निसर्गाचे सर्व खेळ पाहात, त्याच्या संपूर्ण सान्निध्यात केवढी मानसिक शांतता मिळते गंगाबल घाटी हे देवतांचेच निवासस्थान; त्यात आपण पाऊल टाकतो व त्या असीम उदात्तशांततेचा

थोडा तरी अनकरणावर परिणाम झाल्या खेरीज राहात नाही. आपल्या विवचना, राग, लोभ, मद, मोह मत्सर हे रिपु पळून जातात म्हणूनच प्राचीन ऋषी तपश्चर्येसाठी अशीच स्थाने निवडीत रामदासादि अनेक सतानी लिहून ठेवले आहे, परमेश्वराच्या आराधनेसाठी वनात जाऊन राहावे मनाच्या श्लोकात समर्थ म्हणतात, "सुखालागि आरण्य सेवीत जावे" वानप्रस्थाश्रमाचा हेतूच तो आहे. हरमुख या १६८७२ फूट उंचीवरील पर्वतशिखरासमोर कित्येक मैलाचे क्षेत्र गवताळ उतारांनी व्यापलेले आहे. व त्यात २१ तरी लहान मोठे तलाव आहेत आणि पृथ्वीवर केवळ हिमालयातच आढळतील अशी वनस्पती,अशी वृक्षराजी,अशी फुले!

सोनमर्ग हे श्रीनगरच्या उत्तरेस ५२ मैलांवर आहे व भ्रमन्ती करणाऱ्यांसाठी (ट्रेकिंगसाठी) तर विलक्षण अनुभव देणारे आहे बहुतेक मार्ग ८००० फूट किंवा अधिकच उंचीवर आहेत. काही काही १३000 फूट उंचिवर आहेत—या भागातून भटकताना हिरवीगार कुरणे, हिमप्रवाह, दाट झाडी, पृथ्वीवर अन्यत्र न आढळणारे पक्षी, फुले, यापेक्षा जीवनात आणखी कोणता विशुद्ध आनंद आहे! दुर्दैवाने आजचे आमचे युवक दूरदर्शनवरील चित्रहाराने, डिस्को-डान्सने इतके भारले गेले आहेत की आपल्या भारतात काही शुद्ध आनंद-धाम आहेत याचाही त्याना पत्ता नाही,त्याची करमणुक म्हणजे सध्याकाळी "ईव्हटीज्" करणे दिवसा कॉलेजात नेतागिरी करणे; आणि खेळ म्हणजे जवळ जवळ नाहीतच! अनेक शाळा कॉलेजात खेळाची मैदाने आहेत. ती ओस पडलेली असतात हे चक्षुर्वैसत्य आहे. फार फार क्रिकेट! अशाना काय सागावे! त्यामुळे आम्ही कोणत्याच खेळात प्राविण्य दाखवू शकत नाही एक कु. पी. टी. उषा ऑलिम्पिक दौड मध्ये जिकली नाहीच पण चौथी आली म्हणुन आम्ही तिला डोक्यावर घेऊन नाचत आहोत— परंतु, अन्य कुठेही आम्ही चमकत नाही. फुटबॉल, हॉकी यावरील आमचे प्राविण्य संपुष्टातच आले बाकीचे जिम्नॅस्टिक्स, उंच उडी, धावणे, पोहणे, गोळाफेक,भालाफेक, व्हॉल्टकूद,रिले रेस किंवा टेनिस,पिंगपॉंग,व्हॉलीबॉल,

बॅडमिन्टन कशातच आम्ही नाही. आमच्या तरुणापुढे सध्या एकच ध्येय असावेसे वाटते. नेता बनणे, राजकारण करणे; आणि म. प्र. सारख्या राज्याने शे ७८ टक्के ( १९८५ सालची बातमी ) इंजिनियरिंग, मेडिकल इ कॉलेजातून शेडयूल्ड कास्ट व शेडयूल्ड जातीं साठी जागा राखून ठेवल्याने तरुणात आणखी असंतोष व वैफल्याची भावना! अशा वेळी 'हिमालयाची हाक' कशी ऐकू येणार?

सोनमर्ग पासून आपण ५३ मैल रस्ता काटीत कंगन आणि नतर वुसन या सिंधु घाटीतील गावात आलो की मुख्य रस्त्यापासून डावीकडे एक रस्ता जातो व ब्रह्मसर पाशी येतो तिथून रामाराधन ( रामाने केलेली आराधना ) कडे येतो. या ठिकाणी रामाने शिवाची प्रार्थना केली व तपश्चर्येत भरताचा श्वासोश्वास बद झाला असता, त्याला जीवनदान द्यावे अशी मागणी करून भरताचे प्राण वाचविले, म्हणून या जागेस रामाराधन म्हणतात इथून जवळच भरतबल कडे जाणारा रस्ता आहे. तो अक्रोड आणि चेस्टनटच्या झाडांनी व्यापलेला आहे तिथून टोकावर मालिष ९000 फूट उचीवर असलेले स्थान आहेत इथे कॅम्पिंगला फार चांगली जागा आहे. १६० इथून ब्रह्मासर हे एक उथळशाण्याचे सरोवर हसद्वाराच्या पायथ्याशी लागते ब्रह्मसरापासून दोन रस्ते फुटतात. एक सराट मैदाना कडे जातो, दुसरा १३४७0 फूट ऊचीवरील हसदाराकडे जातो हसद्वाराचा सगळा मार्ग नारिंगी आणि निळ्या फुलानी अथरलेला आहे. यात्री शिखरावर पोचल्यानंतर, आपल्या मृत आप्तेष्टांचा नामोच्चार करून बरोबर आणलेल्या रक्षेचे तिथे विसर्जन करतात कदाचित, युधिष्टिराने अतिम समयी इथूनच स्वर्गारोहण केले असावे.

शिखरावर पोहचल्यानंतर, हिमशिखरे, बर्फाच्छादित घाटी याबरोबर आपल्याला दोन तलाव दिसतील; एक अर्धे गोठलेले, व दुसरे फिक्या हिरव्या रंगाच्या पाण्याचे दोघांची नावे "अश्रू फेर" (अश्रूचे थेंब) अशी आहेत एकाचे नाव सुख व दुसऱ्याचे नाव दुःख! पार्वती महादेवाच्या शोधात असता, महादेव सापडेना म्हणून तिने गाळलेला एक अश्रू हा थंड-

पाण्याचा तलाव, आणि महादेव निश्चित सापडेला. या आशेने डोळयात पाणी चमकले असता, पडलेला दुसरा थेब तो गरम पाण्याचा. इथून १०० याडींवर कुभाला सर हे एक खूप खोल पाण्याचे सरोवर आहे. इथे ऋषी तपश्चर्या करीत यात्रेकरी या तलावात भक्तिभावाने नाणी फेकतात.

हरमुखच्या पूर्व शिखराच्या खाली दन्डा लोट ( बैलाचे पुच्छ ) आणि नन्द कोल ही हिरवीगार कुरणाची गाने आहेत.

नदकोल मुक्काम करायला फार चागले ठिकाण आहे. विशेषत: डाव्या किनाऱ्याकडे; कारण, तिथे एक टेकडी उभी असल्याने झोंबणाऱ्या थडगार वाऱ्यापासून सरक्षण होते सकाळच्या वेळी तर इथले दृश्य फारच स्मरणीय असते. सूर्याची कोवळी किरणे हरमुखावर पडतात, त्याच्या सोनेरी गुलाबी छटा, आणि त्यांचे पाण्यात पडलेले प्रतिबिम्ब!

पश्चिम बाजूला अडाकृती लहानसा "कोल" नावाचा तलाव आहे. गगेने कोलला हरमुख मध्ये विश्रातीस्थान धुडण्यास सांगितले. पण कोलला तशी जागाच सापडेना गगेने मग स्वत एक स्थान शोधून काढले पण ती कोल वर रागावलेली होती, म्हणून कोलला तिने "तू कायमचा लहानच राहाशील" असा शाप दिला. त्यामुळे "कोल" लहानसाच तलाव रहिला आहे नदी हा शिवाचा द्वारपाल हे सर्वांना ठाऊकच आहे. गगाबल तलाव इथून जवळच आहे व त्यापासून नद कोलला पाण्याचा पुरवठा होत असतो.

गगाबल सरोवर:– निसर्गाचे एक अत्यत रमणीय स्थान म्हणजे ५ मैलाचा परिघ असलेला हा तलाव आसपास ५००० फूट उच गेलेले ओबड धोबड पर्वत आहेत. व जणु त्याच्या हाताच्या विळख्यात हा तलाव पर्वतावरून वाहणाऱ्या हिम प्रवाहांनी बनलेला) आहे. सूर्याची किरणे पाण्याचा रग अनेक वेळा बदलतात ( म्हणजे आपल्याला पाण्याचे रग प्रत्येक वेळी निरनिराळे दिसतात ) तसेच फुलांची तर लयलूट आहे या दोन तलावा कडे व त्यांच्या किनाऱ्यावरील हिरवी फुलांची किनार पाहिले म्हणजे वाटते हरमुखचे हे दोन डोळे भुवयानी युक्त असे आहेत मला वाटते, पूर्वीच्या ऋषिमुनींनी हिमालयाला महादेवाचे वसतिस्थान म्हटले आहे,

शंकराच्या जटा आहेत. त्यातून गंगा वाहात आहे, याला प्रतिकात्मक अर्थ असला पाहिजे. या भागात वर्षानुवर्षे एखादा विद्वान पंडित या सर्वप्रतिकांचा उलगडा करून सांगेल तर मानवजातीवर फार उपकार होणार आहेत.

सोनमर्ग निचनाई– विष्णुसर–कृष्णसर– गडसर

हा मार्ग लांबच्या पल्लयाचा पण सृष्टि सौदर्याने भारलेला आहे. सिंध्र पार करून आणि शीतकारी पूल ओलांडल्यावर उत्तरेकडे रस्ता जातो. तिथे एक पवन चक्कीपण आहे इथून लक्ष्मीमर्ग या छोटयाशा गावाकडे रस्ता जातो. इथे रात्री मुक्काम करून पुढल्या प्रवासाला प्रात काळी निघावे इथून चढ आहे त्यावर चांगले जगल आहे. शिखर १०२०० फूट उचीवर आहे आणि हिरणपत्री कुरणाकडे (१२००० फूट उंचीवर) आपण जातो. तिथून निचनाई प्रवाह लागतो. तो रस्ता अरुंद होत निचनाई नार खिंडीकडे ( १३३८७ फूट उच ) आपण पोचतो. दोन्ही बाजूला हिम प्रवाह आहेत. पूर्वेकडे बुक्कपथरी ( वृक्षपत्री ) पर्वतांची रांग आणि पश्चिमेकडे सहनाई पर्वतांची रांग. आता हलकासा उतार सूरू होतो आणि फुलानी भरलेल्या हिरव्यागार मैदानांपाशी आपण येतो इथे विशनसर ( विष्णुसर ) तलाव आहे. त्याच्या जवळील शिखर भगवान विष्णुच्या मस्तकासारखे दिसते, म्हणून याला विष्णुसर म्हणतात. हा तलाव सुद्धा खूप उचीवर ( १२०६३ फूट ) उचीवर आहे, आणि ३९00 फूट लाम्ब व १८00 फूट रुद आहे आसपासच्या पर्वतावरील हिम प्रवाह या तलावात आपले पाणी आणून सोडतात.

विष्णुसर तलावातून एक जलप्रवाह वाहतो, तो ओलांडल्यावर ५00 फूट चढण आहे. तिथे कृष्णासर तलाव आहे हा तलाव विष्णुसरच्या मानाने पुष्कळ लहान आहे. या तलावात ऑगस्ट महिन्यात सुद्धा बर्फाचे मोठे तुकडे ( आईस बर्ग ) तरगताना दिसतात या तलावावर जवळच्या प्रचण्ड पर्वत शिखराची छाया पडली असावी. म्हणून कदाचित याचे नाव कृष्णसर असावे पर्वतला नाव सरोवराचे आहे. या दोन्ही तलावाबद्दल कथा ऐकण्यात किंवा वाचनात आल्या नाहीत.

यमसर ते गडसर – विष्णुसर पासून गडसर (१४ मैल) चा मार्ग चढायला दमछक होते. शिखरावर (१३७५० फूट) एक लहानशी खिंड आहे, तिथून लगेचच बर्फाळ मार्गावरून सहाशे फूट खाली उतरून गेल्यावर यमसर (यमराजाचा तलाव) बाशी आपण पोचतो वस्तुत: यमसरचा परिसरही सृष्टिसौंदर्याने नटलेला आहे. आजुबाजूला अनेक इवलाले झरे आणि छोटे छोटे तलाव दिसतात. आपण वळणावर आलो की अचानक १३००० फूट उंचीवर असलेले गडसर सरोवर आपल्याला दिसते. हे तर अत्यंत सुंदर स्थान आहे. पर्वतावरून ओघळणारे हिम प्रवाह अगदी तलावाच्या पाण्यापर्यन्त पोचलेले आपल्याला दिसतात. तिन्ही बाजूनीं पर्वतांनी वेष्टिलेले आणि वर्तुळाकार दिसणारे हे सरोवर आहे चौथ्या बाजुला म्हणजे फुलांची पखरण असलेली हिरवीगार उतरण. गडसरच्या किनाऱ्याने गेले असता आपण कस्तुरीगंध पर्वताच्या पायथ्याशी येतो. इथे कस्तूरी मृगांचा विहार असतो, त्यामुळे पर्वतालाही ते नाव पडले असावे.

पर्वताच्या कडेकडेने गेलेला हा रस्ता दुप्तपाणी पर्यन्त गेल्यानतर सारसर प्रवाह एकदम भूमिगत होतो, पण पुन्हा एक कि. मी. खाली गेल्यानतर अवतीर्ण होतो थोडयाशा अतरावर सातसरण तलाव आहे, तिथे कॅम्पिगला चागली जागा आहे रस्त्या पुढे मोठे दगड, पाण्याचे लहान लहान जलाशया यावरून जात सातसरण बार गली (१२०७२ फूट उच) या दगडाळ घाटीकडे येतो. घाटीच्या दुसऱ्या बाजूने ३०० फूट उतरल्या-नतर, झाजीबल पासची थोडी अवघड चढण सुरू होते. ही खिंड १३५०० फूट उचीवर आहे या खिंडीच्या माथ्यावर मेन्गणदूब ही कॅम्पिगला उत्तम जागा आहे. गडसर पासून १० मैल अतरावर आहे या जागेवरून हरमुख, गंगाबल, नद कोल ही सारे दिसतात. तलावांच्या किनारी जायला उतार २००० फूट आहे. तलावाच्या दक्षिण किनाऱ्याला यात्रे-करूना आपला सैपाक वगैरे करण्यासाठी जागा आहे. आणि या ठिकाणी जी धर्मकृत्ये करायची असतात, ती कृत्ये यात्रेकरू पार पाडतात–इथून एक कि. मी अतरावर, १०० फूट उतारावर, डावीकडे नद कोल (नदी

कोल) आहे. या तलावाला गंगाबलचे तसेच हरमुखच्या हिम प्रवाहाचे पाणी मिळत असते

परतीचा प्रवास नदकोलहून करायचा असल्यास मुगशुनगुन हा नाला ओलांडावा लागतो. यात मांडयां पर्यंन्त पाणी असते, तेव्हा, तट्टावरूनच जावे लागते पुढे गेल्यानतर आग्नेय भागात सुदर हिरवीगार कुरण लागतात. याचे नावच त्रोणखल उर्फ तृणक्षेत्र असे आहे झाडाच्या दाट रागांहि दिसू लागतात. इथून चढ उताराचा रस्ता पोशीमाथुन आणि भोत शेर (भूतेश्वर) कडे जातो, व नतर ४००० फूट खाली उतार लागतो. हा उतार थोडाजपूनच चालायला हवा, कारण पाय घसरायला होते, पण रमणीयता भरपूर आहे. फर आणि वृक्षांचे अरण्यच आहे, व मद सुगधित वाऱ्याची झुळुक मोठी प्रसन्न व ताजेतवानी करणारी असते. आपण आता कान्किनदी पाशी येऊन पोचत असतों. या नदीला वनगत नाला असेही नाव आहे. याच्या उजव्या किनारी नरन नाग (कगनच्या उत्तरेस ६ मैलावर) आहे. याचे महत्त्व म्हणजे इथे अशोक पुत्र जालुकाने बौद्धमदिरे बांधली ललितादित्य राजाने ही भूतेश्वरला मदिरे बांधली. त्यांना भूतीश्वर (भूतेश्वर) महादेवाची मदिरे म्हणतात. इथले दृश्य पाहून, प्राचीन शिल्पकलचा नमुना पाहून मनुष्य स्तिमित होतो. इथली प्रत्येक वास्तु, मदिरे, तलाव, मडप, प्रचण्ड दगडा॰ पासून बनलेली आहे दगडाना वितळविण्याची कला त्या काळात ईजिप्शियन, रोमन, व भारतीयाना निश्चित ज्ञात होती, हे तिथल्या अवशेषांवरून स्पष्ट होते. तसेच, प्रचण्ड शिळांना वर उजलण्याचे अभियां॰ त्रिकी ज्ञान ही तेव्हा होते. इथले एका दगडांचे बनलेले स्नानगृह १६ फूट लांब, ७ फूट रूद व ५ फूट उच आहे. अगदी पहिले मदिर अशोक पुत्र जालुकाने बांधले होते, त्याचे भग्नावशेष तेवढे पहायला मिळतात. सुप्रसिद्ध आर्किऑलॉजिस्ट पर्सी ब्राऊनने लिहिले आहे– "या ठिकाणी तीन शैलीची मदिरे आदळतात एक आठव्या शतकातली (ललितादित्य राजाचे)" दुसरी मदिरे नतरच्या काश्मीर वळणाची, तिसऱ्या गटातले मदिर पूर्वी फार भव्य असले पाहिजे. आता फक्त त्याचा पायाच शिल्लक आहे '

सदोरा तीर्थ–प्राचीन काळचे तीर्थक्षेत्र:– वनगतगावापासून उत्तरेकडे सदोरा हे एक अत्यन्त प्राचीन तीर्थ आहे. त्यातील तीर्थाला (झरा) आता नरन–नाग म्हणतात. इथे प्राचीन काळी वसिष्ठ ऋषींचा आश्रम होता, आणि 'राजतरंगिणी' कर्ता कल्हण म्हणतो की सांदीमन राजाने वानप्रस्थाश्रम स्वीकार त्यानतर तो इथे येथे येऊन राहिला होता.

नरन नाग पासून पाच मैलांवर काची नम्बल आहे तिथून श्रीनरकडे रस्ता जातो काची नम्बल म्हणजे गवताळ स्थान

इथून अदन सर लूलगल तलाव लागताते. हे दोन्ही तलाव १३५०० फूट उंची वर आहेत. लोलागल खिंडीवर हे दोन्ही तलाव आहेत. लोलागल, शूळनई सर, तसूरलट, या मार्गे सारावल घाटीपाशी आपण पोचतो इथे कॉम्पिन्गला चागली जागा आहे. इथून हरमुख पर्वतारोहणाचा प्रारंभ पुष्कळ जण करतात. इथून उताराला सुरवात होते, हा उतार न जाणवणारा असा हळू आहे. जगलातून रस्ता जातो. कोवा नागा सारख्या दिसणाऱ्या वनस्पती इथे दिसल्या त्यांना गुणल्पथरी म्हणतात– आपण चित्रसूर नाल्यापाशी पोचतो. चित्रसूर नाल्या पासून दोन मार्ग जातात एक एरिन नाला घाटीतून कूदूर या गावाकडे जातो. कूदूर नदीहाल पासून १५ मैल आहे, आणि नदीहाल पासून श्रीनगर ३१ मैलावर आहे.

ज्यांना अधिक धाडसाची भ्रमंती (ट्रेकिंग) करायची असेल त्यांचे साठी त्रिसगम आणि अटावत इकडलापण मार्ग आहे– त्रिसगम मार्ग पायीच आक्रमावा लागतो तट्टे पण जात नाहीत. डॉ. नेव्ही या मार्गाने गेला होता आणि त्याने हा मार्ग किती खाचखळगांनी भरलेला आहे हे लिहून ठेवले आहे; पण या मार्गाने भ्रमन्ती करण्यात अपरिमित आनद मिळाला असेही तो लिहितो. त्याने वर्णन केले आहे, मार्गाचे ते असे –

"गगाबल नतर, काही कलासूरला डावी देऊन लूलगल वरून दिसणाऱ्या घाटीकडे सरळ जा. हाच त्रिसगम नाला. इथून मळलेली वाट नाही.

तट्टेपण जाऊ शकत नाहीत. पहिले दोन किलोमीटर्स उतार आहे, मग एक जल प्रवाह ओलांडावा लागतो. या प्रवाहात प्रचण्ड शिळा, खडक, गोटे आहेत. त्यानंतर बकऱ्यांची वाट दिसते. जरा पुढे जा म्हणजे गुजरांच्या झोपडया दिसतील इथे कॅम्प करा. लूलगल नाग पासून केवळ आठ मैलाचे अतर, पण, सबघ अतर म्हणजे रस्ता नसलेली भू म

त्रिसगम ते अटाबत १२ मैल अतर आहे. हे अतर कापायल १२ तास लागतात. त्रिसंगम पासून सावकाश चढायला लागा. जवळ १२000 फूट उच आणि ५ मैलाचे अंतर आहे. पण जाताना दृश्ये अत्यंत मनोहर दिसतात. याच्या पुढे 'मगन' लागते. जून किंवा जुलै महिन्यात कॅम्पिंग करायला हे स्थान सर्वोत्कृष्ट आहे. लाकडे खूप मिळतात. एकदोन कि. मी. अतरावर, रस्ता उतारावर लागतो. इथून मात्र फारच जपून जावे लागते; आणि तट्टे सामानांनी लादलेली असली तर त्यांना लगामाने खेचावे लागते– इतकाहा हा उतार वेगाचा आहे. शेवटी एक छोटे खेडे लागते इथून रस्ता थोडा बरा आहे. खेडयांच्या पुढे काही अंतरावर ओढा लागतो तो पार करावा लागतो अटावतच्या जवळ आणखी एक ओढा पार करावा लागतो; व उसकोट ला आपण पोचतो. तिथे वन विभागाचे विश्राम गृह आहे."

अटावत ते बंदीपूर ९ मैल अतर आहे. रस्ता पुष्कळच बरा आहे आणि वुलर लेक आपल्याला दिसू लागते. वुलर लेक पासून श्रीनगरचा रस्ता तर उत्कृष्टच आहे.

धाडसी तरूणांना ट्रेकिंग साठी खूप संधि आहे, ठिकाणे आहेत; पण मागे लिहिल्याप्रमाणे, धाडसी तरूणांचीच उणीव भासते !

# हरमुख वरील गिर्यारोहण

हरमुख– (महादेवाचे मुख) सर्व देवतांचे हे स्थान; 'हर' ने आपल्या वस्तव्यासाठी निवडलेले, सर्व आपत्तींना हरण करणारा शंभु महादेव गंगाबल घाटीवर हरमुखचे वर्चस्व दिसतेच, परंतु सबंध काश्मीर घाटीत हरमुख पर्वत व भोवतालचा भाग, या इतके अपरिमित सृष्टिसौंदर्य अन्यत्र पहायला मिळणार नाही. उत्तरेकडे दुर्गम नंगा पर्वत शिखर ( १६७०० फूट उंची- नंगा पर्वत जगातले चौथे सर्वात उंच शिखर आहे. त्याला पर्वताचा स्वामी म्हणतात. निळ्या आकाशात भिडलेले नंगापर्वत शिखर हा विज्ञानाचा चमत्कार की सृष्टीचा? भाविकाचे मस्तक मात्र नम्रतेने झुकते. पूर्वेकडे कोलोहोई, तेजाची देवता ( २७७७९ फूट उंच ) आणि त्या दोघांमधे हरमुख ( १६८७२ फूट उंच ), आपले सपाट शिखर वर करीत असतांना दिसते. पूर्वेकडे खडूप्रमाणे श्वेत व दक्षिणेकडे करड्या रंगाचे अनेक हिम-प्रवाह त्यावरून वाहातांना दिसतात!

ही हिमशिखरे म्हणजे निसर्गाच्या पावित्र्याचे, मांगल्याचे पूर्णरूप! जुन्या बायबलमधल्या मोझेसला परमेश्वराकडून 'दहा आज्ञा" पर्वतावरच मिळाल्या. खिस्ताची "पर्वतावरील प्रवचने" प्रसिद्धच आहेत. महम्मद पैगम्बरला देवदूत गेब्रियल कडून परमेश्वराचे संदेश मिळाले ते पर्वतावरच असे हे पर्वतांचे माहात्म्य! आमच्या हिमालयातील तर प्रत्येक शिखराला परमेश्वराच्या कुणा ना कुणा अवताराचे नावच दिलेले आहे.

हरमुख वर पहिले आरोहण १८९४ मध्ये एम ए स्टाईनने केले, नंतर १९१२ मध्ये डॉ. नेव्हे आणि कर्नल मिलीत्यांत हरमुख शिखरावर

गेले होते. १९०२ मध्ये जनरल ब्रूस गंगाबलच्या बाजूने हरमुखवर चढला होता याची तीन शिखरे आहेत उत्तरेकडील ट्रॅंग्युलेशन शिखर ( १६००० फूट ) मध्य शिखर (१६५०० फूट ) आणि पूर्वेकडील हरमुख शिखर ( १६८७२ फूट )

उत्तरशिखर– श्रीनगरहून निघून नदीहाल आणि कुदूर मार्गे एरिन नाल्यापाशी आपण येतो. तिथून पुढे दीड एक मैल चालल्यावर घाटीचे रस्ते फुटतात. चित्रसार नाल्याला डावी देऊन, उजवा मार्ग चालू लागायचा हळू हळू जंगलातून चढण लागते, सारबल कुरणातून रस्ता जातो, आणि कुदूर पासून ८ मैलावर एका रम्य प्रदेशात आपण पोचतो. इथे कॅम्पिंग करायला फार चांगले स्थान आहे. एका हिमप्रवाहाच्या टोकाशी कॅम्पिंग जागेवरून आपल्याला उत्तरशिखर दिसू शकते. हिमप्रवाला उजवीकडे टाकून, पायथ्यापासून खडकाळ पर्वत चढायला सुरवात करावी उंच गेल्या वर, पूर्वेकडे गंगाबल तलावाचे दृश्य मनोरम दिसते. एका दिवसात कॅम्प-वर आपण परत येऊ शकतो.

मध्य शिखर– ह्या शिखरावर आपण उत्तरशिखराच्या बाजूने सुद्धा जाऊ शकतो. आग्नेय बाजूला बर्फाळ मैदान आहे, तिथून चढणे बरेच सोपे आहे मैदानाच्या पोचल्यावर एक किलोमीटर तलवारीसारखा दिसणाऱ्या कडेच्या बाजूने आत जात मध्य शिखराच्या शयथ्याशी आपण येतो इथून पुन्हा खडकाळ चढण सुरू होते, आणि पहाटे निघालो असलो तरी यावेळी दुपारचा समय होतो, पण जमायला लागतात, तेव्हा अधिक साहसबाजी न करता कॅम्पवर परत येण हितावर आहे

मुख्य शिखर– अगदी निष्णात गिर्यारोहकाला सुद्धा हे शिखर एका दिवसात चढून पुनश्च सध्याकाळ पर्यन्त कॅम्पवर परत येणे अशक्य आहे. या शिखरावर जायचे ते दोन टप्पयानी. सारबल पासून हाय कॅम्प (१५००० फूट ) ही चढण चढतांना सरबल तलाव नतर शिखर ही ठिकाणे लागतात. इथून आणि २000 फूट चढण आहे, व मार्ग खडकाळ आणि निसरड्या दगडगोंड्यांनी पसरलेला आहे. या ठिकाणी कॅम्प करावा बारा

मात्र जोरातघोंगावत असतो. तेव्हा तंबू मजबूत असावा. सारबल पासून इथे पोचायला तीन तास लागतात हा झाला पहिला टप्पा.

इथून शिखरावर पोचून परत मुळच्या कॅम्पवर परतायला १०-१२ तास लागतात. आताची चढणहि खडकाळ आहे. २-३ तास ही चढण चढल्यावर बर्फाचे मैदान लागते. या पुढील मार्ग इतका कष्टचा नाही; मात्र तरवारीचा कडा जपूनच ओलांडावा लागतो. तो ओलांडल्यावर आपण भव्य शिखराच्या पायथ्याशी पोचतो. इथून पुन्हा खडकाळ चढण. त्यानंतर उतार लागतो. हा उतार जपूनच चालायला पाहिजे. उतार संपल्यावर पुन्हा चढण शिखराच्या पश्चिम बाजूने सुरू होते शिखरावर बर्फाचा प्रचण्ड मुकुट ठेवल्यासारखा वाटतो या शिखरावरून पूर्वेकडे पायथ्याशी नदीकोल आणि उत्तरेकडे गंगाबल तलावाचे दृश्य पहात रहावेसे वाटते

आसपास नजर टाकली म्हणजे काय विलक्षण सृष्टीचे रुप दिसते! भव्य, प्रचण्ड पर्वताच्या रांगाच्या रांगा, खोल घाटी न त्यात अनंत जल-प्रवाह व सरोवरे. परमेश्वराने आपले वास्तव्य इथे नाही तर कुठे करावे? निसर्गाच्या रुपाने तुम्हाला साक्षात देव देवतांचे दर्शन इथे घडते. माणूस दुर्बल आहे; तो हे दृश्यही फार वेळ सहन करू शकत नाही इथे आल्या-वर नुसते पाहातच राहावेसे वाटते. तुम्ही देवदेवताच्या अंगाखांद्यावर यावेळी असता माणसाची तर समाधिच लागते. हा चित्त थरारणारा, उन्नत करणारा अनुभव घेतल्यानंतर तसूरलाट खिंडीतून एरिन नाल्यामार्गे श्रीनगरला पोचणे म्हणजे अक्षरश स्वर्गातून पृथ्वीवर येण्यासारखे वाटते.

ग्रंथालय ठाणे
६६९
क्र.
शाखा (संदर्भ ग्रंथ)

REFBK-0024744

आमचे अभिमानास्पद प्रकाशन

## जरी आंधळी मी

सौ पुष्पा काणे

रु ४४

अंधाच्या भावविश्वाचे अनोखे
दर्शन घडविणारी कादंबरी

आपल्या संग्रही हवीच

हीरक प्रकाशन
कला निवास, हनुमान पथ
धरमपेठ, नागपूर ४४० ०१०
(दर्जेदार साहित्याचे
प्रकाशक व वितरक)
दूरध्वनी . ३१५५५